खुरपे, ती सुटली असता सर्व शेताचा फडशा पाडते, त्याप्रमाणे अशा प्रकारच्या आवेशाने ते आसुरी लोक पापांना थोर करून सोडतात. ॥ ३२९ ॥

चिन्तामपरिमेयां च प्रलयान्तामुपाश्रिताः । कामोपभोगपरमा एतावदिति निश्चिताः ॥ ११ ॥

अर्थ—प्रलयापर्यंतच्या काळाची अमर्याद चिंता वागवून व विषयभोगच सर्वस्व आहे, असा निश्चय करून ते (आसुरी लोक) केवळ विषयपरायणच होतात. ॥ ११ ॥

याचि येका आयती। तयाचिया कर्मप्रवृत्ती। आणि जिणियाहीं परौती। वाहती चिंता॥ ३३०॥
पाताळाहूनि निम्न। जियेचिये उंचिये सानें गगन। जे पाहातां त्रिभुवन। अणुही नोहे॥ ३३१॥
ते भोगपटाची मवणी। जीवीं अनियम चिंतवणी। जे सांडूं नेणे रमणी। वल्लभा जैसी॥ ३३२॥
तैसी चिंता अपार। वाढविती निरंतर। जीवीं सूनि असार। विषयादिक॥ ३३३॥
स्त्रिया गाइलें आइकावें। स्त्रीरूप डोळां देखावें। सर्वेंद्रियें आलिंगावें। स्त्रियेतेंचि॥ ३३४॥
कुरवंडी कीजे अमृतें। ऐसें सुख स्त्रियेपरौतें। नाहींचि म्हणौनि चित्तें। निश्चय केला॥ ३३५॥
मग तयाचि स्त्रीभोगा-। लागीं पाताळ स्वर्गा। धांवती दिग्विभागा-। परौतेही॥ ३३६॥

अर्थ—याच एका सिद्धीसाठी ते सर्व कर्म करण्याला प्रवृत्त होतात व जिवंत राहण्यापलीकडची चिंता वाहतात. ॥ ३३० ॥ जी पाताळापेक्षाही खोल, आकाशाहूनही उंच आहे व पाहू गेले असता जिच्यापुढे त्रिभुवन अणूही ठरत नाही. ॥ ३३१ ॥ ज्याप्रमाणे पतिव्रता स्त्री आपल्या पतीला मरण आले तरी त्याला सोडून राहू इच्छित नाही किंवा संन्याशाला नवीन संन्यास घेतल्यावर अंत:करणात पाळावयाच्या नियमांची जशी सारखी घोकणी लागते, ॥ ३३२ ॥ अशी अमर्याद चिंता नाशिवंत विषयांविषयी रात्रंदिवस ते वाढवीत असतात. ॥ ३३३ ॥ स्त्रियांचे गायन ऐकावे, स्त्रियांचे रूप डोळ्यांनी पाहावे व सर्वेंद्रियांनी स्त्रियांनाच आलिंगन द्यावे. ॥ ३३४ ॥ ज्या सुखावरून अमृतही ओवाळून टाकावे असे सुख स्त्रीवाचून दुसरे ठिकाणी नाही, असाच ज्यांच्या चित्ताने निश्चय केला, ॥ ३३५ ॥ मग ते स्त्रीसुख भोगण्याकरिता दिशांच्या पलीकडे असणाऱ्या पाताळ-स्वर्गलोकांकडे धाव घेतात. ॥ ३३६ ॥

आशापाशशतैर्बद्धाः कामक्रोधपरायणाः । ईहन्ते कामभोगार्थमन्यायेनार्थसंचयान् ॥ १२ ॥

अर्थ—शेकडो आशापाशांनी बद्ध होऊन व कामक्रोधयुक्त होत्साते विषयवासना भोगण्यास अन्यायाने विपुल संपत्तीचा साठा मिळविण्याची इच्छा करतात. ॥ १२ ॥

आमिषकवळु थोरी आशा। न विचारितां गिळी मासा। तैसें कीजे विषयाशा। तयांसि गा॥ ३३७॥
वांच्छित तंव न पवती। मग कोरडिये आशेची संतती। वाढऊं वाढऊं होती। कोशकिडे॥ ३३८॥
आणि पसरिला अभिलाष। अपूर्ण होय तोचि द्वेष। एवं कामक्रोधाहूनि अधिक। पुरुषार्थ नाहीं॥ ३३९॥
दिहा खोलणें रात्रीं जागोवा। ठाणांतरिया जैसा पांडवा। अहोरात्रींही विसांवा। भेटेचिना॥ ३४०॥
तैसें उंचौनि लोटिलें कामें। नेहटती क्रोधाचिये ढिमें। तरी रागद्वेष प्रेमें। न माती केंही॥ ३४१॥

अर्थ—ज्याप्रमाणे मासा परिणामाचा विचार न करता, गळाला लावलेल्या मांसाचा तुकडा गिळतो व त्यात अडकला जातो, त्याप्रमाणे त्यांची विषयाची आशा, त्यांनाही तसेच करते. ॥ ३३७ ॥ इच्छिलेला विषय प्राप्त न होता कोरडी आशा सारखी वाढवीत वाढवीत कोशकिड्याप्रमाणे ते आशेतच गुरफटून राहतात. ॥ ३३८ ॥ वाढविलेला मनोरथ अपूर्ण राहिल्यास तोच द्वेषात परिणाम पावतो. याप्रमाणे कामक्रोधाहून दुसरा पुरुषार्थच त्यांना वाटत नाही. ॥ ३३९ ॥ ज्याप्रमाणे, अर्जुना! देवडीवाल्याला दिवसा मालकाची स्वारी निघाली असता समोर धावावे लागते व रात्री गस्त द्यावी लागते, म्हणून अहोरात्र त्याला विश्रांती मिळत नाही, ॥ ३४० ॥ किंवा कामाने उंचावरून लोटले गेलेले क्रोधाच्या खडकावर आदळतात, तरी विषयांवरील प्रेमामुळे त्यांचा रागद्वेष इतका वाढलेला असतो की तो कोठे मावत नाही. ॥ ३४१ ॥

तेविंचि जीवींचिया हांवा। विषयवासनांचा मेळावा। केला परी तो भोगावा। अर्थें कीं ना॥ ३४२॥
म्हणौनि भोगावयाजोगा। पुरता अर्थ पैं गा। आणावया जगा। झोंबती सैरा॥ ३४३॥
एकातें साधूनि मारिती। एकाचीं सर्वस्वें हरिती। एकालागीं उभारिती। अपाययंत्रें॥ ३४४॥
पाशिकें पोतीं वागुरा। सुणीं ससाणे चिकाटी खोंचारा। घेउनि निघती डोंगरा। पारधी जैसे॥ ३४५॥
ते पोसावया पोट। मारूनि प्राणियांचे संघाट। आणिती ऐसें निकृष्ट। तेंही करिती॥ ३४६॥
परप्राणघातें। मेळविती वित्तें। मिळाल्या चित्तें। तोषणें कैसें॥ ३४७॥

अर्थ—तसेच अंत:करणातील हावेप्रमाणे नाना प्रकारच्या विषयवासना वाढविल्या, तरी जवळ धन असेल तरच वासनेप्रमाणे भोग भोगता येतील ना!॥ ३४२॥ म्हणून भोग भोगण्यास लागणारे धन आणण्याकरिता वाटेल तसे जगाला पकडतात. ॥ ३४३॥ कोणाला फसवून ठार मारतात तर कोणाचे सर्वस्व लुटतात व कोणावर जारण-मारणाचे प्रयोग करतात. ॥ ३४४॥ ज्याप्रमाणे पारधी, पाश, पोती, जाळे, शिकारी कुत्रे, ससाणा पक्षी, चिकटण्या, भाले घेऊन डोंगरावर जातात व आपले पोट भरण्यासाठी प्राण्यांचे समूह मारून आणतात, त्याप्रमाणे आसुरी लोकही असे कृष्णकर्म करतात. ॥ ३४५-३४६॥ दुसऱ्यांचे प्राण घेऊन संपत्ति मिळवितात व मिळालेली संपत्ती पाहून कसे संतुष्ट होतात (तेही ऐक). ॥ ३४७॥

इदमद्य मया लब्धमिमं प्राप्स्ये मनोरथम्। इदमस्तीदमपि मे भविष्यति पुनर्धनम्॥ १३॥

अर्थ—आज हे धन मी मिळविले आहे. ते अगदी मनाजोगे झाले. हे मी उद्या मिळवीन, पुन: तेही माझे होणार आहे. ॥ १३॥

म्हणे आजि मियां। संपत्ती बहुतेकांचिया। आपुल्या हातीं केलिया। धन्य ना मी॥ ३४८॥
ऐसा श्लाघों जंव जाये। तंव मन आणिकही वाहे। सवेंचि म्हणे पाहें। आणिकांचेंही आणूं॥ ३४९॥
हें जेतुलें असे जोडिलें। तयाचेनि भांडवलें। लाभा घेईन उरलें। चराचर हें॥ ३५०॥
ऐसेनि धना विश्वाचिया। मीचि होईन स्वामिया। मग दिठी पडे तया। उरों नेदीं॥ ३५१॥

अर्थ—आणि म्हणतो की मी आज पुष्कळांच्या संपत्ती हस्तगत केल्या, तेव्हा मी धन्य आहे की नाही?॥ ३४८॥ अशी आपली स्तुती करून घेतो, तोच मनात आणखी मिळावे अशी इच्छा उत्पन्न होते व लगेच म्हणतो, पाहा! दुसऱ्याचेही धन आणू. ॥ ३४९॥ हे जितके काही मिळविले त्या मुद्दलावर उरलेल्या चराचरातील धनाचा लाभ प्राप्त करून घेईन. ॥ ३५०॥ अशा रितीने संपूर्ण जगातील संपत्तीचा मालक होईन व मग दृष्टीस पडेल त्याला जिवंत राहू देणार नाही. ॥ ३५१॥

असौ मया हतः शत्रुर्हनिष्ये चापरानपि। ईश्वरोऽहमहं भोगी सिद्धोऽहं बलवान्सुखी॥ १४॥

अर्थ—या शत्रूला मी मारले, दुसऱ्यांनाही पुढे मारीन. मीच ईश्वर आहे, मी भोक्ता आहे, मीच सिद्ध, मीच समर्थ, मीच सुखी आहे. ॥ १४॥

हे मारिले वैरी थोडे। आणिकही साधीन गाढे। मग नांदेन पवाडें। येकलाचि मी॥ ३५२॥
मग माझीं होतील कामारीं। तियेंवांचूनि येरें मारीं। किंबहुना चराचरीं। ईश्वर तो मी॥ ३५३॥
मी भोगभूमींचा रावो। आजि सर्व सुखासी ठावो। म्हणोनि इंद्रही वावो। मातें पाहूनि॥ ३५४॥
मी मनें वाचा देहें। करीं तें कैसें नोहे। कें मजवांचूनि आहे। आज्ञासिद्ध आन॥ ३५५॥
तंवचि बळिया काळ। जंव न दिसें मी अतुर्बळ। सुखाचा कीर निखिळ। रासिवा मीचि॥ ३५६॥

अर्थ—हे थोडे शत्रू मारले, आणखी आपल्यापेक्षा बलवान असतील अशा दुसऱ्या शत्रूंनाही मारीन. मग सर्वत्र कीर्ती पावलेला असा मीच एकटा नांदेन. ॥ ३५२॥ मग सर्व माझे सेवक होतील. त्यांच्यावाचून जे कोणी राहतील त्यांचा संहार करीन. फार काय सांगावे! चराचराचा ईश्वर काय तो एक मीच होईन. ॥ ३५३॥ भोगभूमी

अशा पृथ्वीचा मी राजा होईन. सर्व सुखाला आश्रयस्थान आज मीच होईन. म्हणून मला पाहून इंद्रही व्यर्थ ठरेल. ॥ ३५४ ॥ मी काया-वाचा-मनाने करतो असे म्हटल्यानंतर ते कसे होणार नाही ? ज्याची आज्ञा पाळलीच पाहिजे, असा समर्थ माझ्यावाचून दुसरा कोण आहे ? ॥ ३५५ ॥ जोपर्यंत महाबलवान मी दृष्टीस पडत नाही, तोपर्यंतच काल बलवान म्हटला जातो. मी निश्चयाने केवळ सुखाची राशी आहे. ॥ ३५६ ॥

आढ्योऽभिजनवानस्मि कोऽन्योऽस्ति सदृशो मया । यक्ष्ये दास्यामि मोदिष्य इत्यज्ञानविमोहिताः ॥ १५ ॥

अर्थ—मी धनसंपन्न आहे, मी कुलवान आहे, माझ्यासारखा दुसरा कोण आहे ? मी यज्ञ करीन, दान देईन, आनंदित होईन, असे ते अज्ञानाने मोहित होऊन बरळतात. ॥ १५ ॥

कुबेर आथिला होये। परि तो नेणे माझी सोये। संपत्ति मजसम नव्हे। श्रीनाथाही ॥ ३५७ ॥
माझिया कुळाचा उजाळु। कां जातीगोतांचा मेळु। पाहातां ब्रह्माही हळु। उणाचि दिसे ॥ ३५८ ॥
म्हणोनि मिरविती नांवें। वायां ईश्वरादि आघवे। नाहीं मजसीं सरी पावे। ऐसें कोण्ही ॥ ३५९ ॥
आतां लोपला अभिचार। त्याचा करीन मी जीर्णोद्धार। प्रतिष्ठीन परमार। यागवरी ॥ ३६० ॥
मातें गाती वानिती। नटनाचें रिझविती। तयां देईन मागती। ते ते वस्तु ॥ ३६१ ॥
माजिरा अन्नपानीं। प्रमदांच्या आलिंगनीं। मी होईन त्रिभुवनीं। आनंदाकार ॥ ३६२ ॥
काय बहु सांगों ऐसे। ते आसुरीप्रकृतिपिसे। तुरंबिती असोसें। गगनौळें तियें ॥ ३६३ ॥

अर्थ—कुबेर संपन्न खरा, पण मला झालेला धनलाभ त्याला माहीत नाही. माझ्यासारखी संपत्ती लक्ष्मीपती विष्णूचीही नाही. ॥ ३५७ ॥ माझ्या कुळाचा नावलौकिक किंवा माझ्या जातीच्या व गोताचा समुदाय पाहता ब्रह्मदेवही थोडा कमीच वाटतो. ॥ ३५८ ॥ म्हणून ईश्वरादी सर्व व्यर्थच नावे धारण करतात, पण माझी बरोबरी करू शकेल असा कोणी नाही. ॥ ३५९ ॥ लोपलेल्या जारणमारण प्रकाराचा मी जीर्णोद्धार करीन व लोकांना मारक असे याग सुरू करीन. ॥ ३६० ॥ जे कोणी माझे गायन करतील, स्तुती करतील, नाचतमाशाने माझे मनोरंजन करतील त्यांना, ते जे जे मागतील ते ते देईन. ॥ ३६१ ॥ मादक अन्न व पेय सेवन करून व स्त्रियांना आलिंगन देऊन या त्रिभुवनात मीच एक सुखाचा पुतळा होईन. ॥ ३६२ ॥ फार काय सांगावे ! असे आसुरी प्रकृतीने पिसे झालेले लोक अतिशय महत्त्वाकांक्षेने आकाशपुष्पाचा सुगंध घेऊ पाहतात. ॥ ३६३ ॥

अनेकचित्तविभ्रान्ता मोहजालसमावृताः । प्रसक्ताः कामभोगेषु पतन्ति नरकेऽशुचौ ॥ १६ ॥

अर्थ—अनेक प्रकारच्या चित्तभ्रांतीने युक्त होऊन, जाळ्यात सापडले जाऊन व अनेक विषयभोगांच्या ठिकाणी आसक्त होऊन मरणानंतर ते अपवित्र अशा नरकात पडतात. ॥ १६ ॥

ज्वराचेनि आटोपें। रोगी भलतैसें जल्पे। चावळती संकल्पें। जाण ते तैसे ॥ ३६४ ॥
अज्ञान आतले धुळी। म्हणौनि आशा वाहटुळी। भोवंडीजती अंतराळीं। मनोरथांच्या ॥ ३६५ ॥
अनियम आषाढमेघ। कां समुद्रोर्मी अभंग। तैसे कामिती अनेग। अखंड काम ॥ ३६६ ॥
मग पैं कामनाचि तयां। जीवीं जाल्या वेलरिया। वोरपिलीं कांटिया। कमळें जैसीं ॥ ३६७ ॥
कां पाषाणाचिया माथां। हांडी फुटली पार्था। जीवीं तैसे सर्वथा। कुटके जाले ॥ ३६८ ॥
तेव्हां चढतीये रयणीं। तमाची होय पुरवणी। तैसा मोह अंतःकरणीं। वाढोंचि लागे ॥ ३६९ ॥
आणि वाढे जंव जंव मोहो। तंव तंव विषयीं रोहो। विषय तेथ ठावो। पातकासी ॥ ३७० ॥
पापें आपलेनि थांवें। जंव करिती मेळावे। तंव जितांचि आघवे। येती नरक ॥ ३७१ ॥

अर्थ—ज्वराचा वेग वाढला म्हणजे रोगी जसा वाटेल तसे बडबडतो, त्याप्रमाणे हे लोक नाना प्रकारचे संकल्प बडबडतात, असे समज. ॥ ३६४ ॥ अज्ञानरूपी धुळीत सापडल्यामुळे आशारूपी वावटळीने मनोरथरूपी आकाशात ते गिरक्या घालतात. ॥ ३६५ ॥ आषाढातील मेघ अनियमित असतात किंवा समुद्रावर तरंग सारखे उठत

असतात, त्याप्रमाणे त्यांच्या ठिकाणी कामवासना सदासर्वदा उठत असतात. ॥ ३६६ ॥ ज्याप्रमाणे काट्यांनी कमळाची दळे चिरली जातात, त्याप्रमाणे मग त्या कामनाच त्यांच्या अंत:करणात वेलींच्या जाळ्या होतात, ॥ ३६७ ॥ किंवा दगडावर मातीचे भांडे पडले असता त्याचे तुकडे तुकडे होतात, तसे त्यांच्या जिवाचे कामनेमुळे तुकडे तुकडे होतात. ॥ ३६८ ॥ ज्याप्रमाणे जसजशी रात्र होते, तसतसा अंधकाराचाच पुरवठा होत जातो, त्याप्रमाणे अंत:करणात अविवेक उत्तरोत्तर वाढत जातो ॥ ३६९ ॥ आणि जसजसा अविवेक वाढतो तसतशी विषयासक्ती वाढते व जेथे विषय आले, तेथेच पातकेही आलीच. ॥ ३७० ॥ पातकाचे बळ वाढून जेव्हा ती एकत्र होतात, तेव्हा जिवंतपणीच सर्व नरकांची प्राप्ती होते. ॥ ३७१ ॥

म्हणौनि गा सुमती। जे कुमनोरथां पाळिती। ते आसुर येती वस्ती। तया ठाया॥ ३७२ ॥
जेथ असिपत्र तरुवर। खदिरांगाराचे डोंगर। तातला तेलीं सागर। उतताती॥ ३७३ ॥
जेथ यातनांची श्रेणी। हे नित्य नवी यमजाचणी। पडती तिये दारुणीं। नरकलोकीं॥ ३७४॥

अर्थ—म्हणून, हे शुद्धमती अर्जुना! जे दुष्ट मनोरथ अंत:करणात बाळगतात, ते असुर लोक या नरकलोकात वस्ती करण्याकरिता येतात. ॥ ३७२ ॥ जेथे तलवारीच्या धारेसारखी तीक्ष्ण पाती असलेले वृक्ष आहेत, खैराच्या निखाऱ्यांचे डोंगर आहेत व तापलेल्या उकळत असलेल्या तेलाचे समुद्र आहेत, ॥ ३७३ ॥ जेथे यातनांच्या वाढत्या रांगाच आहेत, अशी जी नित्य नवी यमजाचणी होय, त्या घोर नरकात ते आसुरी लोक जाऊन पडतात. ॥ ३७४ ॥

आत्मसम्भाविता: स्तब्धा धनमानमदान्विता: । यजन्ते नामयज्ञैस्ते दम्भेनाविधिपूर्वकम्॥ १७॥

अर्थ—आपण आपली संभावना करून घेणारे, ताठर वृत्तीचे व धन व मान यांनी उन्मत्त झालेले ते असुर लोक दंभपूर्वक शास्त्रविधी सोडून नाममात्र यज्ञ करतात. ॥ १७ ॥

ऐसे नरकाचिये सेले। भागीं जे जे जन्मले। तेही देखों भुलले। यजिती यागीं॥ ३७५ ॥
येऱ्हवीं यागादिक क्रिया। आहाण तेचि धनंजया। परि विफळती आचरोनियां। नाटकी जैसे॥ ३७६ ॥
वल्लभाचिया उजरिया। आपणया पति कुस्त्रिया। जोडोनि तोषिती जैसिया। अहेवपणें॥ ३७७ ॥
तैसें आपणयां आपण। मानितां महंतपण। फुगती असाधारण। गर्वें तेणें॥ ३७८ ॥
मग लवों नेणती कैसे। आटिवा लोहाचे खांब जैसे। कां उधवले आकाशें। शिळाराशी॥ ३७९ ॥
तैसे आपुलिये बरवे। आपणचि रिझतां जीवें। तृणाहीहूनि आघवें। मानिती नीच॥ ३८० ॥
वरि धनाच्चिया मदिरा। माजूनि धनुर्धरा। कृत्याकृत्यविचारा। सवतें केलें॥ ३८१ ॥
जया आंगीं आयती ऐसी। तेथ यज्ञाची गोठी कायसी। तरी काय काय पिसीं। न करिती गा॥ ३८२ ॥

अर्थ—अशा घोर नरकाच्या यातना भोगण्यास योग्य असलेले लोकही मोहाने भुलून जाऊन यज्ञयागाच्या नादी लागलेले दिसतात. ॥ ३७५ ॥ हे अर्जुना! खरे पाहिले असता, यज्ञयागादी क्रिया आचरणायोग्यच आहेत, पण आसुरी लोक नाटक्याप्रमाणे त्याचे आचरण करून त्या निष्फळ करतात. ॥ ३७६ ॥ ज्याप्रमाणे वाईट चालीच्या स्त्रिया आपल्याला दुसरे पती जोडून घेतात व पतीच्या आश्रयाने सौभाग्यपण मिरविण्यात संतोष मानतात. ॥ ३७७ ॥ तसेच आपणच आपल्याला महंत म्हणवून घेऊन ते असुर लोक अतिशय गर्वाने फुगतात. ॥ ३७८ ॥ मग ओतीव लोखंडाच्या खांबाप्रमाणे किंवा आकाशात उंच वाढलेल्या दगडाच्या राशीप्रमाणे, वाकणे–म्हणजे नम्र होणे कसे–ते जाणत नाहीत. ॥ ३७९ ॥ त्याप्रमाणे आपणच आपली स्तुती करून समाधान मानतात व दुसऱ्या सर्वांना गवताहून तुच्छ समजतात. ॥ ३८० ॥ अर्जुना! वर आणखी संपत्तिरूप दारूने मत्त होतात व काय करावे, काय करू नये ह्या सांगितलेल्या विधिनिषेधरूप विचाराचा मत्सर करतात ॥ ३८१ ॥ ज्याच्या ठिकाणी अशी स्थिती आहे, तेथे विधिपूर्वक यज्ञानुष्ठानाची गोष्ट कशी निघणार? पण भ्रमिष्ट माणसे काय काय करणार नाहीत! ॥ ३८२ ॥

म्हणौनि कोणे एके वेळे। मौढ्यमद्याचेनि बळें। यागाचींही टवाळें। आदरिती॥ ३८३ ॥
ना कुंड मंडप वेदी। ना उचित साधनसमृद्धी। आणि तयांसी तंव विधी। द्वंद्वचि सदा॥ ३८४॥

देवां ब्राह्मणांचेनि नांवें। आड वारेनही नोहावें। ऐसें आथी तेथ यावें। लागे कवणा॥ ३८५॥
पैं वासरुवाचा भोकसा। गाईपुढें ठेऊनि जैसा। उगाणा घेती क्षीररसा। बुद्धिवंत॥ ३८६॥
तैसें यागाचेनि नांवें। जग वाउनि हांवे। नागविती आघवें। अहेरावारीं॥ ३८७॥
ऐशा कांहीं आपुलिया। होमिती जें उजरिया। तेणें कामिती प्राणियां। सर्वनाश॥ ३८८॥

अर्थ—म्हणून मूर्खपणा व मद्य यांच्या प्रभावामुळे एखादे वेळी यज्ञयागाची नक्कल करतात. ॥ ३८३ ॥ त्यांना यज्ञाकरिता कुंड, मंडप, वेदी नको; योग्य साधनसमृद्धी नको; शास्त्रात सांगितलेल्या विधीशी त्यांचा सर्वदा विरोधच असतो. ॥ ३८४ ॥ देव, ब्राह्मण यांच्या नावाचा वाराही त्यांना सहन होत नाही. असे जेथे आहे, तेथे कोणाला यावे लागणार? ॥ ३८५ ॥ ज्याप्रमाणे बुद्धिमान लोक गायीपुढे कृत्रिम वासरू ठेवून तिला पान्हावून दूध घेतात, ॥ ३८६ ॥ त्याप्रमाणे यज्ञयागाच्या निमित्ताने लोकांना लोभाने पाचारण करून अहेराच्या द्वारा त्या सर्वांना नागवितात. ॥ ३८७ ॥ आपल्या उत्कर्षासाठी असे जे काही उघडपणे होमहवन करतात, ते लोकांच्या सर्वनाशाची इच्छा धरूनच करतात. ॥ ३८८ ॥

अहंकारं बलं दर्पं कामं क्रोधं च संश्रिताः । मामात्मपरदेहेषु प्रद्विषन्तोऽभ्यसूयकाः॥ १८॥

अर्थ—अहंकार, बल, दर्प, काम व क्रोध इत्यादी विकारांचा आश्रय करून ते आपल्या देहाच्या ठिकाणी व परदेहाच्या ठिकाणी असलेल्या माझा द्वेष करणारे व मत्सर करणारेच होत. ॥ १८ ॥

मग पुढां भेरी निशाण। लाउनी ते दीक्षितपण। जगीं फोकारिती आयण। वावो वावो॥ ३८९॥
तेव्हां महत्त्वें तेणें अधमा। गर्वा चढे महिमा। जैसे लेवे दिधले तमा। काजळाचे॥ ३९०॥
तैसें मौढ्य घणावे। औद्धत्य उंचावे। अहंकार दुणावे। अविवेकही॥ ३९१॥
मग दुजयाची भाष। नुरवावया निःशेष। बळियेपणा अधिक। होय बळ॥ ३९२॥
ऐसा अहंकार बळा। जालया येकवळा। दर्पसागर मर्यादवेळा। सांडूनि उते॥ ३९३॥
मग वोसंडलेनि दर्पें। कामाही पित्त कुरुपे। तया धगीं सैंघ पळिपे। क्रोधाग्नि तो॥ ३९४॥
तेथ उन्हाळां आगी खरमरा। तेलातुपाचिया कोठारा। लागला आणि वारा। सुटला जैसा॥ ३९५॥
तैसा अहंकार बळा आला। दर्प कामक्रोधीं गूढला। या दोहींचा मेळ जाला। जयांच्या ठायीं॥ ३९६॥
ते आपुलिया सवेशा। मग कोणी कोणी हिंसा। या प्राणियांतें वीरेशा। न साधिती गा॥ ३९७॥

अर्थ—मग भेरी, निशाण लावून आपल्या दीक्षितपणाचा जगात उगीच व्यर्थ बडेजाव माजवितात. ॥ ३८९ ॥ ज्याप्रमाणे अंधकाराला काजळाचा लेप द्यावा, त्याप्रमाणे अधम पुरुषाच्या ठिकाणी तो बडेजाव आणखी गर्व वाढविण्यास कारण होतो. ॥ ३९० ॥ तसेच त्यांचा मूर्खपणा अधिकच वाढतो, उद्धटपणा बळावतो, अहंकार व अविवेकही दुप्पट वाढतात. ॥ ३९१ ॥ मग दुसऱ्याचे नावही उरू द्यावयाचे नाही, असा प्रयत्न करण्याकरिता त्यांचे बळही अधिक बळावते. ॥ ३९२ ॥ अशा रितीने अहंकार एकदा बलवान झाला म्हणजे गर्वसमुद्र मर्यादा सोडून उतू येतो. ॥ ३९३ ॥ मग त्या मर्यादा सोडून वाहू लागलेल्या गर्वाने कामाचा प्रकोप होतो व त्याच्या उष्णतेने क्रोधाग्नी एकदम भडकतो. ॥ ३९४ ॥ तेव्हा ज्याप्रमाणे खरखरीत उन्हाळ्यात तेलातुपाच्या कोठाराला आग लागून त्याला वाऱ्याचे साहाय्य व्हावे, ॥ ३९५ ॥ त्याप्रमाणे बळावलेल्या अहंकाराचा व कामक्रोध यांनी व्यापलेल्या गर्वाचा ज्यांच्या ठिकाणी मेळ झाला, ॥ ३९६ ॥ वीर अर्जुना! ते लोक आपल्या इच्छेप्रमाणे कोणकोणत्या प्रकारच्या हिंसेने प्राण्यांना मारणार नाहीत! ॥ ३९७ ॥

पहिलें तंव धनुर्धरा। आपुलिया मांसरुधिरा। वेंच करिती अभिचारा-। लागोनियां॥ ३९८॥
तेथ जाळिती जियें देहें। यामाजि जो मी आहें। तया आत्मया मज घाये। वाजती ते॥ ३९९॥
आणि अभिचारकीं तिहीं। उपद्रविजे जेतुलें कांहीं। तेथ चैतन्य मी पाहीं। सीण पावें॥ ४००॥

अर्थ—अर्जुना! हे लोक प्रथम जारणमारणादी अभिचारकर्माकरिता आपल्याच रक्तमांसाचा उपयोग करतात. ॥ ३९८ ॥ असे करताना ज्या देहाला ते जाळतात, त्या देहात असलेल्या मलाच घाव घालतात॥ ३९९ ॥ आणि त्या अभिचारकर्माने ज्यांना उपद्रव होतो, तेथे चैतन्यरूपाने असलेल्या मलाच दुःख होते. ॥ ४०० ॥

गूढार्थदीपिका—जीव जरी आपल्याहून परमात्म्याला निराळा मानीत असला तरी परमेश्वर, जीवाला आपल्याहून निराळा समजत नाही व जीवचैतन्य आणि ईश्वरचैतन्य एकच असल्यामुळे जीवाला होणारे दुःख मलाच होते, असे येथे औपचारिकरीत्या भगवंतांनी म्हटले आहे.

आणि अभिचारावेगळें। विपायें जें अवगळे। तया टाकिती इटाळें। पैशुन्यासीं॥ ४०१ ॥
सती आणि सत्पुरुष। दानशीळ याज्ञिक। तपस्वी अलौकिक। संन्यासी जे॥ ४०२ ॥
कां भक्त हन महात्मे। इयें माझीं निजाचीं धामें। निर्वाळलीं होमधर्मे। श्रौतादिकीं॥ ४०३ ॥
तयां द्वेषाचेनि काळकूटें। बासटोनि तिखटें। कुबोलांची सदटें। सूति कांडें॥ ४०४॥

अर्थ—आणि अभिचारकर्मापासून चुकून जे गळले गेले, त्यांना निंद्यकर्माचा दोष लावतात. ॥ ४०१ ॥ पतिव्रता, सत्पुरुष, दानशूर, निष्काम यज्ञादिकर्म करणारे तपस्वी, अलौकिक पुरुष, संन्यासी किंवा भक्त महात्मे, जी, श्रौतादी होमधर्माने शुद्ध सात्त्विक झालेली ही माझी राहण्याची ठिकाणे आहेत, त्यांना द्वेषरूपी काळकूटविषाने माखलेले, अत्यंत मर्मभेदी, तिखट व जोरदार वाग्बाण ते मारतात. ॥ ४०२-४०४ ॥

तानहं द्विषतः क्रूरान्संसारेषु नराधमान् । क्षिपाम्यजस्त्रमशुभानासुरीष्वेव योनिषु॥ १९ ॥

अर्थ—अशा त्या द्वेष करणाऱ्या क्रूर नराधमांना मी संसारातील सतत पापरूप आसुरी योनीतच जन्माला घालतो. ॥ १९ ॥

ऐसे आघवाचि परीं। प्रवर्तले माझ्या वैरीं। तयां पापियां जें मी करीं। तें आइक पां॥ ४०५ ॥
तरी मनुष्यदेहाचा तागा। घेऊनि रुसती जे जगा। ते पदवी हिरोनि पैं गा। ऐसे ठेवीं॥ ४०६ ॥
जे क्लेशगांवींचा उकरडा। भवपुरीचा पानिवडा। ते तमोयोनी तयां मूढां। वृत्तीचि दें॥ ४०७ ॥
मग आहाराचेनि नांवें। तृणही जेथ नुगवे। ते व्याघ्र वृश्चिक आडवे। तैसिये करीं॥ ४०८ ॥
तेथ क्षुधादुःखें बहुतें। तोडूनि खाती आपणयातें। मरमरों मागुते। होतचि असती॥ ४०९ ॥
कां आपला गरळजाळीं। जाळिति आंगाची पेंदळी। ते सर्पचि करीं बिळीं। निरुंधला॥ ४१० ॥
परी घेतला श्वास घापे। येतुलेनही मापें। विसांवा तयां नाटोपे। दुर्जनांसी॥ ४११ ॥
ऐसेनि कल्पांचिया कोडी। गणितांही संख्या थोडी। तेतुला वेळ न काढीं। क्लेशौनि तयां॥ ४१२ ॥
तरि तयांसी जेथ जाणें। तेथिंचें हें पहिलें पेणें। तें पावोनि येरें दारुणें। न होती दुःखें॥ ४१३ ॥

अर्थ—अशा रितीने सर्वच प्रकारे माझे वैर करण्यास जे प्रवृत्त होतात, त्या पापी लोकांना जे मी फळ देतो ते सांगतो, ऐक. ॥ ४०५ ॥ मनुष्यदेहाचा संबंध प्राप्त असताही जे जगाचा नाश करण्यास प्रवृत्त होतात, ती त्यांची मनुष्यपणाची पदवी हिसकावून घेऊन त्यांना मी असे करून ठेवतो. ॥ ४०६ ॥ अशा त्या मूढ लोकांना मी जो संपूर्ण दुःखरूपी गावाचा उकिरडा होय, जो संसार नरकाचा पाणवठाच होय, अशा त्या तमोगुणी योनीचा वतनदार करून ठेवतो-म्हणजे सतत अशा तमोगुणी योनीतच त्यांना जन्माला घालतो. ॥ ४०७ ॥ मग आहाराकरिता गवतही जेथे मिळणार नाही, अशा जंगलात वाघ, विंचू इत्यादी जन्मात घालतो. ॥ ४०८ ॥ मग तेथे भुकेच्या अत्यंत दुःखाने आपणालाच तोडून खाऊन मरत जातात व जन्माला येत जातात॥ ४०९ ॥ किंवा आपल्या विषाच्या अग्नीने आपल्या अंगाची त्वचा जाळून कात टाकणारा सर्प करून त्यांना बिळात कोंडून ठेवतो. ॥ ४१० ॥ घेतलेला श्वास टाकण्यास जितका वेळ लागतो तितका वेळदेखील विश्रांती त्या दुर्जनांना मिळू देत नाही. ॥ ४११ ॥ कल्पांच्या अनेक चळथी लोटण्याचा काळ ज्याच्या गणतीच्या दृष्टीने कमी भरेल, इतका काळ लोटला तरी त्या दुर्जनांना मी त्या दुःखातून बाहेर काढत नाही. ॥ ४१२ ॥ तरी त्यांना पुढे जेथे जावयाचे त्याचा हा पहिला मुक्कामच होय. ती प्राप्ती झाली असता इतर दुःखे त्याच्यापुढे काहीच भयंकर वाटणार नाहीत. ॥ ४१३ ॥

आसुरीं योनिमापन्ना मूढा जन्मनि जन्मनि । मामप्राप्यैव कौन्तेय ततो यान्त्यधमां गतिम्॥ २०॥

अर्थ—हे अर्जुना! मग ते तमोगुणी मूर्ख लोक जन्मोजन्मी आसुरी योनीतच जन्म पावून मला प्राप्त न होता त्यापेक्षाही नीच गतीला प्राप्त होतात. ॥ २० ॥

हा ठायवरी घोरी। संपत्ती ते आसुरी। अधोगति अवधारीं। जोडिली तिहीं॥ ४१४॥
पाठीं व्याघ्रादि तामसा। योनीं तो अळुमाळ ऐसा। देहाधाराचा उसासा। आथी जोही॥ ४१५॥
तोही मी वोल्हावा हिरें। मग तमचि होती एकसरें। जेथें गेलें आंधारें। काळवंडैजे॥ ४१६॥
जयांची पापा चिळसी। नरक घेती विवसी। शीण जाय मूर्च्छी। शिणें जेणें॥ ४१७॥
मळ जेणें मैळे। ताप जेणें पोळे। जयाचेनि नांवें सळे। महाभय॥ ४१८॥
पापा जयाचा कंटाळा। उपजे अमंगळ अमंगळा। विटाळही विटाळा। बिहे जया॥ ४१९॥
ऐसे विश्वाचेया या वोखटेया। अधम जे धनंजया। ते ते होती भोगूनियां। तामसा योनी॥ ४२०॥

अर्थ—ते मूढ लोक येथपर्यंत आसुरी संपत्तीच्या योगाने घोर अधोगती प्राप्त करून घेतात, पाहा! ॥ ४१४ ॥ नंतर व्याघ्रादी तामसी योनीतील देहाच्या आधाराचा जो थोडासा विसावा घेतला जातो, ॥ ४१५ ॥ तोही ओलावा मी हिरावून घेऊन जेथे प्राप्त झाले असता अंधारालाही काळेपणाची पुटे चढतील, असे ते केवळ एक तमरूपच होऊन राहतात. ॥ ४१६ ॥ पापांनाही ज्यांची किळस येईल, नरकालाही भीती वाटेल व ज्यांचे दु:खभोग पाहून दु:खालाही मूर्च्छा येईल, ॥ ४१७ ॥ ज्याच्या योगाने मळालाही मळ लागेल, ताप होरपळेल, महाभयालाही ज्याचे नाव ऐकताच थरकाप सुटेल, ॥ ४१८ ॥ पापालाही ज्याचा कंटाळा येईल व अमंगळालाही ज्याला पाहता अमंगळ वाटेल, विटाळालाही ज्याचा विटाळ होईल म्हणून भीती वाटते, ॥ ४१९ ॥ अर्जुना! व्याघ्रादी तमोयोनी भोगून जगामध्ये जे अधमातीलही अधम असेल, ते, ते होऊन राहतात. ॥ ४२० ॥

अहा सांगतां वाचा रडे। आठवितां मन खिरडे। कटारे मूर्खीं केवढे। जोडले निरय॥ ४२१॥
कायिसया ते आसुर। संपत्ति पोषिती वाउर। जिया दिधलें घोर। पतन ऐसें॥ ४२२॥
म्हणौनि तुवां धनुर्धरा। नोहावें गा तिया मोहरा। जेउता वास असुरां। संपत्तिवंतां॥ ४२३॥
आणि दंभादिदोष साही। हे संपूर्ण जयांच्या ठायीं। ते त्यजावे हें काई। म्हणों कीर॥ ४२४॥

अर्थ—अरेरे! हे सांगताच आमच्या वाणीला रडू येते. त्यांच्या नुसत्या आठवणीने आमचे मन मागे फिरते. हाय हाय! या मूर्खांनी केवढे घोरतम नरक प्राप्त करून घेतले. ॥ ४२१ ॥ जिच्या योगाने असे हे भयंकर अध:पतन होते, त्या आसुरी संपत्तीचे, ते मूढ लोक, व्यर्थ पोषण कशाला करतात बरे! ॥ ४२२ ॥ म्हणून हे अर्जुना! आसुरी संपत्तीच्या लोकांचा जेथे जेथे रहिवास आहे तेथे तेथे तू जाऊ नकोस ॥ ४२३ ॥ आणि वर सांगितलेले आसुरी संपत्तीतील दंभादी सहाही दोष ज्यांच्या ठिकाणी असतील, त्यांचा संग सर्वदा वर्ज्य करावा, हे खरोखर काय सांगायला पाहिजे. ॥ ४२४ ॥

त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः । कामः क्रोधस्तथा लोभस्तस्मादेतत्त्रयं त्यजेत्॥ २१॥

अर्थ—काम, क्रोध, लोभ, असे ते तीन आपला नाश करणारे—म्हणजे सर्व पुरुषार्थाचा नाश करणारे–असून नरकाची द्वारे आहेत, म्हणून या तिघांचा सर्वथा त्याग करावा. ॥ २१ ॥

परि काम क्रोध लोभ। या तिहींचेंचि थोंब। थावे तेथें अशुभ। पिकलें जाण॥ ४२५॥
सर्व दुःखां आपुलिया। दर्शना धनंजया। पाढाऊ हे भलतया। दिधले आहाती॥ ४२६॥
कां पापियां नरकभोगीं। सुवावयालागीं जगीं। पातकांची दादुगी। सभाचि हे॥ ४२७॥
ते रौरव गा तंवचि वरी। आइकिजती पटांतरीं। जंव हे तिन्ही अंतरीं। उठती ना॥ ४२८॥
अपाय तिंहीं आशलुग। यातना इंहीं सवंग। हाणी हाणी नोहे हे तिघ। हेचि हाणी॥ ४२९॥

काय बहु बोलूं सुभटा। सांगीतलिया निकृष्टा। नरकाचा दारवंटा। त्रिशंकु हा॥ ४३०॥
या कामक्रोधलोभां-। माजि जीवें जो होय उभा। तो निरयपुरींची सभा। येथ पावे॥ ४३१॥
म्हणौनि पुढतपुढती किरीटी। हे कामादिदोषत्रिपुटी। त्यजावीचि गा वोखटी। आघवां विषयीं॥ ४३२॥

अर्थ—काम, क्रोध, लोभ या तिघांचा समुदाय जेथे होतो, तेथेच पापकर्म पिकते, असे जाण. ॥ ४२५ ॥ अर्जुना! कोणालाही आपल्या संपूर्ण दु:खस्वरूपाचे दर्शन करून देण्याकरिता यांना वाटाडे नेमले आहे. ॥ ४२६ ॥ काम, क्रोध, लोभ हे तिघे म्हणजे जगामध्ये पापी लोकांना त्यांच्या पापकर्मांचा भोग म्हणून नरकात घालणारी पातकांची एक समर्थ सभाच होय. ॥ ४२७ ॥ काम, क्रोध, लोभ हे जोपर्यंत अंत:करणात उत्पन्न होत नाहीत, तोपर्यंत रौरवादी नरक हे शाब्दिक असे परोक्षच राहतात. ॥ ४२८ ॥ या तिघांच्या योगाने अपाय सोपे झाले आहेत व दु:ख स्वस्त झाले आहे, म्हणून मार! मार! नव्हे तर ह्या तिघांनाच मार. ॥ ४२९ ॥ हे उत्तम योद्ध्या अर्जुना! काय सांगू! वर सांगितलेल्या निकृष्ट नरकांचा, हा त्रिशंकू, दारवंठाच आहे. ॥ ४३० ॥ जो कोणी काम, क्रोध, लोभ या तिघांमध्ये जीवभावाने उभा राहतो-म्हणजे जो सर्वस्वी त्यांच्या स्वाधीन होऊन राहतो-तो यमपुरीची सभा येथे जिवंतपणीच पाहतो. ॥ ४३१ ॥ म्हणून, हे अर्जुना! काम, क्रोध, लोभ ही दोषरूपी त्रिपुटी अत्यंत अपायकारकच असल्यामुळे सर्व बाबतीत तिचा त्याग करावा, हेच वारंवार सांगणे आहे. ॥ ४३२ ॥

एतैर्विमुक्तः कौन्तेय तमोद्वारैस्त्रिभिर्नरः । आचरत्यात्मनः श्रेयस्ततो याति परां गतिम्॥ २२॥

अर्थ—अर्जुना! जो पुरुष तमोरूपी अधोगतीचे द्वार असलेल्या या तिघांपासून मुक्त होतो, तो आपणच आपले कल्याण करून घेतो, व मग परमगतीला प्राप्त होतो. ॥ २२ ॥

धर्मादिकां चौंहीआंत। पुरुषार्थांची तैंचि मात। करावी जैं संघात। सांडील हा॥ ४३३॥
हे तिन्ही जीवीं जंव जागती। तंववरी निकियाची प्राप्ती। हे माझे कान नाइकती। देवही म्हणे॥ ४३४॥
जया आपणपें पढिये। आत्मनाशा जो बिहे। तेणें न धरावी हे सोये। सावध होइजे॥ ४३५॥
पोटीं बांधोनि पाषाण। समुद्रीं बाहीं आंगवण। कां जियावया जेवण। काळकूटाचें॥ ४३६॥
इंहीं कामक्रोधलोभेंसी। कार्यसिद्धि जाण तैसी। म्हणौनि ठावोचि पुसीं। ययांचा गा॥ ४३७॥

अर्थ—जेव्हा मनुष्य काम, क्रोध, लोभ या तिघांचा समुदाय नि:शेष सोडील तेव्हाच धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चार पुरुषार्थांपैकी कोणत्याही पुरुषार्थाच्या प्राप्तीची गोष्ट त्याला करता येईल. ॥ ४३३ ॥ हे तिन्ही दोष जोपर्यंत अंत:करणात जागृत असतात, तोपर्यंत कल्याण झाल्याची वार्ता माझे कान ऐकत नाहीत, असे देवही म्हणतात. ॥ ४३४ ॥ ज्याला आत्मस्वरूपाचे प्रेम आहे व आत्मविस्मृती होऊ नये म्हणून जो भितो, त्याने यांचा आश्रय करू नये. यांच्यापासून नेहमी सावध राहावे. ॥ ४३५ ॥ ज्याप्रमाणे पोटाला दगड बांधून हाताच्या सामर्थ्यावर समुद्रात पोहावे किंवा जिवंत राहण्याकरिता काळकूट विष सेवन करावे. ॥ ४३६ ॥ त्याप्रमाणे काम, क्रोध, लोभ यांच्या संगतीने पुरुषार्थसिद्धीचा प्रयास करणे होय, असे जाण. म्हणून यांचा ठावठिकाणादेखील राहू देऊ नकोस. ॥ ४३७ ॥

जैं कहीं अवचटें। हे तिकडी सांखळ तुटे। तैं सुखें आपुलिये वाटे। चालों लाभे॥ ४३८॥
त्रिदोषीं सांडिलें शरीर। त्रिकुटीं फिटलिया नगर। त्रिदाह निमालिया अंतर। जैसें होय॥ ४३९॥
तैसा कामादिकीं तिघीं। सांडिला सुख पावोनि जगीं। संग लाहे मोक्षमार्गीं। सज्जनांचा॥ ४४०॥
मग सत्संगें प्रबळें। सच्छास्त्राचेनि बळें। जन्ममृत्यूचीं निमाळें। निस्तरे रानें॥ ४४१॥
ते वेळीं आत्मानंदें आघवें। जें सदा वसतें बरवें। तें तैसेंचि पाटण पावे। गुरुकृपेचें॥ ४४२॥
तेथ प्रियाची परमसीमा। तो भेटे माउली आत्मा। तये खेवीं आटे डिंडिमा। सांसारिक हे॥ ४४३॥
ऐसा जो कामक्रोधलोभां। झाडी करूनि ठाके उभा। तोचि येवढिया लाभा। गोसावी होय॥ ४४४॥

अर्थ—यदाकदाचित ही तीन कड्यांची साखळी तुटली, तरच आपल्याला आपल्या इष्ट मार्गाने चालू लागता

येईल. ॥ ४३८ ॥ त्रिदोषांचा प्रकोप शांत झाला असता जसे शरीर, चोरी, चाहाडी, शिंदळकी हे तीन नाहीसे झाले असता जसे नगर व आधिभौतिक, आधिदैविक व आध्यात्मिक हे तिन्ही ताप नाहीसे झाले असता जसे अंत:करण शांत होते, ॥ ४३९ ॥ त्याप्रमाणे काम, क्रोध, लोभ या तिघांपासून मुक्त झालेला पुरुष जगात परम समाधान पावून मोक्षमार्गात जात असताना त्याला सज्जनांचा संग लाभतो. ॥ ४४० ॥

(टीप–मोक्षमार्गाची पहिली पायरी म्हणजे संतसंगाचा लाभ होय.)

मग प्रबळ संतसंग व सच्छास्त्राचे बळ यांच्या योगाने तो जन्ममृत्युरूपी बरड अरण्यातून पार पडतो, ॥ ४४१ ॥ तेव्हा त्याला सदा संपूर्ण आत्मानंदाने भरले असलेले गुरुकृपारूपी शहर प्राप्त होते, ॥ ४४२ ॥

(टीप–गुरुकृपा फलद्रूप होण्याकरिता शिष्यही अधिकारीच पाहिजे.)

तेथे, जो प्रेमाची परमसीमा होय त्या मायबाप आत्म्याची भेट होते व त्या आत्मस्वरूपाला आलिंगन दिले असता संसाराचा नगारा बंद पडतो. ॥ ४४३ ॥ अशा या काम–क्रोध–लोभांना जो नि:शेष झाडून टाकून एकटा राहील, तोच या परम लाभाचा स्वामी होतो. ॥ ४४४ ॥

य: शास्त्रविधिमुत्सृज्य वर्तते कामकारत: । न स सिद्धिमवाप्नोति न सुखं न परां गतिम्॥ २३॥

अर्थ—जो शास्त्रविधीचे उल्लंघन करून कामवासनेप्रमाणे स्वैर वर्तन करतो, तो शुद्धचित्त होऊन परमार्थाचा योग्य अधिकारी होत नाही. त्याला सुखही प्राप्त होत नाही, मग परमेश्वरप्राप्तिरूप परमगती प्राप्त होत नाही, हे काय सांगायचे? ॥ २३ ॥

ना हें नावडोनि कांहीं। कामादिकांच्याचि ठायीं। दाटिली जेणें डोई। आत्मचोरें॥ ४४५॥
जो जगीं समान सकृप। हिताहित दाविता दीप। तो अमान्य केला बाप। वेद जेणें॥ ४४६॥
न धरीचि विधीची भीड। न करीचि आपली चाड। वाढवीत गेला कोड। इंद्रियांचें॥ ४४७॥
कामक्रोधलोभांची कास। न सोडीच पाळिली भाष। स्वैराचाराचें असोस। वळघला रान॥ ४४८॥
तो सुटकेचिया वाहिणीं। मग पिवों न लाहे पाणी। स्वप्नींही ते सुखकाहाणी। दूरीचि तया॥ ४४९॥
आणि परत्र तंव जाये। हें कीर तया आहे। परी ऐहिकही न लाहे। भोग भोगूं॥ ४५०॥
तरि माशालागीं भुलला। ब्राह्मण पाणबुडां रिघाला। कीं तेथही पावला। नास्तिकवाद॥ ४५१॥

अर्थ—किंवा हे शास्त्रांनी सांगितलेले काही न आवडून जो आत्मघातकी आपले डोके कामादिकांच्या ठिकाणीच खुपसून राहतो, ॥ ४४५ ॥ जो जगामध्ये सर्वांवर सारखीच कृपा करणारा आहे, हित कोणते, अहित कोणते, हे दाखविणारा जो दीप होय, तो मायबाप वेद ज्याने झुगारून दिला, ॥ ४४६ ॥ जो वेदाने सांगितलेल्या विधीची पर्वा करीत नाही, जो आपल्या कल्याणाचीही चिंता करीत नाही, केवळ इंद्रियांचेच लाड पुरवीत जातो, ॥ ४४७ ॥ जो काम–क्रोध–लोभांची कास सोडत नाही व त्यांचा शब्द मोडत नाही व स्वैराचाररूपी अफाट रानात भटकतो, ॥ ४४८ ॥ तो जन्ममरणातून होणाऱ्या सुटकारूपी प्रवाहातील पाणी पिऊ शकत नाही. एवढेच नाही तर स्वप्नात देखील सुखाची कहाणी त्याला दूरच राहते ॥ ४४९ ॥ आणि त्याचा परलोक अंतरतो हे निश्चित आहे, पण ऐहिक भोगही तो सुखाने भोगू शकत नाही. ॥ ४५० ॥ ज्याप्रमाणे ब्राह्मण कुसंगतीने मत्स्याहाराच्या मोहात पडून कोळ्याच्या धंद्यात शिरला व शेवटी नास्तिक झाला. ॥ ४५१ ॥

तैसें विषयांचेनि कोडें। जेणें परत्रा केलें उबडें। तंव तोचि आणिकीकडे। मरणें नेला॥ ४५२॥
एवं परत्र ना स्वर्ग। ना ऐहिकही विषयभोग। तेथ केउता प्रसंग। मोक्षाचा तो॥ ४५३॥
म्हणौनि कामाचेनि बळें। जो विषय सेवूं पाहे सळें। तया विषय ना स्वर्ग मिळे। ना उद्धारे तो॥ ४५४॥

अर्थ—त्याप्रमाणे ज्याने विषयाच्या प्रेमाने परलोक घालविला व पुढे मरणानंतर भलतीकडेच गेला ॥ ४५२ ॥ अशा रितीने संसाराच्या पैलतीरास पोहोचला नाही, स्वर्ग मिळवला नाही व ऐहिक विषयभोगही भोगले नाहीत,

तेव्हा मग मोक्षप्राप्ती कोठून आली ? ॥ ४५३ ॥ म्हणून कामवासनेला बळी पडून हट्टाने विषयसेवनच जो करू लागतो, त्याला इच्छेप्रमाणे विषयसुख मिळत नाही, स्वर्गसुख मिळत नाही किंवा त्याला मोक्षप्राप्ती होत नाही. ॥ ४५४ ॥

तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ । ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि ॥ २४ ॥

ॐतत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे
दैवासुरसम्पद्विभागयोगो नाम षोडशोऽध्यायः ॥ १६ ॥

अर्थ—काय केले पाहिजे व काय करता कामा नये यांचा निश्चय करण्याकरिता तुला शास्त्रच प्रमाण मानले पाहिजे; म्हणून शास्त्रांनी सांगितलेले विधान जाणून घेऊन तसे कर्म करण्यास तू योग्य आहेस. ॥ २४ ॥

गूढार्थदीपिका—येथे कर्तव्य कोणते व अकर्तव्य कोणते हे शास्त्रांना प्रमाण मानूनच जाणता येते, असे भगवंतांनी अर्जुनाला सांगितले असल्यामुळे व गीतेत या कर्तव्याकर्तव्याचा उलगडा केला नसून निष्कामचित्ताने कर्मानुष्ठान केले असता तेच चित्तशुद्धीद्वारा भगवंताला प्राप्त करून देणारे कसे होते, एवढेच सांगितले असल्यामुळे 'शास्त्र' हा शब्द गीतेला उद्देशून ग्रंथकाराने योजिला नसून ज्या वेदभागात श्रुती-पुराण इत्यादी ग्रंथातून कर्तव्याकर्तव्याचा ऊहापोह केलेला आहे, त्या ग्रंथांना उद्देशूनच योजिला गेला आहे, हे स्पष्ट होते.

याकारणें पैं बापा। जया आथी आपली कृपा। तेणें वेदांचिया निरोपा। आन न कीजे॥ ४५५ ॥

अर्थ—म्हणून हे बापा अर्जुना! ज्याला स्वतःची दया येते, त्याने वेदाची आज्ञा कधी मोडू नये. ॥ ४५५ ॥

गूढार्थदीपिका—वेद-शास्त्रे ही ईश्वरप्रणीत आहेत. त्यांनी सर्व आपल्या हिताचेच सांगितले आहे, तसेच ती अपेक्षारहित हित करणारी असल्यामुळे त्यांच्याविषयी शंका घेण्याला जागा नाही, असा भाव.

पतीचिया मता। अनुसरोनि पतिव्रता। अनायासें आत्महिता। भेटेचि ते॥ ४५६ ॥
ना तरी श्रीगुरुवचना। दिठी देतु जतना। शिष्य आत्मभुवना-। माजि पैसे॥ ४५७ ॥
हें असो आपुला ठेवा। हाता आथी जरी यावा। तरी आदरें जेविं दिवा। पुढां कीजे॥ ४५८ ॥
तैसा अशेषांही पुरुषार्था। जो गोसांवी हो म्हणे पार्था। तेणें श्रुतिस्मृती माथां। बैसणें घापे॥ ४५९ ॥
शास्त्र म्हणेल जें सांडावें। तें राज्यही तृण मानावें। जें घेववी तें न म्हणावें। विषही विरु॥ ४६० ॥
ऐसिया वेदैकनिष्ठा। जालिया जरी सुभटा। तरि कें आहे अनिष्टा। भेटणें गा॥ ४६१ ॥
पैं अहितापासूनि काढिती। हित देऊनी वाढविती। नाहीं श्रुतीपरौती। माउली जगा॥ ४६२ ॥

अर्थ—पतिव्रता स्त्री आपल्या पतीच्या मनोगताप्रमाणे वागून अनायासे ज्याप्रमाणे आपले आत्महित साधून घेते ॥ ४५६ ॥ किंवा शिष्य आपल्या गुरूची आज्ञा पाळण्याकडे दृष्टी देईल तर तो जसा आत्मरूपी मंदिरात प्रवेश करतो. ॥ ४५७ ॥ हे असो. आपण ठेवलेले धन सापडावे अशी इच्छा असल्यास ज्याप्रमाणे अगत्याने दिवा पुढे केला पाहिजे, ॥ ४५८ ॥ त्याप्रमाणे अर्जुना! संपूर्ण पुरुषार्थ प्राप्त व्हावे अशी इच्छा करणाऱ्याने श्रुतिस्मृती ह्या शिरसावंद्य मानल्या पाहिजेत. ॥ ४५९ ॥ शास्त्रांनी जे टाकावे म्हणून म्हटले असेल ते आवडते राज्य असले तरी तृणाप्रमाणे तुच्छ समजून त्याचा त्याग करावा आणि ज्याचा स्वीकार करावा असे म्हटले असेल ते विष असले तरी, ते अहितकारक होईल, असे मनातही आणू नये. ॥ ४६० ॥ अशा रितीने वेद-शास्त्रे यांना जो एकनिष्ठ होतो, अर्जुना! त्याचे अकल्याण कधीच होत नाही. ॥ ४६१ ॥ अकल्याणापासून मागे वळविणारी, कल्याण करून पोषण करणारी, अशी श्रुतीशिवाय जगाला दुसरी माता नाही. ॥ ४६२ ॥

म्हणौनि ब्रह्मेंसीं मेळवी। तंव हे कोणहें न सांडावी। अगा तुवांही ऐसी भजावी। विशेषेंसीं॥ ४६३ ॥

अर्थ—आपले परब्रह्माशी ऐक्य होईपर्यंत तिचा कोणी त्याग करू नये आणि अर्जुना! तूही विशेषेकरून तिचा असा आदर केला पाहिजे. ॥ ४६३ ॥

गूढार्थदीपिका—परब्रह्माशी ऐक्य होईपर्यंत श्रुतिस्मृतींचा त्याग केल्यास मनुष्य सर्वस्वी स्वैरवर्ती होऊन त्याचे ठिकाणी रजतम वाढतात आणि परब्रह्माशी ऐक्य झाल्यावर बळेच श्रुतिस्मृतींचा त्याग करील तर, ज्ञानाहंकार वाढून तो देहाहंकारापर्यंत येतो. म्हणून ब्रह्मैक्यापूर्वी श्रुतिस्मृतींची आज्ञा पाळावी व ब्रह्मैक्यानंतर पूर्व अभ्यासानुसार इंद्रियांना शास्त्रानुरूप वागू द्यावे. असे केले असताच जीवन्मुक्तस्थिती अंगी वागते.

जे आजि अर्जुना तूं येथें। करावया सत्य शास्त्रें सार्थें। जन्मलासि बळार्थें। धर्माचेनि॥ ४६४॥
आणि धर्मानुज हें ऐसें। ओघेंचि आलें आपैसें। म्हणौनि अनारिसें। करूं नये॥ ४६५॥
कार्याकार्यविवेकीं। शास्त्रेंचि करावीं पारखीं। अकृत्य तें कुडें लोकीं। वाळावें गा॥ ४६६॥
मग कृत्यपणें खरें निगे। तें तुवां आपुलेनि आंगें। आचरोनि आदरें चांगें। सारावें गा॥ ४६७॥
जे विश्वप्रामाण्याची मुदी। आजि तुझ्या हातीं असे सुबुद्धी। लोकसंग्रहासी त्रिशुद्धी। योग्य होसी॥ ४६८॥

अर्थ—कारण अर्जुना! तू या लोकात धर्माचरणाच्या बळावर शास्त्रें सार्थ व सत्य करून दाखविण्याकरिता जन्मला आहेस॥ ४६४॥ आणि ओघानेच तुला 'धर्माचा धाकटा भाऊ' असे नाव प्राप्त झाले आहे; म्हणून तू धर्मशास्त्र सोडून वागणे योग्य नव्हे. ॥ ४६५॥ काय करावे, काय करू नये यांचा निवाडा शास्त्रावरूनच करावा आणि जगात, करू नये म्हणून सांगितले असेल, अशा निंद्य कर्माचा त्याग करावा. ॥ ४६६॥ मग करावे म्हणून जे यथार्थ ठरेल त्याचे तू स्वतः श्रद्धायुक्त अंतःकरणाने आचरण करून ते पुरे करावे. ॥ ४६७॥ कारण, हे शुद्धबुद्धी अर्जुना! लोकसंग्रह करण्यास–म्हणजे लोकांना धर्मशास्त्रानुसार लावण्यास–तू योग्य असल्यामुळे आज सर्व जगाला शास्त्राचे प्रामाण्य पटवून देण्याचा अधिकार तुझ्या हाती आहे. ॥ ४६८॥

गूढार्थदीपिका—शास्त्रैकनिष्ठ वर्तनाने चित्तात रागद्वेषादिक विकारांना उत्पन्न होण्यास अवसर राहात नाही व हे उत्पन्न झाले नाहीत म्हणजे चित्ताची शुद्धी झाली असे म्हटले जाते. याप्रमाणे आपले चित्त शुद्ध झाले असता कर्माने चित्तशुद्धी कशी होते व शास्त्रे प्रमाण कशी आहेत, हे लोकांना पटवून देता येते.

एवं आसुरवर्ग आघवा। सांगोनि तेथींचा निगावा। तोही देवें पांडवा। निरूपिला॥ ४६९॥
इयावरी तो पंडूचा। कुमर सद्भाव जीवींचा। पुसेल तो चैतन्याचा। कानीं ऐका॥ ४७०॥
संजयें व्यासाचिया निरोपा। तो वेळ फेडिला तया नृपा। तैसा मीही निवृत्तिकृपा। सांगेन तुम्हां॥ ४७१॥
तुम्ही संत माझिया कडा। दिठीचा कराल बहुडा। तरि तुम्हां माने येवढा। होईन मी॥ ४७२॥
म्हणौनि निज अवधान। मज वोळगें पसायदान। दीजो जी सनाथ होईन। ज्ञानदेव म्हणे॥ ४७३॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां षोडशोऽध्यायः॥ १६॥

अर्थ—याप्रमाणे संपूर्ण आसुरी संपत्तीच्या लोकांचे वर्णन केले गेले व त्यातून निघण्याचा मार्गही देवांनी पांडवाला सांगितला. ॥ ४६९॥ असे भगवंतांनी निरूपण केले असता पांडूचा कुमार जो अर्जुन तो, आपल्या अंतःकरणातील सद्भाव भगवंताला विचारील. तो संवाद पुढे पूर्ण जागृत राहून ऐका. ॥ ४७०॥ जसा व्यासांच्या आज्ञेप्रमाणे संजयांनी राजा धृतराष्ट्राला प्रसंग निरूपण करण्यात वेळ घालविला, त्याप्रमाणे श्रीनिवृत्तिनाथांच्या कृपेने मीही तुम्हाला सांगेन. ॥ ४७१॥ तुम्ही संतजन माझ्याकडे आपली पूर्ण कृपादृष्टी कराल तर, मीही तुमच्या सारखा थोर होईन. ॥ ४७२॥ म्हणून श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात, की तुमचे सर्व लक्ष एका माझ्या निरूपणाकडेच राहील असा कृपाप्रसाद करा, म्हणजे मी धन्य होईन. ॥ ४७३॥

श्रीसद्गुरुकृपेने श्रीज्ञानेश्वरीच्या सोळाव्या अध्यायाचा मराठी अनुवाद गूढार्थदीपिकेसह पूर्ण झाला, तो त्यांचे चरणी समर्पण असो.

समारोप

मागील पंधराव्या अध्यायात भगवंतांनी वृक्षाच्या रूपक परिभाषेने संपूर्ण उपाधीचे वर्णन करून मायेला आधार होणाऱ्या चैतन्यालाही मर्यादा आहे, असे दाखविले. नंतर उत्तमपुरुष हे नाव देऊन निरुपाधिक आत्मस्वरूपाचे वर्णन केले व आत्मप्राप्तीला अंतरंग साधन ज्ञान आहे, हेही सांगितले.

आता त्या ज्ञानाला पोषक अशी दैवी संपत्ती व त्याच्या विरुद्ध जी आसुरी संपत्ती त्यांचे भगवान या सोळाव्या अध्यायात निरूपण करतात.

भगवान म्हणतात, अर्जुना! देवांच्या ठिकाणी असणाऱ्या एका सत्त्वगुणाचाच आश्रय धरून राहणारी म्हणून जिला दैवी संपत्ती म्हणतात, ती सांगतो, ऐक.

भीती सोडणे, चित्तशुद्धी, ज्ञान व योग यांचे ठिकाणी तत्परता, दान, इंद्रियनिग्रह, यज्ञयागादी, वेद-शास्त्रादिकांचे अध्ययन, तप, मनाचा सरळपणा, कोणालाही काया-वाचा-मनाने दुःख न देणे, क्रोध न करणे, वस्तूवरील ममता सोडणे, प्राणिमात्रांवर दया करणे, विषय सन्निध असता चित्त विकारी न होणे, अंतःकरणाचा कोमलपणा, निंद्यकर्माची लाज वाटणे, चित्ताची स्थिरता, तेजस्वीपणा, अपराधाची क्षमा करणे, व अतिमानिता नसणे, इत्यादी असे हे सव्वीस गुण दैवी संपत्तीच्या पुरुषाचे ठिकाणी असतात. आता आसुरी संपत्तीच्या पुरुषाची लक्षणे सांगतो, ऐक.

धार्मिकतेची दिखाई, गर्व, अहंकार, क्रोध, कठोर भाषण आणि अज्ञान अशी ही सहा लक्षणे आसुरी संपत्तीच्या पुरुषाच्या ठिकाणी असतात.

दैवी संपत्ती मुक्त करणारी असून आसुरी संपत्ती बंधन करणारी आहे. या लोकात दैवी संपत्ती व आसुरी संपत्ती घेऊन जन्मलेल्या पुरुषांची राहाटी अनादिसिद्धच आहे. दैवी संपत्ती असलेल्या पुरुषाची राहाटी मागे तेराव्या अध्यायात अमानित्वादी लक्षणांनी सविस्तर वर्णन केली. आता आसुरी संपत्ती असणाऱ्या पुरुषांची राहाटी भगवान सविस्तर सांगतात.

अर्जुना! हे आसुरी लोक शास्त्रात सांगितलेला विधी-आचार काहीच जाणत नाहीत. शुद्धी, सत्यता हे त्यांना माहीत नसते. पाप-पुण्य-ईश्वर हे ते काही मानीत नाहीत. जगाच्या उत्पत्तीला स्त्री-पुरुष कामवासनेवाचून दुसरा हेतू नाही, असे ते म्हणतात. कधी तृप्त होणार नाही, असा काम वाढवून, दंभ, मान व मद यांनी युक्त होऊन व अशुभ निश्चय करून अमंगल व्रते करण्यास ते प्रवृत्त होतात. अपार चिंता वाढवून ते विषयभोगच सर्वस्व मानतात. शेकडो आशापाशांनी ते बद्ध असतात. अन्यायाने विपुल संपत्तीचा साठा मिळविण्याचा ते प्रयत्न करतात. आज हे धन मिळाले, उद्या आणखी मिळवावे अशा प्रयत्नात ते असतात. अनेक विषयभोगांच्या ठिकाणी ते आसक्त होतात. शास्त्रविधी सोडून ते नाममात्र यज्ञ करतात. पतिव्रता, सत्पुरुष, दानशूर, निष्काम यज्ञयागादी कर्म करणारे तपस्वी वगैरे लोकांचा ते द्वेष करतात. अशा त्या द्वेष करणाऱ्यांना, भगवान म्हणतात, मी आसुरी योनीतच जन्माला घालतो.

या सर्व आसुरी संपत्तीत काम, क्रोध व लोभ हे तीन मुख्य असून हीच नरकाची द्वारे होत. म्हणून या तिघांचा अर्जुना! तू नाश कर. जो या तिघांपासून मुक्त होतो, तोच आपले कल्याण करून घेतो.

शास्त्रविधीला सोडून विषयसुखाच्या वासनेप्रमाणे जे स्वैर वर्तन करतात, त्यांना इह-परसुख तर मिळत नाहीच, मग परमेश्वरप्राप्ती कोठून होणार! म्हणून भगवान म्हणतात, अर्जुना! कर्तव्य कोणते व अकर्तव्य कोणते हे श्रुति-स्मृति-पुराणादी शास्त्रांवरून जाणून घेऊन तसे तू वर्तन कर. स्वैर वर्तन करू नकोस.

॥ श्रीमत्सद्गुरू श्रीज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

॥ श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ॥

अध्याय सतरावा

विश्वविकासित मुद्रा। जया सोडवी तुझी योगनिद्रा। तया नमो जी गणेंद्रा। श्रीगुरुराया॥ १॥

अर्थ—हे श्रीगुरो गणराया! ज्या तुझ्या नामरूपात्मक विश्वास विकास करणाऱ्या मुद्रेच्या योगाने तुझी योगनिद्रा सोडविली जाते, त्या तुला नमस्कार असो. ॥ १ ॥

गूढार्थदीपिका—येथे परब्रह्माशी पूर्ण ऐक्य ठेवून श्रीगुरूचे स्तवन केले आहे.

''विश्वविकासितमुद्रा'' या चरणाने श्रीगुरुपरब्रह्माच्या साकार विद्याप्रपंचरूप लीलेचा उल्लेख केला असून ''योगनिद्रा'' या शब्दाने श्रीगुरूच्या ज्ञान-अज्ञानरहित निराकार अशा निर्विकल्प समाधिस्थितीचा उल्लेख केला आहे.

(टीप-**विद्याप्रपंच**-म्हणजे नामरूपात्मक प्रपंचाचा सच्चिदानंदरूपाने प्रत्यय येणे.)

''**तस्मात् परब्रह्मणः परमार्थतः साकारनिराकारौ स्वभावसिद्धौ**''परब्रह्म श्रीगुरूच्या साकार, निराकार अशा दोन्ही प्रकारच्या लीला स्वयंसिद्ध आहेत व त्या डोळ्यांच्या उघड-झापीप्रमाणे पाठोपाठ होत असतात, असे त्रिपादमहानारायणोपनिषदात सांगितले आहे व तेच येथे माउलींनी सूचित केले आहे.

गणेंद्रा-सर्व विघ्नांच्या समुदायाचा स्वामी किंवा प्रकृती एक, महत्, अहंकार व पंचतन्मात्रा हे सात आणि सोळा कार्यरूप तत्त्वे या गणांचा नियंता-स्वामी.

त्रिगुणत्रिपुरीं वेढिला। जीवत्वदुर्गीं आडिला। तो आत्मशंभू सोडविला। तुझिया स्मृती॥ २॥

अर्थ—जो आत्मशंभू त्रिगुणरूप त्रिपुरासुराने वेढला गेल्यामुळे जीवत्वरूपी किल्ल्यात अडकला गेला, त्याला तू त्याच्या मूळच्या स्वरूपाची स्मृती करून देऊन मुक्त केलेस. ॥ २ ॥

म्हणोनि शिवेंसी कांटाळा। गुरुत्वें तूंचि आगळा। तन्ही हळु मायाजाळा-। माजि तारुनी॥ ३॥

अर्थ—म्हणून शिवाशी तुझी तुलना करून पाहिली असता गुरुरूपाने तूच विशेष ठरतोस, तरीपण मायाजाळातून तारत असल्यामुळे तू हलकाच आहेस. ॥ ३ ॥

जे तुझ्याविखीं मूढ। तयांलागीं तूं वक्रतुंड। ज्ञानियांसि तरी अखंड। उजूचि आहासी॥ ४॥

अर्थ—जे तुला जाणत नाहीत व तुझे भजन करीत नाहीत अशा अज्ञान्यांना तू तोंड वाकडे केलेला म्हणजे आपल्याकडे पाहत नाही, असा वाटतोस व तुझ्या स्वरूपाला जाणणाऱ्या ज्ञान्याला तू सरळ आहेस-म्हणजे तूच सर्वतोपरी सांभाळ करणारा आहेस, असा वाटतोस. ॥ ४ ॥

गूढार्थदीपिका—अज्ञान्याला परमात्मा दुःखदाता वाटतो तर सज्ञान्याला सुखदाता वाटतो असा अर्थ. ''**प्रपंचोऽपि द्विविधः। विद्याप्रपंचश्चाविद्याप्रपंचश्चेति। विद्याप्रपंचस्य नित्यत्वं सिद्धमेव नित्यानंदचिद्विलासात्मकत्वात्**''

विद्याप्रपंच व अविद्याप्रपंच असा दोन प्रकारचा प्रपंच आहे. विद्याप्रपंच हा अखंड आनंदरूप व चिद्विलासरूप असल्यामुळे नित्य आहे. या प्रपंचाचा अनुभव ज्ञानी भक्ताला येतो. भगवान याच प्रपंचरूपाने नटतात. अज्ञानी पुरुषांना हाच प्रपंच त्यांच्या अज्ञानामुळे जड, विनाशी, दुःखदायक म्हणून अविद्यात्मक असा विपरीत अनुभवाला येतो.

दैविकी दिठी पाहतां सानी। तन्ही मीलनोन्मीलनीं। उत्पत्ति प्रलय दोन्ही। लीलाचि करिसी॥ ५॥

अर्थ—हे श्रीगुरो गणराया! तुज देवाची दृष्टी दिसायला लहान दिसते, तरीपण तिच्या उघडझापीमध्ये जगाची उत्पत्ती व लय लीलेनेच होतात. ॥ ५ ॥

गूढार्थदीपिका—मीलनोन्मीलन- ''प्रत्यग्दृष्ट्या स्वस्वरूपचिंतनमेव निमेषः। परागदृष्ट्या स्वस्वरूपचिंतनमेवोन्मेषः''

अंतर्मुख दृष्टीने केवळ आत्मचिंतन करणे याला निमेष म्हणतात व बहिर्भूत दृष्टीने स्वस्वरूपचिंतन करणे याला उन्मेष म्हणतात.

निमेष व उन्मेष या दोन्ही वेळी भगवंताचे स्वात्मचिंतनच असते.

''कदाचिदात्मारामस्याखिलपरिपूर्णस्यादिनारायणस्य स्वेच्छानुसारेणोन्मेषो जायते तथाविधस्याद्वैतपरमानंद-लक्षणस्यादिनारायणस्योन्मेषनिमेषाभ्यां मूलाविद्योदयस्थितिलया जायन्ते''

परिपूर्ण अद्वैतानंदरूप आदिनारायणाचा उन्मेष झाला असता त्याच्या ठिकाणी लीन असलेले अनादिमायामोहित जीव, माया व सर्व प्रपंच यांच्या, उदयस्थितीचा व कल्पाचा, मायाभ्रांतीमुळे अनुभव घेतात व निमेष झाला असता जीवाला प्रलयाचा अनुभव येतो.

प्रवृत्तिकर्णाच्या चाळीं। उठिलीं मदगंधानिळीं। पूजीजसी नीळोत्पळीं। जीवभृंगाच्या॥ ६॥

अर्थ—तुम्ही आपला प्रवृत्तिरूपी कान चाळविला असता त्याच्या योगाने गंडस्थळातून वाहणाऱ्या मदाच्या सुगंधाने युक्त असा जो वारा सुटतो, त्याने आकृष्ट होऊन तुझ्या गंडस्थलावर जमलेल्या जीवभृंगाने वाहिलेल्या नीलकमलांनी तू पूजिला जातोस. ॥ ६ ॥

गूढार्थदीपिका—भगवंतांनी प्रगट केलेल्या प्रवृत्तिमार्गातील विषयसुखाला भुलून जीव भगवंताचे कामनिक पूजन करतात.

पाठीं निवृत्तिकर्णताळें। आहालली ते पूजा विधूळे। तेव्हां मिरविसी मोकळें। आंगाचें लेणें॥ ७॥

अर्थ—नंतर दुसऱ्या निवृत्तिरूप कर्णाच्या हालचालीने, बांधलेली पूजा विसकटली जाऊन तू आपले शुद्ध स्वरूप प्रकट करतोस. ॥ ७ ॥

गूढार्थदीपिका—निवृत्तिरूप निष्कामकर्माने शुद्ध परमेश्वराचा साक्षात्कार होतो, असा अर्थ.

वामांगीचा लास्यविलास। जो हा जगद्रूप आभास। तो तांडवमिसें कळास। दाविसी तूं॥ ८॥

अर्थ—जो हा जगद्रूप आभास चैतन्यशक्तिरूप भार्येचे नृत्यच होय, तो तू तांडवनृत्याच्या मिषाने नाना प्रकारच्या नृत्यांच्या कला दाखवितोस. ॥ ८ ॥

गूढार्थदीपिका—''स्त्रीनृत्यं लास्यमुच्यते'' स्त्रियांच्या नृत्याला लास्य म्हणतात.

हें असो विस्मयदातारा। तूं होसी जयाचा सोयरा। सोइरिकेचिया व्यवहारा। मुकेचि तो॥ ९॥

अर्थ—हे असो. हे मायबापा श्रीगुरो! हे आश्चर्य आहे की, तू ज्याचा सोयरा होतोस तो सर्व सोयरिकेच्या संबंधाला मुकतो. ॥ ९ ॥

गूढार्थदीपिका—अद्वैतप्रत्ययामुळे व्यावहारिक सोयरिक संबंधच राहात नाहीत, असा अर्थ.

फेडितां बंधनाचा ठावो। तूं जगद्बंधू ऐसा भावो। धरूं वोळगे उवावो। तुझाचि आंगीं॥ १०॥

अर्थ—तू भवबंधनाचे नावही नाहीसे केले असता ''तू जगद्बंधू आहेस'' असा भाव तुझ्याच ठिकाणी खरा उत्कर्षाला पावतो. ॥ १० ॥

गूढार्थदीपिका—आत्मज्ञान झाल्यावर, सर्व दुःखाचे स्थान, अशा जगताचा नाश करणारे श्रीगुरूच खरे जगद्बंधू-म्हणजे जीवाचे खरे हितकर्ते-होत, असा जीवाला अनुभव येतो.

दुजयाचेनि नांवें तया। देहही नुरेचि पैं देवराया। जेणें तूं आपणपयां। केलासि दुजा॥ ११॥

अर्थ—हे देवराया श्रीगुरो! ज्या देहाच्या ठिकाणी मीपणा स्थापन करून तुला आपल्याहून निराळे मानले गेले, त्या द्वैताचे नाव घेता येईल इतक्यापुरताही देह उरत नाही. ॥ ११ ॥

गूढार्थदीपिका—ज्याप्रमाणे आत्मज्ञानाने देहादी द्वैतपदार्थांचा निरास होऊन ज्ञानवृत्तीने अद्वैत साधले जाते त्याप्रमाणे अद्वैतानंतरही जी आत्मप्रेमवृत्ती राहते, त्या वृत्तीने आत्मा तोच परमात्मा असे समजून प्रेमरूप भक्ती होऊ शकते.

तूतें करूनि पुढें। जे उपायीं घेती दवडे। तयां ठासी बहुवें पाडें। मागांचीं तूं॥ १२॥

अर्थ—तुला समोर करून तुझ्या प्राप्तीकरिता जो नाना प्रकारचे उपाय करतो, त्याच्या तू फार मागे राहतोस. ॥ १२ ॥

गूढार्थदीपिका—परमेश्वराला समोर करून परमेश्वरप्राप्तीचे उपाय केले तरी सर्व उपाय अहंकारानेच होत असल्यामुळे व परमात्मा अहंकाराचा साक्षी असल्यामुळे, तो उपायाने सापडेल, असा कधीच समोर होऊ शकत नाही. तो सदासर्वदा साक्षी राहून मागेच राहतो, असा भाव.

जो ध्यानें सूये मानसीं। तयालागीं नाहीं तूं त्याचे देशीं। ध्यानही विसरे तेणेंसीं। वालभ तुज॥ १३॥

अर्थ—जो तुझे जाणिवेसहित ध्यान करून तुला अंत:करणात साठवू पाहतो, त्याला तू प्राप्त होत नाहीस; पण जो प्रेमाने ध्यानाची जाणीवही विसरतो, तो तुला आवडतो. ॥ १३ ॥

गूढार्थदीपिका—जाणिवेचा अहंकार देखील सगुणाच्या प्राप्तीला प्रतिबंध करतो, असा अर्थ.

तूंतें सिद्धचि जो नेणे। तो नांदे सर्वज्ञपणें। वेदांहीयेवढें बोलणें। नेघसी कानीं॥ १४॥

अर्थ—तू अखंड मायारहित शुद्धच आहेस, असे जो वेद जाणत नाही, तो सर्वज्ञ आहे, असे मानले जाते. पण त्या सर्वज्ञ वेदाचेही एवढे मोठे बोलणे तू कानावर घेत नाहीस. ॥ १४ ॥

गूढार्थदीपिका—अधिष्ठानभूत परमेश्वराचे वेदाने वर्णन केले आहे; पण त्याच्या मायारहित व आनंदविवर्त अशा सगुणस्वरूपाचे तो वर्णन करू शकला नाही, असा अर्थ.

मौन गा तुझें राशिनांव। आतां स्तोत्रीं कें बांधों हाव। दिसती तेतुली माव। भजों काईं॥ १५॥

अर्थ—तुझे राशिनाव मौन आहे–म्हणजे बोलताच येत नाही. तेव्हा तुझी स्तुती करण्याची हाव मी कशी धरू आणि जेवढे दिसते तेवढा सर्व खोटा मायिक पसारा असल्यामुळे मी भजन तरी काय करू?॥ १५ ॥

गूढार्थदीपिका—मौन गा तुझें राशिनांव—नक्षत्रावर जन्मणाऱ्याचे राशिनाव निघत असते; पण परमात्मा जन्मनाशरहित व शब्दाच्या पलीकडे असल्यामुळे त्याला राशी नाही व राशिनावही नाही, हेच माउलीने ''मौन गा तुझे राशिनांव'' या पदाने सुचविले आहे.

दैविकें सेवक हों पाहों। तरि भेदितां द्रोहचि लाहों। म्हणोनि आतां कांहीं नोहों। तुजलागीं जी॥ १६॥
जैं सर्वथा सर्वही नोहिजे। तैं अद्वया तूतें लाहिजे। हें जाणें मी वर्म तुझें। आराध्यलिंगा॥ १७॥
तरि नुरोनि वेगळेपण। रसीं भजिंनलें लवण। तैसें नमन माझें जाण। बहु काय बोलों॥ १८॥

अर्थ—तुज देवाचा सेवक म्हणून राहावे, असे म्हटले तर तुला आपल्याहून भिन्न समजून राहावे लागत असल्यामुळे तो तुझा द्रोहच होईल; म्हणून महाराज! तुमच्याशी कोणताही संबंध न मानणेच उत्तम. ॥ १६ ॥ आराधना करण्यास योग्य हेच ज्याचे चिन्ह आहे, अशा श्रीगुरो! सर्वथा कोणत्याही प्रकारे तुझ्याशी संबंध जोडला गेला नाही, तरच तुज अफुट अद्वैतस्वरूपाची प्राप्ती होऊ शकते. ही तुझ्या प्राप्तीची खूण मी पूर्णपणे जाणत आहे. ॥ १७ ॥ फार काय बोलू! ज्याप्रमाणे मीठ यत्किंचितही वेगळेपणाने न राहता पाण्याशी ऐक्याच्या जाणिवेवाचून एकरूप होऊन राहते, त्याप्रमाणे माझे हे नमन आहे, असे जाण. ॥ १८ ॥

गूढार्थदीपिका—तैसें नमन माझें जाण-येथे माउलीने ''नमन'' या शब्दाने नुसत्या क्रियेमुळे उत्पन्न होणारे द्वैत किंवा ज्ञानाने उत्पन्न होणारी ऐक्याची जाणीव याचाच निषेध केला आहे. नि:सीम गुरुप्रेमाने होणारी स्वाभाविक गुरुचरणनिष्ठ अखंड नम्रवृत्ती या भक्तीचा निषेध केला नाही.

आतां रिता कुंभ समुद्रीं रिगे। तो उचंबळत भरोनि निगे। कां दशी दीपसंगें। दीपचि होय॥ १९॥

तैसा तुझिया प्रणतीं। मी पूर्ण जालों श्रीनिवृत्ती। आतां आणीन व्यक्ती। गीतार्थ तो॥ २०॥

अर्थ—ज्याप्रमाणे रिकामा मातीचा घडा समुद्रात टाकून उचलला असता तो जळाने तुडुंब भरूनच निघतो किंवा दिव्याचा संबंध होताच वातही दिवा होऊन जाते, ॥ १९ ॥ त्याप्रमाणे, हे श्रीगुरो श्रीनिवृत्तिनाथ! तुम्हांला प्रेमपूर्वक स्वाभाविक नमन केल्याने मीही पूर्ण झालो. आता गीतेचा अर्थ प्रगट करीन. ॥ २० ॥

तरि षोडशाध्यायशेखीं। तिये समाप्तीच्या श्लोकीं। जो ऐसा निर्णयो निष्टंकीं। ठेविला देवें॥ २१॥
जे कृत्याकृत्यव्यवस्था। अनुष्ठावया पार्था। शास्त्रचि एक सर्वथा। प्रमाण तुज॥ २२॥
तेथ अर्जुन मानसें। म्हणे हें ऐसें कैसें। जे शास्त्रेंवीण नसे। सुटिका कर्मा॥ २३॥

अर्थ—तरी सोळाव्या अध्यायाच्या अखेरीस त्या शेवटच्या श्लोकात भगवंताने असा निर्णय केला की, ॥ २१ ॥ हे अर्जुना! काय करावे, काय करू नये हे जाणून घेऊन त्याचे अनुष्ठान करण्याकरिता एक शास्त्रच तुला प्रमाण मानिले पाहिजे–म्हणजे शास्त्रावरूनच ते जाणून घेतले पाहिजे. ॥ २२ ॥ तेव्हा अर्जुन मनात म्हणतो की कार्याकार्य समजून घेण्याकरिता शास्त्रावाचून दुसरा मार्गच नाही, हे असे कसे?॥ २३ ॥

गूढार्थदीपिका—हे कर्म करणीय आहे, अशी ज्याची श्रद्धा, ते त्याचे कार्य व हे करणीय नाही अशी ज्याची श्रद्धा ते त्याचे अकार्य अशी कार्याकार्याची व्यवस्था नुसत्या श्रद्धेने ठरविता येणार नाही काय, असा अर्जुनाच्या प्रश्नाचा अभिप्राय.

तरी तक्षकाची फडे। ठाकोनि कैं तो मणि काढे। कैं नाकींचा केश जोडे। सिंहाचिये॥ २४॥
मग तेणें तो बोविजे। तरीच लेणें पाविजे। येऱ्हवीं काय असिजे। रिक्तकंठीं॥ २५॥
तैसी शास्त्रांची मोकळी। यां कैं कोण वेंटाळी। एकवाक्यतेच्या फळीं। पैसिजे कैं॥ २६॥
जालयाही एकवाक्यता। कें लाभे वेळ अनुष्ठितां। कैंचा पैसार जीविता। येतुलालिया॥ २७॥
आणि शास्त्रें अर्थें देशें काळें। या चहूंही जें एकफळे। तो उपावो कें मिळे। आघवयांसी॥ २८॥
म्हणौनि शास्त्राचें घडतें। नोहे प्रकारें बहुतें। तरि मूर्खां मुमुक्षां येथें। काय गति पां॥ २९॥
हा पुसावया अभिप्राव। जो अर्जुन करी प्रस्ताव। तो सतराविया ठाव। अध्याया येथ॥ ३०॥

अर्थ—तक्षकाच्या फणीपाशी येऊन त्यातील मणी केव्हा काढणार? सिंहाच्या नाकातील केस केव्हा प्राप्त होणार?॥ २४॥ मग त्या केसात तो मणी ओवून तो दागिना प्राप्त व्हावा व कंठात बांधावा, नाही तर भोंड्या गळ्यानेच असायचे काय?॥ २५ ॥ तसेच शास्त्रांची निरनिराळी मते कोण, केव्हा एकत्र करील व त्यांच्या एकवाक्यतेची प्राप्ती केव्हा होणार?॥ २६ ॥ आणि काही काळाने एकवाक्यता झाली तरी पुढे आचरण करण्याकरिता वेळ कसा सापडणार? व तसे दीर्घ आयुष्य कोठून लाभणार?॥ २७ ॥ आणि शास्त्र, अर्थ, देश, काल या चौघांनी फलद्रूप होणारा उपाय सर्वांसच कसा मिळणार?॥ २८॥ म्हणून बहुतकरून शास्त्राप्रमाणे तंतोतंत घडून येणे शक्य दिसत नाही. अशा स्थितीत अज्ञानी मूर्ख मुमुक्षूची काय गती होणार?॥ २९॥ ही शंका भगवंताला विचारण्याचा प्रस्ताव अर्जुनाने केला, तोच हा सतरावा अध्याय होय. ॥ ३० ॥

तरी सर्वविषयीं वितृष्ण। जो सकळकळीं प्रवीण। कृष्णाही नवल कृष्ण। अर्जुनत्वें जो॥ ३१॥
शौर्या जोडला आधार। जो सोमवंशाचा शृंगार। सुखादि उपकार। जयाची लीला॥ ३२॥
जो प्रज्ञेचा प्रियोत्तम। ब्रह्मविद्येचा विश्राम। सहचर मनोधर्म। देवाचा जो॥ ३३॥

अर्थ—तरी जो संपूर्ण विषयवासनारहित आहे, जो संपूर्ण कलेत निपुण आहे व जो अर्जुनरूपाने श्रीकृष्णाच्या मनाला वेध लावणारा कृष्णच होय, ॥ ३१ ॥ जो शौर्यगुणाला मिळालेला आधारच होय, जो सोमवंशाचे भूषण आहे व सुखादी देऊन उपकार करणे हीच ज्याची लीला आहे, ॥ ३२ ॥ जो जाणणाऱ्या बुद्धीचा प्रिय पती आहे, ब्रह्मविद्या ज्याचे ठिकाणी विश्रांती घेते व जो नेहमी देवाबरोबर राहणारा देवाचा मनोधर्मच होय, ॥ ३३ ॥

अर्जुन उवाच

ये शास्त्रविधिमुत्सृज्य यजन्ते श्रद्धयान्विताः । तेषां निष्ठा तु का कृष्ण सत्त्वमाहो रजस्तमः॥ १॥

अर्थ—अर्जुन म्हणतो, शास्त्रविधीला सोडून जे केवळ श्रद्धेने यजन करतात, भगवंता! त्यांची निष्ठा काय सात्त्विक, राजस की तामस असते, हे सांग.॥ १॥

तो अर्जुन म्हणे गा तमालश्यामा। इंद्रियां फावलिया ब्रह्मा। तुझा बोल आम्हां। साकांक्ष पैं जी॥ ३४॥
जें शास्त्रेंवांचूनि आणिकें। प्राणियां स्वमोक्ष न देखे। ऐसें कां कैंपंखें। बोलिलासी॥ ३५॥
तरी न मिळेचि तो देश। नव्हेचि काळा अवकाश। जो करवी शास्त्राभ्यास। तोही दुरी॥ ३६॥
आणि अभ्यासीं विरजिया। होती जिया सामग्रिया। त्याही नाहीं आपैतिया। तिये वेळीं॥ ३७॥
उजू नोहेचि प्राचीन। नेदीचि प्रज्ञा संवाहन। ऐसें ठेलें आपादन। शास्त्राचें जया॥ ३८॥
किंबहुना शास्त्राविखीं। येकही न लाहातीचि नखी। म्हणूनि उखिविखी। सांडिली जिहीं॥ ३९॥

अर्थ—तो अर्जुन म्हणाला, हे इंद्रियगोचर झालेल्या परब्रह्मा, तमालश्यामा श्रीकृष्णा! तुझे बोलणे आम्हांला संशयित वाटते.॥ ३४॥ शास्त्रावाचून दुसऱ्या कोणत्याही रितीने जीवाला आपल्या मोक्षाचा मार्ग स्वतंत्रपणे शोधून काढता येत नाही, असा पक्ष घेऊन काही तू बोललास.॥ ३५॥ शास्त्राने कर्मानुष्ठानाकरिता सांगितलेला शुद्ध देश मिळाला नाही, तसेच शास्त्रांनी सांगितलेला काळाचा अवकाश प्राप्त झाला नाही, शास्त्रांचा अभ्यास करविणारा गुरू, हा तर, दूरच राहिला॥ ३६॥ आणि शास्त्राभ्यासाला साह्यभूत होणारी सामग्रीही त्यावेळी प्राप्त झाली नाही.॥ ३७॥ प्राक्तन कर्म अनुकूल नसल्यामुळे त्या कर्मानुसार उत्पन्न झालेली बुद्धी शास्त्रार्थ ग्रहण करण्यास समर्थ नाही, म्हणून शास्त्राचे अध्ययन होऊ शकले नाही.॥ ३८॥ फार काय सांगावे! शास्त्राविषयीचा एकही निश्चय अवगत होत नाही, असे पाहून ज्याने शास्त्राध्ययनाचा विचार सोडून दिला,॥ ३९॥

परि निर्धारूनि शास्त्रें। अर्थानुष्ठानें पवित्रें। नांदताति परत्रें। साचारें जे॥ ४०॥
तयांऐसें आम्हीं होआवें। ऐसी चाड बांधोनि जीवें। घेती तयांचे मागावे। आचरावया॥ ४१॥
धड्याचिया आखरा-। तळीं बाळ लिहे दातारा। कां पुढां सूनि पडिकारा। अक्षम चाले॥ ४२॥
तैसें सर्वशास्त्रनिपुण। तयांचें जें आचरण। तेंचि करिती प्रमाण। आपलिये श्रद्धे॥ ४३॥
मग शिवादिकें पूजनें। भूम्यादिकें महादानें। अग्निहोत्रादि यजनें। करिती जे श्रद्धा॥ ४४॥
तयां सत्वरजतमां-। माजि कोण पुरुषोत्तमा। गति होय ते आम्हां। सांगिजो जी॥ ४५॥

अर्थ—पण शास्त्राच्या अर्थाचा निश्चय करून त्याप्रमाणे शुद्ध अनुष्ठान करून जे परलोकात सुखाने नांदत आहेत,॥ ४०॥ त्यांच्यासारखेच आपण व्हावे, अशी अंतःकरणात इच्छा धरून आचरणाकरिता त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून जे चालतात,॥ ४१॥ महाराज! जसे मूल पुस्तकाच्या धड्यातील अक्षराखाली अक्षराप्रमाणे अक्षर काढते किंवा आंधळा जसा डोळसाला पुढे करूनच चालतो,॥ ४२॥ त्याप्रमाणे सर्व शास्त्रात निपुण असणाऱ्यांचे जे आचरण असते, तेच श्रद्धेने प्रमाण मानून जे तसेच आचरण करतात,॥ ४३॥ मग त्या श्रद्धेने शिवविष्णवादिकांचे पूजन, भूमिदानासारखे महादान, अग्निहोत्रासारखी यज्ञादी कर्मे जे करतात,॥ ४४॥ हे पुरुषोत्तमा! अशा लोकांना सात्विक, राजस, तामस यांपैकी कोणती गती प्राप्त होते, ते आम्हांला सांगा.॥ ४५॥

गूढार्थदीपिका—अर्जुन हा वैदिक धर्माभिमानी असल्यामुळे शास्त्र न पाहता, शास्त्रानुसार वागणाऱ्यांच्या पावलावर पाऊल ठेवून वागणाऱ्यांची श्रद्धा सात्विक, राजस की तामस, असा त्याने प्रश्न केला.

श्रीभगवानुवाच

त्रिविधा भवति श्रद्धा देहिनां सा स्वभावजा । सात्त्विकी राज

अर्थ—भगवान म्हणतात, अर्जुना! शास्त्रविहीन लोकांची श्र तामस अशी तीन प्रकारची असते. सांगतो, ऐक. ॥ २ ॥

गूढार्थदीपिका—स्वाभाविक श्रद्धा सात्विक, राजस, तामस अश सत्वगुणाचे कार्य असल्यामुळे कर्माचे परिणामजन्य कार्य नव्हे, तरी व्यसनानुसारच वागते, त्याप्रमाणे वेद, श्रुती, पुराण इत्यादी शास्त्रांनुसार ज्या बुद्धी कर्माने मिळणाऱ्या फलानुसार होत असते; म्हणूनच अशा शास्त्रविवे प्रकारची असते, असे येथे सांगितले आहे.

प्रथम मदिरा ठेवलेल्या भांड्यात मदिरा ओतून घेतल्यावर गंगाजळ घ सहजच लागतो, त्याप्रमाणे बुद्धी ही मुळात सात्विक असली तरी तिला श पूर्वकर्मानुसार सात्विक, राजस, तामस गुणांचा उत्कर्ष दिसू लागतो व ती सात्विक, रजोगुणाच्या आधिक्याने स्वाभाविक राजस व तमोगुणाच्या आधि म्हणून शास्त्रविवेकहीन पुरुषांच्या बुद्धीला यथार्थ ज्ञान होणे दुरापास्त अ अभिमान व्यर्थ दुराग्रहच ठरतो.

तंव वैकुंठपीठींचें लिंग। जो निगमपद्माचा पराग। जिये जय काळ साविया‍चि वाढ। लोकोत्तर प्रौढ। अद्वि इयें श्लाघिजती जेणें बिकें। तें जयाचे आंगीं असिकें। तो श्रीव

अर्थ—तेव्हा वैकुंठाचे जे आराध्य दैवत आहे, वेदरूपी कमलातील अंगाच्या छायेप्रमाणे भासमात्र जग भासते, ॥ ४६ ॥ काल स्वभावत:च अम आहे, तो अद्वैतस्वरूप असून गूढ व आनंदघन आहे, ॥ ४७ ॥ ज्याच्या अंगी वाखाणणी ज्याच्या अंगभूत सामर्थ्याला धरूनच केली जाते, तो भगवान **म्हणे पार्था तुझा अतिसो। हेंही गा आम्ही जाणतसों। शास्त्राभ्यासा नुसधियाचि श्रद्धा। झोंबों पाहसी परमपदा। तरि तैसें**

अर्थ—अर्जुना! तुझ्या बोलण्याचा भर कशावर आहे, हे आम्ही पू अडथळा वाटतो ना! ॥ ४९ ॥ शास्त्रशुद्ध विवेकावाचून केवळ श्रद्धेने परम पण हे ज्ञात्या अर्जुना! परमपदाची प्राप्ती तशी सोपी नाही. ॥ ५० ॥

गूढार्थदीपिका—परब्रह्मप्राप्तीकरिता श्रुती-शास्त्र-पुराण यांनी स पाहिजे, असा अर्थ.

श्रद्धा म्हणितलियासाठीं। पातेजों नये किरीटी। काय द्विज गंगोदक जरी जालें। तरि मद्यभांडा आलें। तें घेऊं नये चंदन होय शीतळु। परि अग्नीसी पावे मेळु। तैं हातीं धरि कां किडाचिये आटतिये पुटीं। पडिलें सोळें किरीटी। घेतल तैसें श्रद्धेचें दळवाडें। आंगें कीर चोखडें। परि प्राणिय तैं प्राणिये तंव स्वभावें। अनादिमायाप्रभावें। त्रिगुणाचेंचि तेथही दोन गुण खांचती। मग एक धरी उन्नती। तैं तैसियाि

अर्थ—अर्जुना, आमची श्रद्धा आहे, असे म्हणून शास्त्राचा त्याग क

जर सदासर्वदा सहवास करतील तर तेही अंत्यज होणार नाहीत काय ? ॥ ५१ ॥ अर्जुना ! गंगोदक झाले तरी, प्रथम मदिरा ज्या भांड्यात होती, त्या भांड्यात ओतले असता, ते काही केले तरी सेवनीय होत नाही, याचा विचार कर. ॥ ५२ ॥ चंदनाचे लाकूड थंड खरे, पण त्याचा अग्नीशी संबंध झाल्यावर ते हातात धरले असता जाळणार नाही काय ? ॥ ५३ ॥ अर्जुना ! हीणकट सोने आटवीत असता त्या मुशीत शुद्ध सोने पडले व ते सर्व सोने शुद्ध आहे, असे समजून विकत घेतले, तर ते आपल्याला नागवीत नाही काय ? ॥ ५४ ॥ त्याप्रमाणे श्रद्धा मुळात संपूर्ण चांगली असली तरी जेव्हा ती निरनिराळ्या प्राण्यांच्या ठिकाणी विभागली जाते, ॥ ५५ ॥ तेव्हा प्राणी हे अनादी मायेच्या प्रभावाने त्रिगुणात्मक झालेले असल्यामुळे दोन गुण कमी होऊन, मग एक गुण वाढतो व त्या वाढलेल्या गुणाप्रमाणेच जीवांच्या मनाच्या श्रद्धावृत्ती प्रगट होतात. ॥ ५६-५७ ॥

वृत्तिऐसें मन धरिती। मनाऐसी क्रिया करिती। केलियाऐसीं वरिती। मरोनि देहें ॥ ५८ ॥
बीज मोडे झाड होये। झाड मोडे बीजीं सामाये। ऐसेनि कल्पकोडी जाये। परि जाति न नाशे ॥ ५९ ॥
तियापरि यियें अपारें। होत जात जन्मांतरें। त्रिगुण न व्यभिचरे। प्राणियांचे ॥ ६० ॥
म्हणूनि प्राणियांच्या पैकीं। पडिली श्रद्धा अवलोकीं। ते होय गुणांसारिखी। तिहीं ययां ॥ ६१ ॥
विपायें वाढे सत्व शुद्ध। तेव्हां ज्ञानासी करी साध्य। परि एका दोघे वोखद। येर आहाती ॥ ६२ ॥

अर्थ—वृत्ती स्फुरते तेव्हा ते प्राण्याचे मनच वृत्तिरूप होते. मन ज्या प्रकारचे वृत्तिरूप होते, त्याप्रमाणे प्राण्याकडून क्रिया घडते आणि मेल्यानंतर त्या कर्माप्रमाणे त्याला देह प्राप्त होतो. ॥ ५८ ॥ बीज नाहीसे होऊन झाड उत्पन्न होते व झाड नाहीसे होऊन ते बीजदशेत येते. अशा रितीने कोटीकल्प होत राहिले, तरी जाती नाहीशी होत नाही, ॥ ५९ ॥ त्याप्रमाणे प्राण्यांची अनंत जन्मांतरे होत गेली तरी त्याचे त्रिगुणात्मकत्व नाहीसे होत नाही. ॥ ६० ॥ म्हणून प्राण्यांच्या वाटेला आलेली श्रद्धा या तीन गुणांसारखी होते, पाहा ! ॥ ६१ ॥ कदाचित् शुद्ध सत्व वाढले तर ते ज्ञानाला साध्य करून देते; पण बाकीचे दोघे रज, तम हे गुण या एकालाच औषध आहे-म्हणजे ते वाढू देत नाहीत. ॥ ६२ ॥

गूढार्थदीपिका—"अन्योन्याभिभवाश्रयजननमिथुनवृत्तयश्च गुणाः" (सां. का. १२) सत्व, रज, तम हे तीन गुण परस्परांना दाबणारे व परस्परातून उत्पन्न होणारे आहेत, असे सांख्यकारिकेत सांगितले आहे.

सत्वाचेनि आंगलगें। ते श्रद्धा मोक्षफळा रिगे। तंव रज तम उगे। कां पां राहाती ॥ ६३ ॥
मोडोनि सत्वाची त्राये। रजोगुण आकाशें जाये। तेव्हां तेचि श्रद्धा होये। कर्मकेरसुणी ॥ ६४ ॥
मग तमाची उठी आगी। तेव्हां तेचि श्रद्धा भंगी। हों लागे भोगालागीं। भलतेया ॥ ६५ ॥

अर्थ—सत्त्वाच्या आश्रयाने उत्पन्न झालेली श्रद्धा जर आत्मज्ञानद्वारा मोक्षफळाला झोंबते-म्हणजे मोक्ष प्राप्त करून देते-तर रज, तम गुण हे का स्वस्थ बसतील ? ॥ ६३ ॥ सत्त्वाच्या वाढीचे सामर्थ्य नाहीसे करून जेव्हा रजोगुण आकाशात जातो-म्हणजे अती वाढतो-तेव्हा अखंड कर्म करण्याविषयीच श्रद्धा जोरावते. ॥ ६४ ॥ तसेच जेव्हा तमोगुणाच्या आगीचा उबाळा उठतो, तेव्हा वाटेल त्या रितीने भोग भोगावा, अशा प्रकारची श्रद्धा होते. ॥ ६५ ॥

सत्त्वानुरूपा सर्वस्य श्रद्धा भवति भारत । श्रद्धामयोऽयं पुरुषो यो यच्छ्रद्धः स एव सः ॥ ३ ॥

अर्थ—हे अर्जुना ! सर्व मनुष्यांच्या ठिकाणी पूर्वकर्माप्रमाणे त्याच्या विशिष्ट संस्कारयुक्त अंतःकरणानुसार श्रद्धा असते. हा पुरुष श्रद्धामयच आहे. जो पुरुष ज्या श्रद्धेने युक्त असतो, तो तशा श्रद्धेचाच समजला जातो. ॥ ३ ॥

एवं सत्वरजतमां-। वेगळी श्रद्धा सुवर्मा। नाहीं गा जीवग्रामा-। माजी यया ॥ ६६ ॥
म्हणोनि श्रद्धा स्वाभाविक। असे पैं त्रिगुणात्मक। रजतमसात्विक। भेदीं इहीं ॥ ६७ ॥
जैसें जीवनचि उदक। परि विषीं होय मारक। कां मिरयामाजी तीख। उंसीं गोड ॥ ६८ ॥
तैसा बहुवसें तमें। जो सदाचि होय निमे। तेथ श्रद्धा परिणमे। तेंचि होउनी ॥ ६९ ॥

मग काजळा आणि मसी। न दिसे विवंचना जैसी। तेवीं श्रद्धा तामसी। सिनी नाहीं॥ ७०॥
तैसीच राजसी जीवीं। रजोमय जाणावी। सात्विकीं आघवी। सत्वाचीच॥ ७१॥
ऐसेनि हा सकळ। जगडंबर निखिळ। श्रद्धेचाचि केवळ। वोतला असे॥ ७२॥

अर्थ—हे अर्जुना! या जीवलोकामध्ये सात्विक, राजस, तामस या त्रिगुणात्मक श्रद्धेवेगळी श्रद्धा नाही. ॥ ६६ ॥ म्हणून सर्व पुरुषांच्या ठिकाणी जी स्वाभाविक श्रद्धा असते, ती सात्विक, राजस, तामस अशा भेदाने त्रिगुणात्मकच असते. ॥ ६७ ॥ ज्याप्रमाणे पाणी हे प्राणिमात्राला जगविणारे आहे, हे खरे; पण ते विषामध्ये त्याच्या मारकपणाला, मिऱ्यामध्ये त्याच्या तिखटपणाला व उसामध्ये त्याच्या गोडपणाला पोषक होते. ॥ ६८ ॥ त्याप्रमाणे तमोगुणाच्या वृद्धीत जो सदासर्वदा "जायस्व म्रियस्व" या श्रुतीत सांगितल्याप्रमाणे जन्मतो व मरतो त्याची श्रद्धा तमोरूपानेच परिणाम पावते. ॥ ६९ ॥ मग ज्याप्रमाणे काजळ व काजळाची शाई यांच्या काळेपणात भेद नसतो, त्याप्रमाणे तामसी श्रद्धा व तमोगुण हे निराळे नसतात. ॥ ७० ॥ त्याप्रमाणेच राजस श्रद्धा रजोगुणरूपच असून सात्विक श्रद्धा संपूर्ण सत्वगुणरूपच असते. ॥ ७१ ॥ याप्रमाणे हा संपूर्ण ब्रह्मांडगोल केवळ श्रद्धेचाच बनला आहे. ॥ ७२ ॥

गूढार्थदीपिका—"कामः, संकल्पः, विचिकित्सा, श्रद्धा, अश्रद्धा, धृतिः, अधृतिः, ह्रीः, धीः, भीरित्येतत् सर्वं मन एव" (बृ. उ. १-५-३) काम म्हणजे स्त्रीसंबंधीची अभिलाषादी, संकल्प म्हणजे प्राप्त झालेल्या विषयाची शुक्लनीलादी भेदाने विशेष कल्पना, विचिकित्सा म्हणजे संशयज्ञान, श्रद्धा म्हणजे ज्याचे फल अदृष्ट आहे त्या कर्म व देवता यांच्या ठिकाणी आस्तिकतेचा भाव ठेवणे; अश्रद्धा म्हणजे कर्म व देवतादिकांचे ठिकाणी आस्तिकतेचा भाव नसणे, धृती म्हणजे धारण; अर्थात देहादिक शिथिल झाले असता त्यांना सांभाळून ठेवणे, अधृती म्हणजे धृतीच्या विपरीत होणे, ह्री म्हणजे लज्जा, धी म्हणजे बुद्धी, व भी म्हणजे भय, हे सर्व मनच आहे, म्हणजे हे सर्व मनाच्याच वृत्ती किंवा व्यापार आहेत. असे हे स्वाभाविक अनेक व्यापारयुक्त मन, लिंगशरीर अंतर्भूत असल्यामुळे, प्रत्येक प्राण्याच्या ठिकाणी असतेच; मग तो सज्ञानी वा अज्ञानी कोणीही असो; म्हणून मनुष्याचा कोणताही व्यापार, कर्म, ज्ञान इत्यादी स्वतंत्रपणे बुद्धिमूलकच असण्यापेक्षा स्वाभाविक श्रद्धामूलकच असणे साहजिकच आहे; पण बुद्धिवादाचा पुरस्कार करणाऱ्यांना हे कळत नाही व व्यर्थच ते श्रद्धेची निंदा करतात.

येथे रजोगुणी, तमोगुणी, शास्त्रविवेकहीन श्रद्धेची निंदा केली असली तरी स्वाभाविक सात्विक श्रद्धा, आचरणानुसार अचूक ध्येयप्राप्ती करून देणारी असल्यामुळे तिची निंदा केली नाही, हे लक्षात ठेवले पाहिजे.

परि गुणत्रयवशें। त्रिविधपणाचें लासें। श्रद्धे जें उठिलें असे। तें वोळख तूं॥ ७३॥
तरि जाणिजे झाड फुलें। कां मानस जाणिजे बोलें। भोगें जाणिजे केलें। पूर्वजन्मीचें॥ ७४॥
तैसीं जिहीं जिहीं चिन्हीं। श्रद्धेचीं रूपें तिन्ही। देखीजती ते वानी। अवधारीं पां॥ ७५॥

अर्थ—पण सत्त्व, रज, तम या तीन गुणांच्या योगाने श्रद्धेच्या ठिकाणी जे त्रिविधपणाचे डाग उठले आहेत, त्यांची आता ओळख करून घे. ॥ ७३ ॥ ज्याप्रमाणे फुलावरून झाड ओळखावे किंवा बोलण्यावरून मन ओळखावे, सुखदुःखभोगांवरून पूर्वजन्मींचे पुण्य-पाप ओळखावे. ॥ ७४ ॥ त्याप्रमाणे ज्या ज्या लक्षणांवरून श्रद्धेची तीन रूपे ओळखता येतील, ते प्रकार सांगतो, ऐक. ॥ ७५ ॥

यजन्ते सात्त्विका देवान्यक्षरक्षांसि राजसाः । प्रेतान्भूतगणांश्चान्ये यजन्ते तामसा जनाः ॥ ४॥

अर्थ—सात्विक श्रद्धेचे पुरुष श्रुती-स्मृती-पुराण यात सांगितलेल्या वैदिक देवतांचे पूजन करतात. राजस श्रद्धेचे पुरुष यक्ष व राक्षस यांचे पूजन करतात व दुसरे तामस श्रद्धेचे पुरुष भूतप्रेतादिकांचे पूजन करतात. ॥ ४ ॥

तरि सात्विक श्रद्धा। जयांचा होय बांधा। तयां बहुतकरूनि मेधा। स्वर्गीं आथी॥ ७६॥

ते विद्याजात पढती। यज्ञक्रिये निवडती। किंबहुना पडती। देवलोकीं॥ ७७॥
आणि श्रद्धा राजसा। घडले जे वीरेशा। ते भजती राक्षसां। खेचरां हन॥ ७८॥
श्रद्धा जे कां तामसी। ते मी सांगेन तुजपाशीं। जे केवळ पापराशी। अतिकर्कशी निर्दयत्वें॥ ७९॥
जीववधें साधूनि बळी। भूतप्रेतकुळें मैळीं। स्मशानीं संध्याकाळीं। पूजिती जे॥ ८०॥
ते तमोगुणाचें सार। काढूनि निर्मिले नर। जाण तामसियेचें घर। श्रद्धेचें तें॥ ८१॥

अर्थ—ज्यांचा पिंड स्वाभाविक सात्विक श्रद्धेचा बनला आहे, त्या लोकांना बहुतेक स्वर्गप्राप्तीची आवड असते. ॥ ७६ ॥ चौदा विद्यांचे अध्ययन व यज्ञादी कर्मे करण्याच्या ठिकाणी त्यांची श्रद्धा असते. फार काय सांगावे! ते देवलोकात जातात ॥ ७७ ॥ आणि ज्यांच्या अंत:करणात स्वाभाविक राजस श्रद्धा आहे, ते, अर्जुना! यक्षराक्षसादिकांचेच पूजन करतात ॥ ७८ ॥ आणि स्वाभाविक तामसी श्रद्धा, जी निर्दयपणामुळे अती कठोर म्हणून केवळ पापराशीच होय, ती आता सांगतो, ऐक. ॥ ७९ ॥ जीवांच्या वधाने बळी सिद्ध करून त्याच्या योगाने संध्यासमयी अमंगल अशा स्मशानामध्ये भूतप्रेतादी कुळांचे ते पूजन करतात. ॥ ८० ॥ असे स्वाभाविक तामस श्रद्धेचे पुरुष म्हणजे तमोगुणाचे सार काढून त्याचा केलेला पिंड होय. असे पुरुष तामस श्रद्धेचे घरच होय, असे जाण. ॥ ८१ ॥

ऐसी इंहीं तिहीं लिंगीं। त्रिविध श्रद्धा जगीं। पैं हें ययालागीं। सांगत असें॥ ८२॥
जे हे सात्त्विक श्रद्धा। जतन करावी प्रबुद्धा। येरी दोनी विरुद्धा। सांडाविया॥ ८३॥
हे सात्विकमति जया। निर्वाहती होय धनंजया। बागूल नोहे तया। कैवल्य तें॥ ८४॥
तो न पढो कां ब्रह्मसूत्र। न लोढो सर्व शास्त्र। सिद्धांत न होवोत स्वतंत्र। तयाच्या हातीं॥ ८५॥
परि श्रुतिस्मृतींचे अर्थ। जे आपण होऊनि मूर्त। अनुष्ठानें गाजत। वडील जे हे॥ ८६॥
तयांचीं आचरतीं पाउलें। पाऊनि सात्विकी श्रद्धा चाले। तो तेंचि फळ ठेविलें। ऐसें लाहे॥ ८७॥

अर्थ—याप्रमाणे तीन लक्षणांनी त्रिगुणात्मक श्रद्धेचे स्वरूप येवढ्याकरिताच सांगितले आहे की, ॥ ८२ ॥ अर्जुना! या तीन श्रद्धेपैकी रजोगुणी व तमोगुणी या दोन श्रद्धा विरुद्ध असल्यामुळे (अध:पतनाला कारणीभूत असल्यामुळे) नि:शेष टाकून देऊन सात्विक श्रद्धा मात्र जतन करावी. ॥ ८३ ॥ अर्जुना! ही सात्विक बुद्धी ज्याचे ठिकाणी टिकते, त्याला मोक्षाची भीती वाटत नाही. ॥ ८४ ॥ स्वाभाविक सात्विक पुरुष ब्रह्मसूत्राचे किंवा कोण्याही शास्त्राचे अध्ययन न करो अथवा त्याला शास्त्रातील सिद्धान्त अवगत न होवोत, ॥ ८५ ॥ पण जे हे आपले वाडवडील श्रुतिस्मृतीत सांगितल्याप्रमाणे तंतोतंत आचरण करून श्रुतिस्मृतीतील प्रत्यक्ष अर्थच होऊन बसले, ॥ ८६ ॥ त्यांच्या आचाररूप पावलावर पाऊल ठेवूनच स्वाभाविक सात्विक श्रद्धेचा पुरुष चालत असतो; म्हणून त्यालाही त्यांच्याचप्रमाणे फळ प्राप्त होते. ॥ ८७ ॥

पैं एक दीप लावी सायासें। आणिक तेथें लाऊं बैसे। तरि तो काय प्रकाशें। वंचिजे गा॥ ८८॥
कां येकें मोल अपार। वेंचोनि केलें धवळार। तो सुरवाड वस्तीकर। न भोगी काई॥ ८९॥
हें असो जो तळें करी। तें तयाचीच तृषा हरी। कीं सुआरासीचि अन्न घरीं। येरां नोहे॥ ९०॥
बहुत काय बोलों पैं गा। येका गौतमासीच गंगा। येरां समस्तां काय जगा। वाहाळ जाली॥ ९१॥
म्हणौनि आपलियापरी। शास्त्र अनुष्ठिती कुसरी। जाणे तयांतें श्रद्धालु जो वरी। तो मूर्खही तरे॥ ९२॥

अर्थ—एक मनुष्य प्रयत्नाने दिवा लावीत आहे म्हणून त्याला प्रकाश मिळाला आणि दुसरा मनुष्य तेथे दिवा लावण्यास बसला आहे, म्हणून त्याला प्रकाश मिळत नाही काय? ॥ ८८ ॥ किंवा एखाद्या श्रीमंत पुरुषाने पुष्कळ पैसे खर्च करून जर मोठा वाडा बांधला आणि एखादा प्रवासी येऊन तेथे उतरला तर तो वाड्यातील सुखसोयी भोगीत नाही काय? ॥ ८९ ॥ हे असो. जो तळे करतो (खणतो) त्याचीच ते तळे तहान भागविते काय? किंवा घरी शिजविलेले अन्न आचाऱ्याचीच भूक शमविते, दुसऱ्याची शमवीत नाही काय? ॥ ९० ॥ अर्जुना! फार

काय सांगावे! एका गौतमाला गंगा झाली आणि बाकीच्या इतर जगाला ती ओढा झाली काय? ॥ ९१ ॥ म्हणून आपल्या सामर्थ्यानुसार जो शास्त्राप्रमाणे आचरण करण्याचे शहाणपण बाळगतो, त्याच्या आचरणानुसार शास्त्र न पाहता केवळ श्रद्धेने आचरण करू पाहणारा मूर्खही तरतो. ॥ ९२ ॥

गूढार्थदीपिका—सात्त्विक अंधश्रद्धाळू व डोळस श्रद्धाळू या दोघांचेही एक वैदिकच आचरण असल्यामुळे दोघेही सारखेच तरतात.

अशास्त्रविहितं घोरं तप्यन्ते ये तपो जनाः । दम्भाहंकारसंयुक्ताः कामरागबलान्विताः ॥ ५ ॥
कर्शयन्तः शरीरस्थं भूतग्राममचेतसः । मां चैवान्तःशरीरस्थं तान्विद्ध्यासुरनिश्चयान् ॥ ६ ॥

अर्थ—जे मूढ लोक विषयाभिलाष व विषयासक्ती या विकारांच्या बळाला बळी पडल्यामुळे दंभ व अहंकार यांनी युक्त होऊन श्रुती, स्मृती, पुराण यातून न सांगितलेली व शरीरातील इंद्रियसमुदायांचे व त्यांच्या साक्षिभूत अशा माझे कर्षण करणारी व दुसऱ्याला पीडा देणारी घोर तपे करतात, अर्जुना! ते लोक आसुर होत, असे जाण. ॥ ५-६ ॥

ना शास्त्राचेनि कीर नांवें। खांकरोंही नेणती जीवें। परि शास्त्रज्ञांही शिवे। टेंको नेदिती ॥ ९३ ॥
वडिलांचिया क्रिया। देखोनि वाती वांकुलिया। पंडितां डांकुलिया। वाजविती ॥ ९४ ॥

अर्थ—जे खरोखर शास्त्राच्या नावाने खाकरू इच्छित नाहीत-म्हणजे त्यांना शास्त्रे अगदी तुच्छ वाटतात. शास्त्र जाणणाऱ्याला तर आपल्या घराच्या सीमेलाही शिवू देत नाहीत. ॥ ९३ ॥ वाडवडिलांच्या शास्त्रानुसार होणाऱ्या क्रिया पाहून त्यांना वाकुल्या दाखवितात व पंडित लोक पाहून त्यांच्यापुढे चुटक्या वाजवून त्यांचा उपहास करतात. ॥ ९४ ॥

आपलेनीचि आटोपें। धनित्वाचेनि दर्पें। साचचि पाखंडाचीं तपें। आदरिती ॥ ९५ ॥
आपुलिया पुढिलांचिया। आंगीं घालूनि कातिया। रक्तमांसा प्रणीतया। भरभरों ॥ ९६ ॥
रिचविती जळतकुंडीं। लाविती चेडयाच्या तोंडीं। नवसियां देती उंडी। बाळकांची ॥ ९७ ॥
आग्रहाचिया उजरिया। क्षुद्रदेवतां वरिया। अन्नत्यागें सातरिया। ठाकती एक ॥ ९८ ॥

अर्थ—आपल्या शहाणपणाच्या अभिमानाने व श्रीमंतीच्या गर्वाने खरोखर अवैदिक रुद्रयामलादी तंत्राच्या योग व मोक्षवर्जित भागात सांगितलेल्या तपांचे आचरण करतात. आपल्या व दुसऱ्याच्या अंगात कोयतारूपी शस्त्रे खुपसून व रक्तमासांनी यज्ञपात्रे भरून पेटलेल्या कुंडात आहुत्या देतात व चेटुकाच्या तोंडी लावतात व नवस करून बालकांचे बळी देतात. ॥ ९५-९७ ॥ कोणी सात सात दिवस अन्नाचा त्याग करून (कुबेर-यक्षादी) क्षुद्रदेवतांच्या श्रेष्ठत्वाचा उघड आग्रह धरतात व त्यांची उपासना करतात. ॥ ९८ ॥

अगा आत्मपरपीडा। बीज तमक्षेत्रीं सुहाडा। पेरिती मग पुढां। तेंचि पिके ॥ ९९ ॥
बाहू नाहीं आपलिया। आणि नावेतेंही धनंजया। न धरी होय तया। समुद्रीं जैसें ॥ १०० ॥
कां वैद्यातें करी सळा। रस सांडी पायखोळां। तो रोगिया जेविं विव्हळा। सवता होय ॥ १०१ ॥
ना ना पडिकराचेनि सळें। काढी आपलेचि डोळे। तें वानवसां आंधळें। जैसें ठाके ॥ १०२ ॥
तैसें तयां असुरां होये। जे निंदूनि शास्त्रांची सोये। सैंघ धांवताती मोहें। आडवीं जे कां ॥ १०३ ॥
काम करवी तें करिती। क्रोध मारवी तें मारिती। किंबहुना मातें पुरिती। दुःखाचा गुंडां ॥ १०४ ॥
आपलां परावां देहीं। दुःख देती जें जें कांहीं। मज आत्मया तेतुलाही। होय शीण ॥ १०५ ॥

अर्थ—हे सुज्ञ अर्जुना! जे कोणी तामस श्रद्धारूपी अंतःकरणक्षेत्रात केवळ आपल्याला व परक्याला पीडा देण्याचेच बीज पेरतात, तेथे तेच पीक येते. ॥ ९९ ॥ अर्जुना! बाहू नाही व नावेचाही आश्रय घेत नाही, अशा पुरुषाची समुद्रामध्ये जशी स्थिती होते, ॥ १०० ॥ किंवा ज्याप्रमाणे सवत आपल्या दुःखात भर टाकणारी होते, त्याप्रमाणे, जो पुरुष वैद्याचा द्वेष करतो व औषध पायदळी फेकून देतो, तो आपणच आपल्या दुःखात भर टाकणारा

होतो ॥ १०१ ॥ किंवा सुंदर डोळस माणसाच्या द्वेषाने त्याला पाहू नये म्हणून जो आपले डोळे फोडून घेतो, तो आंधळा होऊन जसा माजघरात पडून राहतो, ॥ १०२ ॥ त्याप्रमाणे, श्रुती, स्मृती, पुराणे इत्यादी शास्त्रांनी सांगितलेल्या मार्गांची निंदा करून अविवेकाने वाटेल तशा स्वैर वर्तनाच्या अरण्यात जे धावतात, त्या आसुरी लोकांची अशी स्थिती होते. ॥ १०३ ॥ कामवासना जे करवील ते करतात, क्रोध मारवील त्याला मारतात. फार काय सांगावे! मलाही दु:खाच्या दगडाखाली पुरतात. ॥ १०४ ॥ आपल्या अथवा दुसऱ्याच्या देहाच्या ठिकाणी जे जे ते दु:ख देतात, तो तो सर्व दु:खरूप शीण मज आत्मस्वरूपालाच होतो. ॥ १०५ ॥

गूढार्थदीपिका—मज आत्मया तेतुलाही। होय शीण।

(अध्याय सोळावा ओवी ४०० वरील गूढार्थदीपिका पाहा.)

पैं वाचेनिही पालवें। पापियां तयां नातळावें। परि पडिलें सांगावें। त्यजावया॥ १०६ ॥
प्रेत बाहिर घालिजे। कां अंत्यज संभाषणीं त्यजिजे। हें असो हातें क्षाळिजे। कश्मळातें॥ १०७ ॥
येथ शुद्धीचिया आशा। तो लेपु न मनवे जैसा। तयातें सांडावया तैसा। अनुवाद हा॥ १०८ ॥
तरि अर्जुना तूं तयांतें। देखसी तैं स्मर हो मातें। जें आन प्रायश्चित्त येथें। मानेल ना॥ १०९ ॥
म्हणौनि श्रद्धा जे सात्विकी। पुढती तेचि पैं येकी। जतन करावी निकी। सर्वोपरी॥ ११० ॥

अर्थ—वाचेच्या पदराने त्या पाप्यांना स्पर्श देखील करू नये, म्हणजे त्यांचे नाव देखील उच्चारू नये, पण रजोगुणी-तमोगुणी श्रद्धेचा त्याग करावा, हे सांगण्याकरता त्यांचे वर्णन करणे भाग पडले. ॥ १०६ ॥ ज्याप्रमाणे प्रेत बाहेर काढण्याकरताच त्याला स्पर्श करावा लागतो किंवा अंत्यजाशी न बोलण्याकरिताच त्याला "चालता हो" असे बोलावे लागते. हे असो. मल नाहीसा करण्याकरिताच तो हातांनी धुऊन काढावा लागतो. ॥ १०७ ॥ या सर्व ठिकाणी शुद्धीकरताच जसे स्पर्श करणे वाईट मानले जात नाही, त्याप्रमाणेच रजोगुणी-तमोगुणी श्रद्धेचा त्याग करावा, हे सांगण्याकरिताच त्याचा अनुवाद केला आहे. ॥ १०८ ॥ तरी अर्जुना! रजोगुणी-तमोगुणी श्रद्धेचा पुरुष दृष्टीस पडताच माझे स्मरण कर. कारण त्याच्या दर्शनाने होणाऱ्या पापाच्या निवृत्तीकरिता यावाचून दुसरे प्रायश्चित्त उपयोगी पडणार नाही. ॥ १०९ ॥ म्हणून पुन: सांगणे इतकेच की, सर्व रितीने एक सात्विक श्रद्धाच जतन करावी. ॥ ११० ॥

तरि धरावा तैसा संग। जेणें पोखे सात्विक लाग। सत्ववृद्धीचा भाग। आहार घेपे॥ १११ ॥
येरहवीं तरी पाहीं। स्वभाववृद्धीच्या ठायीं। आहारावांचूनि नाहीं। बळी हेतु॥ ११२ ॥
प्रत्यक्ष पाहें पां वीरा। जो सावध घे मदिरा। तो होऊनि ठाके माजिरा। तियेचि क्षणीं॥ ११३ ॥
कां जो सावियां अन्नरस सेवी। तो व्यापिजे वातश्लेष्मस्वभावीं। काय ज्वर जालिया निववी। पयादिक॥ ११४ ॥
ना तरी अमृत जयापरी। घेतलिया मरण वारी। कां आपुलियाऐसें करी। जैसें विष॥ ११५ ॥
तेविं जैसा घेपे आहार। धातु तैसाचि होय आकार। आणि धातुऐसा अंतर। भाव पोखे॥ ११६ ॥

अर्थ—ज्याच्या योगाने चित्तावर सत्वगुणाची पकड दृढ होईल, अशी संगती धरावी व ज्यात सत्वगुण अधिक आहे, असा आहार घ्यावा. ॥ १११ ॥ अर्जुना! साधारणत: पाहता स्वाभाविक गुणांच्या वृद्धीला आहारावाचून दुसरे बलवान कारण नाही. ॥ ११२ ॥ अर्जुना! प्रत्यक्षच पाहा बरे! सावध असलेला मनुष्य मद्य प्याल्याबरोबर त्याच क्षणी उन्मत्त होऊन जातो॥ ११३ ॥ किंवा मनुष्य जो अन्नरस सेवन करतो तो वात व कफ यांच्या स्वभावाने व्यापला जातो. ज्वर प्राप्त झाला असता दुग्धादी पदार्थ त्याला शांत करतात काय? ॥ ११४ ॥ किंवा अमृत प्राशन केले असता ते मृत्यू निवारण करते अथवा विष ज्या पदार्थात मिसळावे त्या पदार्थाला आपल्यासारखे विषारी, ज्याप्रमाणे करते, ॥ ११५ ॥ त्याप्रमाणे जसा आहार घ्यावा, तसे रसरक्तादी धातू व शरीर बनते आणि धातूप्रमाणे अंत:करणातील भाव उत्पन्न होतात. ॥ ११६ ॥

गूढार्थदीपिका—"अन्नं पुंसाशितं त्रेधा जायते जठराग्निना। मल: स्थविष्ठो भाग: स्यान्मध्यमो मांसतां व्रजेत्॥ मन: कनिष्ठो भाग: स्यात् तस्मादन्नमयं मन: ॥' (शिवगीता अ. ९)

मनुष्य जे अन्न खातो त्याचे जठराग्नीच्या योगाने स्थूल, मध्यम व सूक्ष्म असे तीन भाग होतात. स्थूल भाग मळरूप होतो. मध्यम भाग रसरक्तादी धातुरूप होतो व सूक्ष्म भाग मनरूप होतो; म्हणून खाल्लेल्या सात्विक, राजस, तामस अन्नाप्रमाणे मन सात्विक, राजस, तामस होते, हे सिद्ध आहे. वैद्यशास्त्राचे असेच म्हणणे आहे आणि येथे माउलीने वैद्यशास्त्राला अनुसरूनच ही ओवी दिली आहे.

जैसें भांडियाचेनि तापें। आंतुलें उदकही तापे। तैसी धातुवशें आटोपे। चित्तवृत्ती॥ ११७॥
म्हणौनि सात्विक रस सेविजे। तैं सत्वाची वाढी पाविजे। राजसा तामसा होइजे। येरीं रसीं॥ ११८॥
तरी सात्विक कोण आहार। राजसातामसा कायि आकार। हें सांगों करीं आदर। आकर्णनीं॥ ११९॥

अर्थ—ज्याप्रमाणे भांडे तापले असता त्या भांड्यातील पाणीही ऊन होते, त्याप्रमाणे शरीरातील धातू जसे सात्विक, राजस, तामस, असतील, त्याप्रमाणे चित्ताच्या वृत्तीही बनतात. ॥ ११७ ॥ म्हणूनच सात्विक रसाचे सेवन केले असता सत्त्वाची वृद्धी होते आणि दुसरे राजस-तामस रस सेवन केले असता राजस-तामस गुणांचीच वृद्धी होते. ॥ ११८ ॥ याकरिताच सात्विक आहार कोणता व राजस-तामस आहाराचे स्वरूप काय, हे आता सांगतो, लक्षपूर्वक ऐक. ॥ ११९ ॥

आहारस्त्वपि सर्वस्य त्रिविधो भवति प्रियः । यज्ञस्तपस्तथा दानं तेषां भेदमिमं शृणु॥ ७॥

अर्थ—सर्व मनुष्यांना प्रिय असलेला आहार तीन प्रकारचा आहे. त्याचप्रमाणे यज्ञ, तप, दान हेही त्रिविध आहेत. त्यांचे भेद सांगतो, ऐक. ॥ ७ ॥

आणि एकसरें आहारा। कैसेनि तिनी मोहरा। जालिया तेंही वीरा। रोकडें दाऊं॥ १२०॥
तरि जेवणाराचिया रुची। निष्पत्ति कीं बोनियाची। आणि जेविता तंव गुणांची। दासी येथ॥ १२१॥
जो जीव कर्ता भोक्ता। तो गुणांस्तव स्वभावता। पावोनियां त्रिविधता। चेष्टे त्रिधा॥ १२२॥
म्हणौनि त्रिविध आहार। यज्ञही त्रिप्रकार। तप दान हन व्यापार। त्रिविधचि ते॥ १२३॥
पैं आहारलक्षण पहिलें। सांगों जें म्हणीतलें। तें आईक गा भलें। रूप करूं॥ १२४॥

अर्थ—आणि सामान्यपणे एकच आहार असताना त्याचे तीन भेद कसे झाले, हे आता अर्जुना! स्पष्ट सांगतो. ॥ १२० ॥ तरी ज्याप्रमाणे जेवणाऱ्याच्या रुचीप्रमाणे अन्न तयार केले जाते आणि जेवणारा हा गुणाच्या स्वाधीन असतो. ॥ १२१ ॥ जो जीव कर्ता, भोक्ता आहे, तो सत्वादी गुणांच्या स्वाधीन झाल्यामुळे तीन प्रकारचा होऊन गुणानुसार तीन प्रकारचे व्यापार करतो. ॥ १२२ ॥ म्हणून त्याच्याकडून गुणानुसार घेतला जाणारा आहार व केले जाणारे यज्ञ, तप, दान हे सर्व तीन प्रकारचे होतात. ॥ १२३ ॥ प्रथम आहाराचे लक्षण सांगतो, असे जे म्हटले ते सांगतो. नीट लक्ष देऊन ऐक. ॥ १२४ ॥

आयुःसत्त्वबलारोग्यसुखप्रीतिविवर्धनाः । रस्याः स्निग्धाः स्थिरा हृद्या आहाराः सात्त्विकप्रियाः ॥ ८ ॥

अर्थ—आयुष्य, चित्तातील स्थैर्यादी सात्त्विक गुण, शक्ती, आरोग्य, सुख व अभिरुची वाढविणारे, स्वतः रसभरित, सुरस, स्निग्ध, शरीरात बराच वेळ टिकणारे व इंद्रियांना समाधान देणारे, असे सात्विक पुरुषांना प्रिय असणारे सात्विक आहार असतात. ॥ ८ ॥

तरी सत्वगुणाकडे। जैं दैवें भोक्ता पडे। तैं मधुरीं रसीं वाढे। मेचु तया॥ १२५॥
आंगेंचि द्रव्यें सुरसें। जे आंगेंचि पदार्थ गोडसे। आंगेंचि स्नेहें बहुवसें। सुपक्वें जियें॥ १२६॥
आकारें नव्हती डगळें। स्पर्शें अति निबळें। जिभेलागीं स्नेहाळें। स्वादें जियें॥ १२७॥
रसें गाढीं वरी ढिलीं। द्रवभावीं आथिलीं। ठायें ठाव सांडिलीं। अग्नितापें॥ १२८॥
आंगें सानें परिणामें थोर। जैसें गुरुमुखींचें अक्षर। तैसा अल्पीं जिहीं अपार। तृप्ति राहे॥ १२९॥
आणि मुखीं जैसीं गोडें। तैसींचिही ते आंतुलेकडे। तिये अन्नीं प्रीति वाढे। सात्विकांसी॥ १३०॥

अर्थ—जेव्हा भोक्त्या मनुष्याची प्रारब्धानुसार सत्त्वगुणाकडे प्रवृत्ती होते, तेव्हा त्याला मधुर रसच आवडतो. ॥ १२५ ॥ जे पदार्थ स्वत: मुळातच सुरस, स्वभावत: गोड, अंगचेच चांगले पक्व व स्नेहयुक्त झालेले आहेत, ॥ १२६ ॥ आकाराने अती मोठे नाहीत, स्पर्शाने अती मऊ, स्वादाने जिभेला स्नेहयुक्त लागतील, ॥ १२७ ॥ जे पदार्थ रसाने परिपूर्ण भरलेले असूनही वरून मऊ आहेत, जे ओलेपणाने संपन्न असून ठिकाणच्या ठिकाणी अग्नीची उष्णता न लागता परिपक्व होतात, ॥ १२८ ॥ ज्याप्रमाणे गुरुमुखातून निघणारे अक्षर स्वरूपत: थोडे असले तरी त्याचा परिणाम फार मोठा होतो, त्याप्रमाणे जे पदार्थ थोडे भक्षिले तरी तृप्ती मात्र फार वेळ राहते, ॥ १२९ ॥ त्याचप्रमाणे जे तोंडात घातले असताच गोड लागतात, जे पोटात गेल्यावरही सुखकारकच होतात, असेच अन्न सात्विक पुरुषाला अधिक आवडते. ॥ १३० ॥

एवं गुणलक्षण। सात्विक भोज्य जाण। आयुष्याचें त्राण। नीच नवें हें॥ १३१॥
येणें सात्विकरसें। जंव देहीं मेहो वरिसे। तंव आयुष्यनदी उससे। दिहाचि दिहा॥ १३२॥
सत्वाचिये कीर पाळती। कारण हाचि सुमती। दिवसाचिये उन्नती। भानु जैसा॥ १३३॥
आणि शरीरा हन मानसा। बळाचा पैं कुवासा। हा आहार तरी दशा। कैंची रोगां॥ १३४॥
हा सात्विक होय भोग्य। तैंचि भोगावया आरोग्य। शरीरासी भाग्य। उदयलें जाणों॥ १३५॥
आणि सुखाचें घेणे देणें। निकें उवाया ये येणें। हें असो वाढे साजणें। आनंदेंसीं॥ १३६॥
ऐसा सात्विक आहार। परिणमला थोर। करी हा उपकार। सबाह्यासी॥ १३७॥
आतां राजसासि प्रीती। जिहीं रसीं आथी। करूं तयाही व्यक्ती। प्रसंगें गा॥ १३८॥

अर्थ—अशा गुणलक्षणांच्या अन्नाला सात्विक आहार म्हणतात, असे जाण आणि हे अन्न म्हणजे आयुष्याचे नित्यनवे रक्षणच होय, असे समज. ॥ १३१ ॥ जेव्हा अशा या सात्विक आहाराचा रसरूपी मेघ शरीरावर वर्षाव करू लागतो, तेव्हा आयुष्यनदी दिवसेंदिवस वाढू लागते. ॥ १३२ ॥ ज्याप्रमाणे दिवसाची वाढ होण्याला सूर्य कारण आहे, त्याप्रमाणे, हे शुद्धबुद्धी अर्जुना! हा सात्विक आहार खरोखर सत्वगुणाचे रक्षण करण्याला कारणीभूत आहे॥ १३३ ॥ आणि हा सात्विक आहार म्हणजे शरीर, मन यांच्या बळाला आश्रय असणारा आहे. हा असल्यावर रोगाला ठावठिकाणा कोठून असणार? ॥ १३४ ॥ हा सात्विक आहार भोग्य झाला असता आरोग्य भोगण्यास शरीराचे भाग्यच उदयास आले, असे समजावे. ॥ १३५ ॥ या आहारामुळे देण्याघेण्याचा व्यवहार चांगला सुखाने होतो, असे स्पष्ट दिसून येईल. एवढेच नाही, तर त्याचे आनंदाशीही सख्य वाढते. ॥ १३६ ॥ असा हा सात्त्विक आहार अंतर्बाह्य थोर उपकार करणारा असा परिणाम पावतो. ॥ १३७ ॥ आता राजस पुरुषाला ज्या आहाराच्या ठिकाणी गोडी वाटते, प्रसंगाने तोही स्पष्ट करून सांगतो. ॥ १३८ ॥

कट्वम्ललवणात्युष्णतीक्ष्णरूक्षविदाहिनः । आहारा राजसस्येष्टा दुःखशोकामयप्रदाः ॥ ९ ॥

अर्थ—जो आहार अती कडू, अती आंबट, अती खारट, अती उष्ण, अती तीक्ष्ण, अती रुक्ष व शरीराचा अती दाह करणारा आहे व म्हणून जो दु:ख, शोक व रोग यांना उत्पन्न करणारा होतो, तो आहार रजोगुणी पुरुषांना प्रिय वाटतो. ॥ ९ ॥

तरि मारें उर्णें काळकूट। तेणें मानें जें कडुवट। कां चुनियाहूनि दासट। आम्ल हन॥ १३९॥
कणिकीतें जैसें पाणी। तैसें मीठ बांधया आणी। तेतुलीच मेळवणी। रसांतरांची॥ १४०॥
ऐसें खारट अपाडें। राजसा तया आवडे। उन्हाचेनि मिषें तोंडें। आगीचि गिळी॥ १४१॥
वाफेचिया सिगे। वातीही लाविल्या लागे। तैसें उन्ह मागे। राजस तो॥ १४२॥
वावदळ पाडूनि ठाये। साबळ डाहारला आहे। तैसें तीख तो खाये। जें घायेंविण रूपे॥ १४३॥
आणि राखेहूनि कोरडें। आंत बाहेरी येकें पाडें। तो जिव्हादंश आवडे। बहु तया॥ १४४॥

परस्परें दांतां। आदळ होय खातां। तो गा मुखीं घेतां। तोषों लागे॥ १४५॥
आधींच द्रव्यें चुरमुरीं। वरी परवडिजती मोहरी। जियें घेतां होती धुवारी। नाकातोंडा॥ १४६॥
हें असो उगें आगीतें। म्हणे तैसें राइतें। पढियें प्राणापरतें। राजसासि गा॥ १४७॥
ऐसा न पुरोनि तोंडा। जिभा केला वेडा। अन्नमिषें अग्नि भडभडां। पोटीं भरी॥ १४८॥

अर्थ—जो आहार, प्राण हरण करण्याचा गुण नसलेल्या काळकूट विषाप्रमाणे अती कडू असतो किंवा चुन्याहून दाहक असा अती आंबट असतो, ॥ १३९ ॥ कणकीचा गोळा करण्याकरिता जितके पाणी तितके या आहारात मीठ घातले जाते व तितकेच इतर रसही घातले जातात, ॥ १४० ॥ असा अत्यंत खारट आहार त्या राजस पुरुषाला आवडतो. तो ऊन ऊन खाण्याच्या मिषाने अग्नीच गिळतो. ॥ १४१ ॥ तो रजोगुणी पुरुष इतके ऊन पदार्थ खायला लागतो की त्या खाण्याच्या पदार्थाच्या शिगेवरील वाफेने दिव्याची ज्योतदेखील लावता येईल. ॥ १४२ ॥ वावटळीने एका ठिकाणी पाडले व तेथे पडली असलेली पहार अंगाला लागली, तर जसा घाव न पडता तीक्ष्ण दुःख होते, तसे तो राजस पुरुष तीक्ष्ण तिखट खातो. ॥ १४३ ॥ आतून व बाहेरून एकसारखे राखेपेक्षाही कोरडे, स्नेहहीन व जिभेला बोचणारे पदार्थ त्याला फार आवडतात. ॥ १४४ ॥ ज्या पदार्थांच्या रुक्षपणामुळे खाताना परस्पर दातावर दात आदळतील असे पदार्थ खायला मिळाले असता त्याला आनंद होतो. ॥ १४५ ॥ पदार्थ आधीच चुरचुरीत असले तरी जेणेकरून नाकातोंडात आगीचा फणका एकदम उठेल अशी आणखी वाटलेली मोहरी त्याला लावतो. ॥ १४६ ॥ हे असो. अग्नीलाही क्षणभर थांब म्हणेल, असे तिखट रायते त्या राजस पुरुषाला प्राणाहून प्रिय वाटते. ॥ १४७ ॥ अशा प्रकारे ज्याच्या तोंडाला कधी पुरेसे वाटत नाही व जो सर्वस्वी जिव्हालोलुप झाला आहे, तो पुरुष अन्नाच्या निमित्ताने पोटात पेटलेला अग्नीच भरतो. ॥ १४८ ॥

तैसाचि लवंघा सुटे। मग भुईं ना सेजे सांटे। पाणियाचें न सुटे। तोंडोनि पात्र॥ १४९॥
ते आहार नव्हती घेतले। व्याधिव्याळ जे सुतले। ते चेववाया घातलें। माजवण पोटीं॥ १५०॥
तैसें एकमेकां सळें। रोग उठती एके वेळे। ऐसा राजस आहार फळे। केवळ दुःखें॥ १५१॥
एवं राजसा आहारा। रूप केलें धनुर्धरा। परिणामाचाही विसुरा। सांगीतला॥ १५२॥
आतां तया तामसा। आवडे आहार जैसा। तेंही सांगों चिळसा। झणें तुम्ही॥ १५३॥

अर्थ—त्याबरोबर अंगाचा दाह सुरू होतो. मग तो जमिनीवर किंवा अंथरुणावर स्वस्थ पडून राहू शकत नाही व तोंडचे पाण्याचे भांडे सुटत नाही. ॥ १४९ ॥ असा घेतलेला आहार नव्हे, तर सुप्त असलेल्या व्याधिरूप सर्पांना जागे करण्याकरिता पोटात घातलेले मादक पदार्थ होत. ॥ १५० ॥ मग एकमेकांशी स्पर्धा करीत एकाच काळी सर्व रोग उत्पन्न होतात. याप्रमाणे राजस आहार केवळ दुःखाच्या रूपानेच फलद्रूप होतो. ॥ १५१ ॥ याप्रमाणे अर्जुना! राजस आहाराचे स्वरूप सांगून त्याच्या परिणामाचाही विस्तार सांगितला. ॥ १५२ ॥ आता तामसी पुरुषांना जो आहार आवडतो तो सांगतो, ऐक. तो ऐकताना तुम्हांला कदाचित किळस येईल. ॥ १५३ ॥

यातयामं गतरसं पूति पर्युषितं च यत् । उच्छिष्टमपि चामेध्यं भोजनं तामसप्रियम्॥ १०॥

अर्थ—शिजल्यावर एक प्रहर लोटल्यामुळे थंड झालेले, नीरस, दुर्गंधयुक्त, शिळे, उष्टे व अपवित्र असे भोजन तामसी पुरुषांना आवडते. ॥ १० ॥

तरी कुहिलें उष्टें खातां। न मनिजे तेणें अनहिता। जैसें कां उपहिता। म्हैसी खाय॥ १५४॥
निपजलें अन्न तैसें। दुपाहरीं कां येरे दिवसें। अतिकरें तैं तामसें। घेइजे तें॥ १५५॥
ना तरी अर्ध उकडिलें। का निपट करपोनि गेलें। तैसेंही खाय चुकलें। रसा जें येवों॥ १५६॥
जया कां आथि पूर्ण निष्पत्ती। जेथ रस धरी व्यक्ती। तें अन्न ऐसी प्रतीती। तामसा नाहीं॥ १५७॥
ऐसेनि कंहीं विपायें। सदन्ना वरपडा होये। तरी घाणी सुटे तंव राहे। व्याघ्र जैसा॥ १५८॥
कां बहुवेदिवशीं वोलांडिलें। स्वादपणें सांडिलें। शुष्क अथवा सडलें। गाभिणेंही हो॥ १५९॥

तेंही बाळाचे हातवरी। चिवडिलें जैसी राडी करी। कां सवें बैसोनि नारी। गोतांबील करी॥ १६०॥
ऐसेनि कश्मळें जैं खाय। तैं तया सुखभोजन ऐसें होय। परि येणेंही न धाय। पापिया तो॥ १६१॥

अर्थ—ज्याप्रमाणे म्हैस जवळ ठेवलेले कोणतेही अन्न खाते, त्याप्रमाणे तामसी लोक नासके, उष्टे, हे माझ्या हिताचे नाही, असा काहीच विचार करीत नाहीत. ॥ १५४॥ त्याप्रमाणेच तमोगुणी पुरुष सकाळी शिजविलेले अन्न त्यावरून बराच काळ लोटून गेल्यावर दुपारी किंवा दुसऱ्या दिवशी खातो. ॥ १५५॥ किंवा अर्धकच्चे शिजविलेले अथवा निःशेष करपलेले व रसहीन बनलेले असेही अन्न तामसी पुरुष खात असतो. ॥ १५६॥ पूर्ण शिजलेले, रुचीस आलेले, अशा अन्नाला तो तामसी पुरुष अन्न म्हणत नाही. ॥ १५७॥ इतकेही करून जर यदाकदाचित् तमोगुणी पुरुषापुढे पूर्ण शिजविलेले व स्वादिष्ट अन्न आलेच तर तो ते न खाता व्याघ्राप्रमाणे ते अन्न नासून त्याची घाण सुटेपर्यंत वाट पाहतो॥ १५८॥ किंवा ज्याच्यावरून पुष्कळ दिवस लोटले गेले, स्वादरहित, सुकलेले किंवा सडून, गाभीण अशा किड्यांनी भरलेले आणि तेही ज्याप्रमाणे चिखल करावा किंवा परिवारासह बसून गोतांबील करावी, त्याप्रमाणे मुलांच्या हातांनी चिवडले गेलेले, असे घाणेरडे अन्न जेव्हा तो तमोगुणी पुरुष खातो, तेव्हा त्याला भोजन केल्याचे समाधान वाटते. इतक्यानेही तो पापी तृप्ती मानीत नाही. ॥ १५९-१६१॥

मग चमत्कार देखा। निषेधाचा आंबुखा। जया कां सदोषा। कुद्रव्यासी॥ १६२॥
तया अपेयांच्या पानीं। अखाद्यांच्या भोजनीं। वाढविजे उतान्ही। तामसें तेणें॥ १६३॥
एवं तामस जेवणारा। ऐसैसी मेचु हे वीरा। तयाचें फळ दुसरां। क्षणीं नाहीं॥ १६४॥
जे जेव्हांचि हें अपवित्र। शिवे तयाचें वक्त्र। तेव्हांचि पापा पात्र। जाला तो कीं॥ १६५॥
यावरतें जें जेवी। ते जेविती वोज न म्हणावी। पोटभरती जाणावी। यातना ते॥ १६६॥
शिरच्छेदें काय होये। का आगी रिघतां कैसें आहे। हें जाणावें काइ पाहें। परि साहातचि असे॥ १६७॥
म्हणौनि तामसा अन्ना। परिणाम गा सिनाना। न सांगोंचि अर्जुना। देव म्हणे॥ १६८॥
आतां यथावरी। आहाराचिया परी। यज्ञही अवधारीं। त्रिधा असे॥ १६९॥
तरी तिहींमाजी प्रथम। सात्विक यज्ञाचें वर्म। आईक पां सुमहिम-। शिरोमणी॥ १७०॥

अर्थ—मग आश्चर्य असे पाहा की ते तामसी पुरुष, शास्त्रांनी निषिद्धपणाचा शिंतोडा टाकलेले सदोष व वाईट असे अपेय-मदिरादी पिण्याची व अभक्ष्य-मांसादी पदार्थ भक्षण करण्याची इच्छा वाढवितात. ॥ १६२-१६३॥ हे अर्जुना! याप्रमाणे तामस आहार करणाऱ्याला जशी आवड होत असते, तशा आहाराचे फळ त्या क्षणीच मिळते, दुसरा क्षण लागत नाही. ॥ १६४॥ कारण, ज्या क्षणी हे अपवित्र पदार्थ त्याच्या तोंडाला लागतात, त्या क्षणीच तो पापाला पात्र झाला. ॥ १६५॥ यानंतर, त्याच्या पदार्थसेवनाला जेवणाची तऱ्हा म्हणू नये तर ती पोट भरणारी यातनाच समजावी. ॥ १६६॥ शिरच्छेद केला असता काय होते? अग्नीत शिरले असता कसे वाटते, हे तसे करून पाहून जाणायचे असते काय? पण पाहा! तमोगुणी पुरुष हे सर्व सहन करीत असतात. ॥ १६७॥ म्हणून हे अर्जुना! तामस आहाराचा वेगळा परिणाम सांगत नाही, असे देव म्हणतात. ॥ १६८॥ आता यानंतर आहाराप्रमाणे यज्ञही तीन प्रकारचा आहे, ऐक. ॥ १६९॥ उत्तम कीर्ती असलेल्यामध्ये श्रेष्ठ अशा अर्जुना! तरी तिन्ही प्रकारांमध्ये प्रथम सात्विक यज्ञाचे लक्षण (सांगतो) ऐक. ॥ १७०॥

अफलाकांक्षिभिर्यज्ञो विधिदृष्टो य इज्यते। यष्टव्यमेवेति मनः समाधाय स सात्त्विकः॥ ११॥

अर्थ—यज्ञाच्या फलाची यत्किंचित इच्छा न करणाऱ्याकडून, शास्त्रविधीला धरून व यज्ञ करणे हे माझे कर्तव्य आहे, असे समजून मनाच्या समाधानाने जो यज्ञ केला जातो, त्याला सात्विक यज्ञ म्हणतात. ॥ ११॥

तरि एक प्रियोत्तम-। वांचोनि वाढों नेदी काम। जैसा का मनोधर्म। पतिव्रतेचा॥ १७१॥
ना ना सिंधूतें ठाकूनि गंगा। पुढारां न करीचि रिगा। कां आत्मा देखोनि उगा। वेद ठेला॥ १७२॥

तैसें जे आपुल्या स्वहितीं। वेंचूनियां चित्तवृत्ती। नुरवितीचि अहंकृती। फळालागीं॥ १७३॥
पातलेया झाडाचें मूळ। मागुतें सरों नेणेंचि जळ। जिरालें कां केवळ। तयाच्याचि आंगीं॥ १७४॥
तैसें मनें देहीं। यजननिश्चयाच्या ठायीं। हारपोनि जे कांहीं। वांच्छिती ना॥ १७५॥

अर्थ—ज्याप्रमाणे पतिव्रता स्त्री एका आपल्या प्रियोत्तम पतीच्या प्रेमावाचून दुसरी कोणतीही कामना मनात उत्पन्न होऊ देत नाही, ॥ १७१ ॥ किंवा ज्याप्रमाणे गंगा समुद्रास मिळाल्यानंतर पुढे जातच नाही किंवा आत्म्याचे स्वरूप पाहिल्याबरोबर वेद मौन धारण करतो. ॥ १७२ ॥ त्याप्रमाणे जे कोणी आत्मप्राप्तिरूप स्वहित साधण्याकडेच संपूर्ण चित्तवृत्ती लावून विषयसुखाच्या प्राप्तीची इच्छा करण्याकरिता अहंकार उरू देत नाहीत, ॥ १७३ ॥ अथवा झाडाच्या मुळाशी प्राप्त झालेले पाणी तेथल्या तेथेच झाडाच्या अंगात जिरून जाते, मागे परत येत नाही, ॥ १७४ ॥ त्याप्रमाणे जे कोणी मनाने व देहाने यजन करायचे या निश्चयाचे ठिकाणी तल्लीन होऊन गेल्यामुळे दुसऱ्या कशाचीच इच्छा करीत नाहीत. ॥ १७५ ॥

तिंहीं फळवांच्छात्यागीं। स्वधर्मावांचूनि विरागीं। कीजे जो यज्ञ सर्वांगीं। अळंकृत॥ १७६॥
परि आरिसां आपणपें। डोळां जैसें घेपे। कां तळहातींचें दीपें। रत्न पाहिजे॥ १७७॥
ना ना उदितें दिवाकरें। गमावा मार्ग दिठी भरे। तैसा वेदनिर्धारें। देखोनियां॥ १७८॥
तियें कुंडें मंडप वेदी। आणिकही संभारसमृद्धी। ते मेळवणी जैसी विधी। आपणपां केली॥ १७९॥
सकळावयव उचितें। लेणीं पातलीं जैसी आंगातें। तैसे पदार्थ जेथिंचे तेथें। विनियोगुनी॥ १८०॥
काय वानूं बहुतीं बोलीं। जैसी सर्वाभरणीं भरली। ते यज्ञविद्याचि रूपा आली। यजनमिषें॥ १८१॥
तैसा सांगोपांग। निपजे जो याग। नुठवूनियां लाग। महत्त्वाचा॥ १८२॥
प्रतिपाळ तरी पाटाचा। झाडीं कीजे तुळसीचा। परि फळा फुला छायेचा। आश्रय नाहीं॥ १८३॥
किंबहुना फळाशेवीण। ऐसेया निगुती निर्माण। होय तो याग जाण। सात्विक गा॥ १८४॥

अर्थ—स्वधर्माव्यतिरिक्त सर्वांविषयी वैराग्य धारण करून व विषयसुखाच्या फळाची इच्छा सोडून तंतोतंत विधीने सांगितल्याप्रमाणे जो यज्ञ करावा, ॥ १७६ ॥ ज्याप्रमाणे आरशाच्या योगाने आपण आपल्याला डोळ्यांनी पाहावे किंवा तळहातावरील रत्न दिव्याने पाहावे, ॥ १७७ ॥ किंवा सूर्योदय झाल्यावर प्रवासाला जाण्याचा मार्ग दृष्टीस पडावा, त्याप्रमाणे, जणू काय शास्त्रात सांगितलेल्या प्रत्यक्ष विधीनेच जमवाजमव केली, अशा प्रकारे वेदविधी पाहून कुंडे, मंडप, वेदी आणखी इतर यज्ञसमृद्धी मिळवून व ज्याप्रमाणे अंगावरील अवयवांवर त्या त्या अवयवांना योग्य असे अलंकार घालावेत, त्याप्रमाणे शास्त्रांनी सांगितल्याप्रमाणे यज्ञीय पदार्थांचा जेथल्या तेथे विनियोग करून ॥ १७८-१८० ॥ शब्दाने फार काय प्रशंसा करावी ! यजनक्रियेच्या मिषाने साक्षात यज्ञविद्याच सर्व अलंकाराने अलंकृत होऊन जणू प्रगट झाली, ॥ १८१ ॥ त्याप्रमाणे प्रतिष्ठा वाढविण्याच्या निमित्ताचा स्पर्श न होऊ देता अंगउपांगांसहित जो यज्ञ निष्पन्न होतो, ॥ १८२ ॥ तुळशीचे झाड फळ, फूल, छाया याला आश्रय होत नसेल तरी त्याचा जसा उत्तम प्रतिपाळ केला जातो, ॥ १८३ ॥ तसा, फार काय बोलावे ! मनात यत्किंचितही फळाची इच्छा नसून जो यथार्थ यज्ञ केला जातो, तो सात्विक यज्ञ होय, असे जाण. ॥ १८४ ॥

अभिसन्धाय तु फलं दम्भार्थमपि चैव यत् । इज्यते भरतश्रेष्ठ तं यज्ञं विद्धि राजसम्॥ १२॥

अर्थ—हे भरतश्रेष्ठ अर्जुना ! फळाकडे लक्ष ठेवून व लोकांत प्रतिष्ठा मिरविण्याकरिता जो यज्ञ केला जातो, तो राजसयज्ञ होय, असे जाण. ॥ १२ ॥

आतां यज्ञ कीर वीरेशा। करी पैं याचिऐसा। परि श्राद्धालागीं जैसा। अवंतिला रावो॥ १८५॥
जरि राजा घरासि ये। तरी बहुत उपयोगा जाये। आणि कीर्तीही होये। जगामाजी॥ १८६॥
तैसा धरूनि आवांका। म्हणे स्वर्ग जोडेल असिका। दीक्षित होईन मान्य लोकां। घडेल याग॥ १८७॥
ऐसी केवळ फळालागीं। महत्त्व फोकरावया जगीं। पार्था निष्पत्ती जे यागीं। राजस पैं ते॥ १८८॥

अर्थ—सर्व वीर पुरुषांत श्रेष्ठ अशा अर्जुना! ज्याप्रमाणे राजाला श्राद्धाकरिता जेवावयास बोलवावे, त्याप्रमाणेच खरोखर राजस यज्ञ केला जात असतो. ॥ १८५ ॥ कारण राजा जर घरी आला, तर त्याच्या येण्याचा पुष्कळ उपयोग होतो आणि जगात कीर्तीही होते. ॥ १८६ ॥ त्याप्रमाणे तो मनात अशी कल्पना करतो की आपण यज्ञ केला असता सर्व स्वर्गाचे राज्य हाती येईल, लोक मला दीक्षित म्हणून मान देतील व अनायासे यागही घडेल, ॥ १८७ ॥ अर्जुना! अशा रितीने फळाची आशा धरून व आपली प्रतिष्ठा मिरविण्याकरिता जी यज्ञक्रिया केली जाते, ती राजस होय. ॥ १८८ ॥

विधिहीनमसृष्टान्नं मन्त्रहीनमदक्षिणम् । श्रद्धाविरहितं यज्ञं तामसं परिचक्षते॥ १३॥

अर्थ—शास्त्रविधी, यथोक्त अन्नदान, वैदिक मंत्र, शास्त्रोक्त दक्षिणा व श्रद्धा यांवाचून जो यज्ञ केला जातो, त्याला तामस यज्ञ म्हणतात. ॥ १३ ॥

आणि पशुपक्षिविवाहीं। जोसी कामापरौता नाहीं। तैसा तामसा यज्ञा पाहीं। आग्रहचि मूळ॥ १८९॥
वारया वाट न वाहे। कीं मरण मुहूर्त पाहे। निषिद्धांसी बिहे। आगी जरी॥ १९०॥
तरी तामसाचिया आचारा। विधीचा आथीना वोढावारा। म्हणूनि तो धनुर्धरा। उत्संखळु॥ १९१॥
नाहीं विधीची तेथ चाड। न ये मंत्रादिक तयाआड। अन्नजातां न सुये तोंड। मासिये जेवीं॥ १९२॥
वैराचा बोध ब्राह्मणा। तेथ कें रिगेल दक्षिणा। अग्नि जाला वाउधाणा। वरपडा जैसा॥ १९३॥
तैसें वांयांचि सर्वही वेंचे। मुख न देखतां श्रद्धेचें। नागविलें निपुत्रिकाचें। जैसें घर॥ १९४॥
ऐसा जो यज्ञाभास। तया नाम याग तामस। आइकें म्हणे निवास। श्रियेचा तो॥ १९५॥

अर्थ—ज्याप्रमाणे पशुपक्ष्यांच्या विवाहात कामवासनेवाचून दुसरा जोशी नसतो, त्याप्रमाणे तामसयज्ञाचे मूळ कारण आग्रह असतो. ॥ १८९ ॥ वाऱ्याकडून एखादी वाट वाहविली जाणार नाही किंवा मरण मुहूर्ताची वाट पाहील अथवा अग्नी निषिद्ध पदार्थांना जाळण्याला कदाचित भिईल; पण तमोगुणी पुरुषाच्या आचाराला शास्त्रीय विधीचा धरबंधच नसतो; म्हणून हे अर्जुना! त्याचा आचार उच्छृंखल म्हटला जातो. ॥ १९०-१९१ ॥ ज्याप्रमाणे अमुक प्राण्यांच्या अन्नाला तोंड लावावे, असा माशांना निर्बंध नसतो, म्हणून त्या कोणत्याही प्राण्यांच्या अन्नांना तोंड लावल्यावाचून राहात नाहीत. त्याप्रमाणे तामसयज्ञात वैदिकविधीचा निर्बंध नसतो. वैदिक मंत्रादिक त्यांच्याकडे येत नाहीत. ॥ १९२ ॥ जेथे ब्राह्मणाविषयी शत्रुत्वाची भावना आहे, तेथे दक्षिणेचा विचार काय होणार? किंवा ज्याप्रमाणे वावटळीला अग्नीची जोड मिळावी किंवा ज्याला संतान नाही त्याचे घर (घराची संपत्ती) व्यर्थच वाटेल त्याच्याकडून लुटली जावी, त्याप्रमाणे श्रद्धेचे तोंडहि न पाहता केल्या जाणाऱ्या तामसयज्ञात व्यर्थच संपूर्ण संपत्ती खर्ची पडते. ॥ १९३-१९४ ॥ अशा केवळ आभासरूप यज्ञास तामसयज्ञ म्हणतात ऐक, असे लक्ष्मीचे राहण्याचे स्थान भगवान श्रीकृष्ण म्हणाले. ॥ १९५ ॥

आतां गंगेचें एक पाणी। परि नेलें आनानीं वाहणीं। एक मैळ एक आणी। शुद्धत्व जैसें॥ १९६॥
तैसें तिहीं गुणीं तप। येथ जाहालें आहे त्रिरूप। तें एक केलें दे पाप। उद्धरी एक॥ १९७॥
तरि तेंचि तिहीं भेदीं। कैसेनि पां म्हणौनि सुबुद्धी। जाणों पाहासी तरि आधीं। तपचि जाण॥ १९८॥
येथ तप म्हणिजे काई। तें स्वरूप दावूं पाहीं। मग भेदिलें गुणीं तिहीं। तें पाठीं बोलों॥ १९९॥
तरि तप जें कां सम्यक। तेंही त्रिविध आइक। शारीर मानसिक। शाब्द गा॥ २००॥

अर्थ—आता गंगेचे पाणी एकच पण निरनिराळ्या वाहीतून नेले असता ते शुद्ध वाहीतून शुद्ध करणारे व अशुद्ध वाहीतून अशुद्ध करणारे होते, ॥ १९६ ॥ त्याप्रमाणे तपही सत्वादी तीन गुणांमुळे सात्विक, राजस, तामस असे तीन प्रकारचे झाले आहे. त्यात राजस-तामस तप केले असता पापरूप होते व सात्विक तप केले असता ते शुद्ध करणारे होते. ॥ १९७ ॥ हे सुबुद्धी अर्जुना! ते तप तीन प्रकारचे कशाने झाले, हे जाणण्याची इच्छा असेल तर तेच आधी ऐकून घे. ॥ १९८ ॥ तेथे तप म्हणजे काय ते कळण्याकरिता प्रथम त्याचे स्वरूप सांगतो, पाहा!

मग तीन गुणांमुळे ते तीन प्रकारचे कसे होते, हे नंतर सांगतो. ॥ १९९ ॥ तरी यथार्थ जे तप ते शारीरिक, मानसिक आणि शाब्द किंवा वाचिक असे तीन प्रकारचे आहे, ऐक. ॥ २०० ॥

देवद्विजगुरुप्राज्ञपूजनं शौचमार्जवम् । ब्रह्मचर्यमहिंसा च शारीरं तप उच्यते॥ १४॥

अर्थ—देव, ब्राह्मण, गुरू व ज्ञानी यांचे पूजन, शरीरशुद्धी, सरळपणा, ब्रह्मचर्य व प्राण्यांची हिंसा न करणे या आचाराला शरीराने होणारे तप म्हणतात. ॥ १४ ॥

आतां या तिहींमाझारीं। शारीर तंव अवधारीं। तरि शंभू कां श्रीहरी। पढियंता होय॥ २०१॥
तया प्रिया देवतालया। यात्रादिकें करावया। आठही पाहार जैसें पायां। उळिग घापे॥ २०२॥
देवांगणमिरवणियां। अंगोपचार पुरवणियां। करावया म्हणियां। शोभती हात॥ २०३॥
लिंग कां प्रतिमा दिठीं। देखतखेंवो अंगेष्टी। लोटिजे कां काठी। पडली जैसी॥ २०४॥
आणि विधिविनयादिकीं। गुणीं वडील जे लोकीं। तयां ब्राह्मणांची निकी। पाइकी कीजे॥ २०५॥
अथवा प्रवासें कां पीडा। कां शिणले जे सांकडां। ते जीव सुरवाडा। आणीजती॥ २०६॥
सकळ तीर्थांचिये धुरे। जियें कां मातापितरें। तयां सेवेसि कीर शरीरें। लोण कीजे॥ २०७॥
आणि संसाराऐसा दारुण। जो भेटलाचि हरी शीण। तो ज्ञानदानीं सकरुण। भजिजे गुरु॥ २०८॥

अर्थ— आता तिघांमधील शारीरिक तप ऐक. तरी शिव किंवा श्रीहरी यांपैकी ज्याचे प्रेम असेल त्या प्रिय देवतेच्या मंदिराला यात्रा करण्यासाठी पायाला जणू काय आठही प्रहर सारखा भोवरा लावावा, ॥ २०१-२०२ ॥ देवाचे अंगण सडासंमार्जनाने व रंगमाळादिकांनी सुशोभित करण्याकरिता व त्याच्या मूर्तीच्या अंगाला षोडश उपचार पुरवून पूजनादी करण्याकरिताच हात शोभत आहेत, (असे समजावे). ॥ २०३ ॥ शिवाचे लिंग किंवा विष्णुमूर्ती दृष्टीस पडताच, हातातील काठी पडावी, त्याप्रमाणे नमस्काराकरिता एकदम शरीरकाठी लोटली जावी, ॥ २०४ ॥ लोकात जे कोणी गुणवान व वडील असे ब्राह्मण असतील त्यांची शास्त्रात सांगितलेल्या सत्कारविधीने व विनयादिकाने सेवा करावी, ॥ २०५ ॥ किंवा प्रवासाने, रोगादी पीडेने अथवा संकटात सापडल्याने जे कष्टी झाले असतील त्या जीवांना सुखी करून सोडावे. ॥ २०६ ॥ संपूर्ण तीर्थांपेक्षा श्रेष्ठ असे जे मातापिता त्यांच्या सेवेवरून शरीर ओवाळून टाकावे-म्हणजे त्यांच्या सेवेपुढे ते तुच्छ मानावे ॥ २०७ ॥ आणि ज्याची भेट झाली असता आत्मज्ञान प्राप्त होऊन संसारासारखे अत्यंत दारुण दु:खही नाहीसे होते, त्या करुणासंपन्न अशा श्रीगुरूची सर्वतोपरी सेवा करावी. ॥ २०८ ॥

आणि स्वधर्माचा आगिठां। देहजाड्याचिया किटा। आवृत्तिपुटीं सुभटा। झाडी कीजे॥ २०९॥

अर्थ—हे उत्तम योद्ध्या अर्जुना! स्वधर्मरूपी अग्नीत शास्त्रोक्त दैनंदिन आचरणाच्या आवृत्तीची पुटे देऊन देहाचे ठिकाणी असलेला जाड्यरूपी मळ जाळून टाकावा. ॥ २०९ ॥

गूढार्थदीपिका—'मृद्रूपो हि यथा कुंभो तद्वद्देहोऽपि चिन्मय: 'मातीपासून झालेला घट जसा मातीरूपच असतो, तसा चिन्मयस्वरूपाचे ठिकाणी भासलेला विवर्तरूप देहही चिन्मयच आहे, असे आचार्य म्हणतात. पण अनादी अज्ञानामुळे व दुर्धर पापाचरणजन्य तमोगुणामुळे जीवाला हा चिन्मय देहच जड दिसतो. यथोक्त धर्माचरणाच्या दैनंदिन आवृत्तीमुळे तमोगुणाला कारण होणारे मागील पाप जसे जसे क्षीण होत जाते, तसा तसा तमोगुण क्षीण होत जाऊन सत्वगुण वाढत जातो व शेवटी रजस्तमोगुण अत्यंत क्षीण झाले असता वाढलेल्या सत्वगुणाने श्रीगुरुकृपा होऊन अधिष्ठानरूप सच्चिदानंद परब्रह्माचा साक्षात्कार होतो व त्याचा विवर्तरूप असा देहही चिन्मयच आहे, असा अनुभव येतो. असा या ओवीतील भाव आहे.

वस्तु भूतमात्रीं नमिजे। परोपकारीं भजिजे। स्त्रीविषयीं नियमिजे। नांवेंनांव॥ २१०॥
जन्मतेचि प्रसंगें। स्त्रीदेह शिवणें आंगें। तेथूनि जन्म अवघें। सोंविळें कीजे॥ २११॥
भूतमात्राचेनि नांवें। तृणही नासुडावें। किंबहुना सांडावे। छेद भेद॥ २१२॥

ऐसैसी जैं शरीरीं। राहाटीची पडे उजरी। तैं शारीर तप घुमरी। आलें जाण॥ २१३॥
पार्था समस्तही हें करणें। देहाचेनि प्रधानपणें। म्हणौनि ययातें मी म्हणें। शारीर तप॥ २१४॥
एवं शारीर जें तप। तयाचें दाविलें रूप। आतां आईक निष्पाप। वाङ्मय तें॥ २१५॥

अर्थ—परब्रह्म परमात्मा अणुरेणूत व्यापक आहे, असे समजून जीव दृष्टीस पडताच परमात्म्याकडे लक्ष देऊन नमस्कार करावा, परोपकाराने परमेश्वराचे सेवन करीत असावे आणि स्त्रीसंभोगाची इच्छा समूळ नाहीशी होईल, अशा रितीने स्त्रीसंभोगाचे नियमन करावे–म्हणजे स्त्रीसंभोगाचा कालावधी वाढवीत जावा. ॥ २१० ॥ जन्म झाला तेव्हांच स्त्रीदेहाचा स्पर्श झाला असेल तो झाला, त्यानंतर संपूर्ण जन्म स्त्रीदेहस्पर्शावाचून ठेवावा. ॥ २११ ॥ पदार्थमात्र जीव आहे असे समजून गवतालाही हिसका लागू देऊ नये. एवढेच नाही तर, त्याला तोडणे, कापणे हे देखील करू नये. ॥ २१२ ॥ अशा अशा प्रकारे जेव्हा शरीराची राहाटी उत्कर्षास पोहोचते तेव्हा शारीरिक तप पूर्ण झाले, असे जाण. ॥ २१३ ॥ अर्जुना! हे सर्व शरीराच्याच आश्रयाने होत असल्यामुळे याला मी शरीर तप म्हणतो. ॥ २१४ ॥ याप्रमाणे शारीरिक जे तप त्याचे स्वरूप सांगितले. आता पापरहित असे वाचिक तप सांगतो, ऐक. ॥ २१५ ॥

अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहितं च यत् । स्वाध्यायाभ्यसनं चैव वाङ्मयं तप उच्यते॥ १५ ॥

अर्थ—ऐकल्याबरोबर खिन्नता उत्पन्न न करणारे, सत्य, प्रिय व हितकारक असे बोलणे, आपल्याला दररोज पठण करण्यास योग्य म्हणून स्वीकारलेली स्तोत्रे व ग्रंथ यांचा अभ्यास करणे, याला वाचिक तप म्हणतात. ॥ १५ ॥

तरी लोहाचें आंग तुक। न तोडितांचि कनक। केलें जैसें देख। परिसें तेणें॥ २१६॥
तैसें न दुखवितां सहजें। जावळिया सुख निपजे। ऐसें साधुत्व कां देखिजे। बोलणां जिये॥ २१७॥
पाणी मुदल झाडा जाये। तृण ते प्रसंगेंचि जिये। तैसें एका बोलिलें होये। सर्वांहि हित॥ २१८॥
जोडे अमृताची सुरसरी। तैं प्राणांतें अमर करी। स्नानें पाप ताप वारी। गोडीही दे॥ २१९॥
तैसा अविवेकही फिटे। आपुलें अनादित्व भेटे। आइकतां रुचि न विटे। पीयूषीं जैसी॥ २२०॥
जरी कोणी करी पुसणें। तरी होआवें ऐसें बोलणें। ना तरी आवर्तणें। निगम कां नाम॥ २२१॥
ऋग्वेदादि तीन्ही। प्रतिष्ठीजती वाग्भुवनीं। केली जैसी वदनीं। ब्रह्मशाळा॥ २२२॥
ना तरी एकाधें नांव। तेंचि शैव कां वैष्णव। वाचे वसे तें वाग्भव। तप जाणावें॥ २२३॥
आतां तप जें मानसिक। तेंही सांगों आइक। म्हणे लोकनाथनायक-। नायकचि तो॥ २२४॥

अर्थ—ज्याप्रमाणे लोखंडाचा तुकडा न तोडता किंवा वजन कमी न करता परीस लोखंडाचे सोने करतो, ॥ २१६ ॥ त्याप्रमाणे कोणाचेही चित्त न दुखविता सहजच जवळच्या माणसाला सुख–समाधान वाटेल असा ज्या बोलण्यात सज्जनपणा असतो, ॥ २१७ ॥ ज्याप्रमाणे पाणी मुख्यत: झाडाला दिले जाते, पण हाच प्रसंग गवताला वाढण्यास कारणीभूत होतो; त्याप्रमाणे ज्या एकाला बोलण्याने सर्वांनाच सुख–समाधान वाटते, ॥ २१८ ॥ अमृताची गंगा प्राप्त झाली तर ती प्राशन केली असता प्राणाला अमर करते, गोडीही देते व तिच्यात स्नान केले असता ती पाप–ताप नाहीसे करते, ॥ २१९ ॥ त्याप्रमाणे, जे बोलणे ऐकले असता अविवेक नाहीसा होऊन आपल्या अनादी स्वरूपस्थितीचे ज्ञान होते व अमृताचा जसा वीट येत नाही, तसे ऐकताना त्याचा वीटही येत नाही. ॥ २२० ॥ कोणी विचारल्यास असे बोलणे असावे, नाही तर वेदाची किंवा हरिनामाची आवर्तने करीत बसावे. ॥ २२१ ॥ मुखाला जणू काय वेदशाळाच बनविली अशा रितीने ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद या तिन्ही वेदांची मुखमंदिरात स्थापना करावी–म्हणजे तिन्ही वेद मुखोद्गत करावेत ॥ २२२ ॥ किंवा शिव, विष्णू यांच्यापैकी कोणाचेही नाव वाणीवर राहावे, याला वाणीचे तप म्हणतात. ॥ २२३ ॥ आता ज्याला मानसिक तप म्हणतात, तेही सांगतो, ऐक. असे लोकनाथ–म्हणजे लोकपाल त्यांचा नायक म्हणजे ब्रह्मदेव व त्यांचा नायक म्हणजे भगवान श्रीकृष्ण म्हणाले. ॥ २२४ ॥

मनःप्रसादः सौम्यत्वं मौनमात्मविनिग्रहः । भावसंशुद्धिरित्येतत्तपो मानसमुच्यते॥ १६ ॥

अर्थ—रागद्वेषरहित मन होणे, मनात सर्व लोकांच्या हिताची इच्छा असणे, न बोलणे, इंद्रिये व त्याचे विषय यांकडे मनाने न जाणे व निष्कपट बुद्धी याला मानसिक तप म्हणतात. ॥ १६ ॥

तरि सरोवर तरंगीं। सांडिलें आकाश मेघीं। कां चंदनाचे उरगीं। उद्यान जैसें॥ २२५॥
ना ना कळावैषम्यें चंद्र। कां सांडिला आधीं नरेंद्र। ना तरि क्षीरसमुद्र। मंदराचळें॥ २२६॥
तैसीं नानाविकल्पजाळें। सांडूनि गेलिया सकळें। मन राहे कां केवळें। स्वरूपें जें॥ २२७॥
तपनेंवीण प्रकाश। जाड्येंवीण रस। पोकळीवीण अवकाश। होय जैसा॥ २२८॥
तैसी आपली सोय देखे। आणि आपलिया स्वभावा मुके। हिंवली जैसी आंगिकें। हिवों नेदी॥ २२९॥
मग नचलते कळंकेंवीण। शशिबिंब जैसें नित्य परिपूर्ण। तैसें चोखीं शृंगारपण। मनाचें जें॥ २३०॥

अर्थ—ज्याप्रमाणे तरंगांनी सरोवराला किंवा मेघांनी आकाशाला अथवा सर्पांनी चंदनाचे उद्यानाला सोडले, ॥ २२५ ॥ किंवा कळावैषम्याने चंद्राला किंवा चिंतेने राजाला किंवा क्षीरसमुद्राला मंदार पर्वताने सोडले, ॥ २२६ ॥ त्याप्रमाणे संपूर्ण विकल्पजाळ मनाला सोडून गेले असता मन जे केवळ स्वरूपभूत होऊन राहते, ॥ २२७ ॥ ज्याप्रमाणे उष्णतेवाचून प्रकाश असावा किंवा जडपणावाचून रस असावा किंवा पोकळीवाचून अवकाश असावा, ॥ २२८ ॥ जशी थंडी आपल्या अंगच्या थंडीने थरथर कापत नाही, त्याप्रमाणे मन आपल्याच खऱ्या ब्रह्मरूप आश्रयाला जाणून जेव्हा आपल्या संकल्पविकल्परूप स्वभावाचा त्याग करते, ॥ २२९ ॥ तेव्हा कलंकापासून मुक्त होऊन न चालणारे चंद्रबिंब जसे नित्य व परिपूर्ण होते, तसे मन शुद्ध ब्रह्मभावामुळे जे शृंगारित होते, ॥ २३० ॥

बुजाली वैराग्याची वोरप। जिराली मनाची धांप कांप। तेथ केवळ जाली वाफ। निजबोधाची॥ २३१॥
म्हणौनि विचारावया शास्त्र। राहाटवावें जें वक्त्र। तें वाचेचेंही सूत्र। हातीं न धरी॥ २३२॥
तें स्वलाभ लाभलें लाभलेपणें। मन मनपणाही धरूं नेणे। शिवतलें जैसें लवणें। आपलें निज॥ २३३॥
तेथ कें उठिती ते भाव। जिहीं इंद्रियमार्गीं धांव। घेऊनि ठाकावे गांव। विषयांचे ते॥ २३४॥
म्हणौनि तिये मानसीं। भावशुद्धीचि असे आपैसी। रोमशुचि जैसी। तळहाताची॥ २३५॥
काय बहु बोलों अर्जुना। जैं हे दशा ये मना। तैं मनस्तपोभिधाना। पात्र होय ती॥ २३६॥
परि तें असो हें जाण। मानसतपाचें लक्षण। देवो म्हणे संपूर्ण। सांगितलें॥ २३७॥
एवं देहवाचाचित्तें। जें पातलें त्रिविधत्वातें। तें सामान्य तप तूतें। परिसविलें गा॥ २३८॥
आतां गुणत्रयसंगें। हेंचि विशेषें त्रिविधीं रिगे। तेंही आइक चांगें। प्रज्ञाबळें॥ २३९॥

अर्थ—वैराग्याचा ओरखडा बुजून जातो, मनाची धाव व अस्वस्थता नाहीशी होते व मन केवळ एक ब्रह्मबोधाची भूमिकाच होऊन राहते, ॥ २३१ ॥ म्हणून शास्त्राचा विचार करण्याकरिता ज्या वाणीचा व्यापार करावा लागतो, त्या वाणीरूप सूत्राला तो हाती धरत नाही (म्हणजे मौन धरून राहतो). ॥ २३२ ॥ मिठाने आपल्या मूळ पाणीरूप स्वरूपास स्पर्श केला असता, जसे ते पाणीरूप होऊन जाते, त्याप्रमाणे आपल्या अधिष्ठानभूत मूळ स्वरूपाचा लाभ झाला असता ते मन पूर्वीप्रमाणे आपले संकल्प-विकल्प धरणे विसरून जाते, ॥ २३३ ॥ अशा स्थितीत ज्या भावामुळे इंद्रियमार्गाने धावत जाऊन विषयाचे गावाला मन जाते, ते भाव उठण्याला अवसर कोठून असणार? ॥ २३४ ॥ म्हणून ज्याप्रमाणे तळहाताच्या ठिकाणी केस स्वभावतःच नसतात, त्याप्रमाणे अशा मनाच्या ठिकाणी साहजिकच भावशुद्धी म्हणजे विकल्परहित स्थिती असते. ॥ २३५ ॥ अर्जुना! फार काय सांगू! जेव्हा मनाला अशी दशा प्राप्त होते, तेव्हा ते मनच मानसिक तप या नावाला पात्र होते. ॥ २३६ ॥ पण ते असो. मानसतपाचे संपूर्ण लक्षण तुला सांगितले, हे लक्षात ठेव, असे देव म्हणाले. ॥ २३७ ॥ याप्रमाणे जे एक सामान्य तप काया-वाचा-मनामुळे या तीन प्रकाराला प्राप्त झाले, ते तुला ऐकविले. ॥ २३८ ॥ आता सत्वादी तीन गुणांमुळे ते विशेष तीन प्रकारचे कसे होते तेही सांगतो. चांगले लक्ष देऊन ऐक. ॥ २३९ ॥

श्रद्धया परया तप्तं तपस्तत्त्रिविधं नरैः । अफलाकांक्षिभिर्युक्तैः सात्त्विकं परिचक्षते ॥ १७ ॥

अर्थ—कायिक, वाचिक, मानसिक हे तीन प्रकारचे तप अत्यंत श्रद्धेने व फळाची-म्हणजे विषयसुखाची-यत्किंचितही इच्छा न करणाऱ्या व निश्चल चित्त झालेल्या पुरुषाने केले असता, सात्विक म्हटले जाते. ॥ १७ ॥

तरि हेंचि तप त्रिविधा। जें दाविलें तुज प्रबुद्धा। तेंचि करीं पूर्णश्रद्धा। सांडूनि फळ ॥ २४० ॥
जैं पुरतिया सत्वशुद्धी। आचरिजे आस्तिक्यबुद्धी। तैं तयातेंचि गा प्रबुद्धीं। सात्विक म्हणिपे ॥ २४१ ॥

अर्थ—हे शहाण्या अर्जुना! तुला कायिक, वाचिक, मानसिक असे जे तीन प्रकारचे तप सांगितले ते फलाशा सोडून अत्यंत श्रद्धेने कर. ॥ २४० ॥ जेव्हा निःशेष विकल्परहित पूर्ण आस्तिक्यबुद्धीने हे तप करावे, तेव्हा सुज्ञ लोक त्याला सात्विक तप म्हणतात. ॥ २४१ ॥

सत्कारमानपूजार्थं तपो दम्भेन चैव यत् । क्रियते तदिह प्रोक्तं राजसं चलमध्रुवम् ॥ १८ ॥

अर्थ—आपला सत्कार-मान-पूजा करून घेण्याकरिता म्हणून जे तप दंभाने केले जाते, त्याचे फळ अनियमित व अस्थिर असल्यामुळे त्याला राजस तप म्हटले आहे. ॥ १८ ॥

ना तरी तपस्थापनेलागीं। दुजेपण मांडूनि जगीं। महत्त्वाद्रीच्या शृंगीं। बैसावया ॥ २४२ ॥
त्रिभुवनींचिया सन्माना। न वचावें ठाया आना। धुरेचिया आसना। भोजनालागीं ॥ २४३ ॥
विश्वाचिया स्तोत्रा। आपण होआवया पात्रा। विश्वें आपलिया यात्रा। करावया ॥ २४४ ॥
लोकांचिया विविध पूजा। आश्रय न धरावया दुजा। भोग भोगावे वोजा। महत्त्वाचिये ॥ २४५ ॥
आंग बोल माखूनि तपें। विकावया आपणपें। अंगहीन पडपे। जियापरी ॥ २४६ ॥
हें असो धनमानीं आस। वाढवूनी तप कीजे सायास। तैं तेंचि तप राजस। बोलिजे गा ॥ २४७ ॥

अर्थ—किंवा तपाची प्रतिष्ठा करण्याकरिता जगात द्वैत भावाचे प्रतिपादन करून श्रेष्ठपणाच्या पर्वतशिखरावर बसण्याकरिता, त्रिभुवनात असलेल्या श्रेष्ठत्वाच्या मानाने माझ्यावाचून दुसरीकडे जाऊ नये व आसन भोजन इत्यादी वेळेचा पहिला मान मिळावा म्हणून, सर्व जगात आपलीच स्तुती गायिली जावी व आपल्या दर्शनाकरिता लोकांनी यात्रा कराव्यात म्हणून, लोकांच्या नाना प्रकारच्या पूजेने माझ्यावाचून दुसरा आश्रय धरू नये व मोठेपणाच्या रितीने-म्हणजे महंत होऊन-भोग भोगावे म्हणून, ज्याप्रमाणे एखादे अंग नसलेला पुरुष आपल्याला भूषविणाऱ्या अशा वस्त्रादिकांनी सन्मान मिळवितो, त्याप्रमाणे स्तुतिस्तोत्रादिकांनी व मानसन्मानद्वारा आपल्याला विकण्याकरिता आपले मोठेपण दिसेल असे शब्द तपाचे द्वारा लोकांकडून माखून घेतो-म्हणजे लावून घेतो. ॥ २४२-२४६ ॥ हे असो. धन-मान मिळविण्याची आशा वाढवून ते मिळविण्याकरिता जे कष्टप्रद तप करावे, त्या तपाला राजस तप म्हणतात. ॥ २४७ ॥

पहुरणें जें दुहिलें। तैं तें गुरूं न दुभेचि व्यालें। का उभें शेत चारिलें। पिकावया नुरे ॥ २४८ ॥
तैसें फोकारितां तप। कीजे जें साक्षेप। तें फळीं तंव सोप। निःशेष जाय ॥ २४९ ॥
ऐसें निर्फळ देखोनि करितां। माझारीं सांडीं पंडुसुता। म्हणौनि नाहीं स्थिरता। तपा तया ॥ २५० ॥
येऱ्हवीं तरी आकाश मांडी। जो गर्जोनि ब्रह्मांड फोडी। तो अकाळमेघ काय घडी। राहात आहे ॥ २५१ ॥
तैसें राजस तप जें होय। तें फळीं कीर वांझ जाये। परी आचरणींही नोहे। निर्वाहतें गा ॥ २५२ ॥
आतां तेंचि तप पुढती। तामसाचिये रीती। पैं परत्रा आणि कीर्ती। मुकोनि कीजे ॥ २५३ ॥

अर्थ—ज्याप्रमाणे पहुरणी नावाच्या किड्याने झालेल्या ओटीच्या रोगात दूध काढून घेतले असता गाय किंवा म्हैस व्याली तरी दूध देत नाही किंवा चांगले उगवलेले शेत चारले गेले असता हाती पीक येण्यास काही उरत नाही, ॥ २४८ ॥ त्याप्रमाणे हट्टाने केले जाते व ज्याचा लोकात बडेजाव माजविला जातो ते तप अगदी निष्फळ होते. ॥ २४९ ॥ असे हे तप निष्फळ होते हे जाणून मध्येच ते टाकून दिले जाते, म्हणून या तपाला, अर्जुना! स्थिरता

नसते. ॥ २५० ॥ नाही तरी, जो अकाळ मेघ आकाशात भरून गर्जनेने ब्रह्मांड भेदरून सोडतो, तो घटकाभर तरी राहतो काय ? ॥ २५१ ॥ त्याप्रमाणे राजस तप जे आहे, ते फळाच्या दृष्टीने खरोखर वांझ होते व त्याचे आचरणही टिकणारे नसते. ॥ २५२ ॥ आता तेच तप तमोगुणी पुरुषाकडून परलोकप्राप्तीची व कीर्तीची पर्वा न करता याप्रकारे केले जाते. ॥ २५३ ॥

मूढग्राहेणात्मनो यत्पीडया क्रियते तपः । परस्योत्सादनार्थं वा तत्तामसमुदाहृतम्॥ १९ ॥

अर्थ—देह म्हणजेच आत्मा अशा दृढ अविवेकी अंत:करणाने आपल्या देहाला अत्यंत पीडा देऊन किंवा दुसऱ्याचा नाश करण्याकरिता जे तप केले जाते, त्याला तामस तप म्हटले आहे. ॥ १९ ॥

केवळ मूर्खपणाचा वारा। जीवीं घेऊनि धनुर्धरा। नाम ठेविजे शरीरा। वैरियाचें॥ २५४॥
पंचाग्नीची दडगी। खोलवीजती शरीरालागीं। कां इंधन कीजे हें आगी। आंतु लावी॥ २५५॥
माथां जाळिजती गुगुळ। पाठीं घालिजती गळ। आंग जाळिती इंगळ। जळतभीतां॥ २५६॥
दवडोनि श्वासोच्छ्वास। कीजती वायांचि उपवास। कां घेपती धूमाचे घांस। अधोमुखें॥ २५७॥
हिमोदकें आकंठें। खडकें सेविजती तटें। जितां मांसाचे चिमुटे। तोडिती जेथ॥ २५८॥
ऐसी नानापरी हे काया। घाय सूतां पैं धनंजया। तप कीजे नाशावया। पुढिलांतें॥ २५९॥

अर्थ—अर्जुना! केवळ अविचारी अंत:करणाने देहाला शत्रू समजून त्याला अत्यंत पीडा देत, देह तापविण्याकरिता पंचाग्नीची ज्वाळा लावतात किंवा शरीराला अग्नीत लावण्याचे इंधनच समजतात. ॥ २५४-२५५ ॥ माथ्यावर गुग्गुळ जाळतात, पाठीला गळ घालतात, जळत असता ज्याला लोक भितात, अशा प्रखर निखाऱ्याने अंग जाळतात. ॥ २५६ ॥ श्वासोच्छ्वास घालवून व्यर्थ उपवास करतात किंवा खाली डोके वर पाय असे अधोमुख होऊन पंचाग्निसाधन करीत धूमाचे घास घेतात. ॥ २५७ ॥ ज्या तपात अत्यंत थंडीच्या दिवसात आकंठ पाण्यात बुडून किंवा नदीच्या तीरावर किंवा खडकावर राहतात. जिवंतपणी आपल्या अंगाच्या मांसाचे लचके तोडतात. ॥ २५८ ॥ अर्जुना! याप्रमाणे नाना प्रकारे या शरीरावर घाव घालून किंवा दुसऱ्याचा नाश करण्याकरिता जे तप केले जाते, ॥ २५९ ॥

आंगभारें सुटला धोंडा। आपण फुटोनि होय खंडखंडा। कां आड जालियातें रगडा। करी जैसा॥ २६०॥
तेविं आपलिया आटणिया। सुखें असतया प्राणिया। जियावया शिराणिया। कीजती गा॥ २६१॥
किंबहुना हे वोखटी। घेऊनि क्लेशाची हातवटी। तप निफजे तें किरीटी। तामस होय॥ २६२॥
एवं सत्वादिकाच्या आंगीं। पडिलें तप तिहीं भागीं। जालें तेंही तुज चांगीं। दाविलें व्यक्ती॥ २६३॥
आतां बोलतां प्रसंगा। आलें म्हणौनि पैं गा। करूं रूप दानलिंगा। त्रिविधा तया॥ २६४॥
येथ गुणाचेनि बळें। दानही त्रिविध असे जालें। तेंचि आइक पहिलें। सात्विक ऐसें॥ २६५॥

अर्थ—उंचावरून अंगभाराने घसरलेल्या दगडाचे ज्याप्रमाणे तुकडे तुकडे होतात व त्याच्या आड येणाऱ्या वस्तूंचाही तो चुराडा करतो, ॥ २६० ॥ त्याप्रमाणे शरीराला अत्यंत दु:ख देऊन सुखी असलेल्या प्राण्यांचा नाश करण्याची आपली इच्छा पुरी करून घेतात. ॥ २६१ ॥ फार काय सांगावे! अर्जुना! अशी ही आपल्याला दु:ख देण्याची दुष्ट पद्धत स्वीकारून जे तप निष्पन्न होते, त्याला तामस तप म्हणतात. ॥ २६२ ॥ याप्रमाणे सत्त्व, रज, तम या तीन गुणांमुळे त्रिविध झालेल्या तपाचे उत्तम रितीने वर्णन करून सांगितले. ॥ २६३ ॥ आता बोलताना प्रसंगाने आले, म्हणून दान जे तीन प्रकारचे आहे, त्यांच्या चिन्हाचे स्वरूप वर्णन करतो. ॥ २६४ ॥ येथे गुणांच्या योगाने दानही तीन प्रकारचे झाले आहे. प्रथम जे सात्विक दान, ते सांगतो, ऐक. ॥ २६५ ॥

दातव्यमिति यद्दानं दीयतेऽनुपकारिणे । देशे काले च पात्रे च तद्दानं सात्त्विकं स्मृतम्॥ २० ॥

अर्थ—कुरुक्षेत्रादी पुण्यक्षेत्रात, संक्रात्यादी पुण्यकाली व उपकार फेडण्यास असमर्थ अशा वेदपारंगत ब्राह्मणास केवळ द्यायचे म्हणून जे दान दिले जाते, ते सात्विक दान होय. ॥ २० ॥

तरी स्वधर्माआंतौतें। जें जें मिळेल आपणयातें। तें तें दीजे बहुतें। सन्मानयोगें॥ २६६॥
जालया सुबीजप्रसंग। पडे क्षेत्रवाफेचा पांग। तैसाचि दानाचा हा लाग। देखतसें॥ २६७॥
अनर्घ्य रत्न हाता चडे। तैं भांगाराची वोढी पडे। दोनीं जालीं तरी न जोडे। लेतें आंग॥ २६८॥
परि सण सुहृद संपत्ती। हे तिन्ही येकीं मिळती। जैं भाग्य धरी उन्नती। आपुल्याविषीं॥ २६९॥
तैसें निफजवावया दान। जैं सत्व सुये संवाहन। तैं देश काळ भाजन। द्रव्यही मिळे॥ २७०॥
तरि आधीं तंव प्रयत्नेंसीं। होआवें कुरुक्षेत्र कां काशी। ना तरि तुके जो इंहींसीं। तो देशही हो॥ २७१॥
तेथ रविचंद्रराहुमेळ। होतां पाहे पुण्यकाळ। कां तयासारिखा निर्मळ। आनही जाला॥ २७२॥
तैशा काळीं तिये देशीं। होआवी पात्रसंपत्ती ऐसी। मूर्ति आहे धरिली जैसी। शुचित्वेंचि कां॥ २७३॥
आचाराचें मूळपीठ। वेदांची उतारपेंठ। तैसें द्विजरत्न चोखट। पावोनियां॥ २७४॥
मग तयाचे ठायीं वित्ता। निवर्तवावी स्वसत्ता। परि प्रियापुढें कांता। रिगे जैसेनि॥ २७५॥

अर्थ—स्वधर्माने वागत असताना जे जे आपल्याला मिळेल, ते ते अत्यंत सन्मान करून द्यावे. ॥ २६६ ॥ ज्याप्रमाणे प्रसंगाने उत्तम बीज सापडले तरी उत्तम वाही केलेल्या जमिनीच्या वाफ्याची उणीव असते, तशीच या सात्विक दानाची स्थिती दिसून येते. ॥ २६७ ॥ एखादे वेळी बहुमोल रत्न हाती आले तरी त्याला कोंदण करण्याकरिता सोन्याची टंचाई भासते व रत्न आणि सोने दोन्ही प्राप्त झाली तरी ज्या शरीरावर ते लेणे शोभून दिसेल असे सुंदर शरीर सापडत नाही. ॥ २६८ ॥ आपल्या भाग्याचा उत्कर्ष झाला असताच दीपावळीसारखे सण, इष्टमित्र व द्रव्यसंपत्ती या तिहींचा एके ठिकाणी मेळ होतो, ॥ २६९ ॥ त्याप्रमाणे उत्कृष्ट प्रकारचे दान घडवून आणण्याकरिता जेव्हा सत्वगुण साह्यभूत होतो, तेव्हा योग्य देश, काळ, पात्र ब्राह्मण व द्रव्य या सर्वांचा मेळ घडून येतो, ॥ २७० ॥ म्हणून प्रथम कुरुक्षेत्र किंवा काशी, त्याच्या बरोबरीचा दुसरा असा देश प्रयत्नाने मिळवावा. ॥ २७१ ॥ मग तेथे राहूचा चंद्रसूर्याशी मेळ म्हणजे सूर्यचंद्रादी ग्रहणासारखा किंवा त्याच्या बरोबरीचा दुसरा शुद्ध पुण्यकाल प्राप्त व्हावा, ॥ २७२ ॥ तसेच त्या पुण्य देशात त्या पुण्यकाळी दानाला सत्पात्र जणू काय शुचित्वाची मूर्तीच घडविली, असा ब्राह्मण असावा. ॥ २७३ ॥ जो धर्माचरणाचे मुख्य पीठ व सर्व वेदांची उतरण्याची जागा आहे असे म्हणता येईल, असा रत्नभूत ब्राह्मण प्राप्त करून घेऊन ॥ २७४ ॥ मग ज्याप्रमाणे पतिव्रता स्त्री आपली यत्किंचितही स्वतंत्र सत्ता न वागविता दासी समजून आपल्या प्रिय पतीपुढे जाते, त्याप्रमाणे आपली काही एक सत्ता न ठेवता त्या ब्राह्मणाला दान द्यावे. ॥ २७५ ॥

कां जयाचें ठेविलें तया। देऊनि होय जे उतराइया। ना ना हडपें विडा राया। दिधला जैसा॥ २७६॥
तैसेनि निष्कामें जीवें। भूम्यादिक अर्पावें। किंबहुना हांवे। नेदावें उठों॥ २७७॥
आणि दान जया द्यावें। तयातें ऐसेया पाहावें। जया घेतलें नुमचवे। कायसेनिही॥ २७८॥
साद घातलिया आकाशा। नेदी प्रतिशब्द जैसा। कां पाहिला आरसा। येरीकडे॥ २७९॥
ना तरी उदकाचिये भूमिके। आफळिलेनि कंदुकें। उधळौनि कवतिकें। न येइजे हाता॥ २८०॥
ना ना वसो घातला चारु। माथां तुरंबिला बुरु। न करी प्रत्युपकारु। जियापरी॥ २८१॥
तैसें दिधलें दातयाचें। जो कोणेही आंगें नुमचे। अर्पिलया साम्य तयाचें। कीजे पैं गा॥ २८२॥
ऐसिया जें सामग्रिया। दान निफजे वीरराया। तें सात्विक दानवर्या। सर्वांही जाण॥ २८३॥

अर्थ—किंवा जसे ज्याचे ठेवलेले धन त्याला परत देऊन उतराई व्हावे किंवा ज्याप्रमाणे विडा देणारा राजाचा सेवक राजाचाच विडा राजाला देतो, ॥ २७६ ॥ त्याप्रमाणे कशाचीही यत्किंचित हाव न धरता निष्काम चित्ताने भूम्यादिक पदार्थाचे दान करावे ॥ २७७ ॥ आणि ज्याला दान द्यावयाचे तो असा पाहावा की ज्याच्याने कोणत्याही रितीने दानाची फेड करवणार नाही. ॥ २७८ ॥ ज्याप्रमाणे आकाशाला हाक मारली असता ते प्रत्युत्तर देत नाही किंवा आरसा पाठीमागून पाहिला असता त्यात प्रतिबिंब पडत नाही ॥ २७९ ॥ अथवा पाण्याच्या पृष्ठभागावर चेंडू आपटला असता तो उसळत नाही म्हणून हाती घेता येत नाही ॥ २८० ॥ किंवा ज्याप्रमाणे पोळाला चारा घातला

असता अथवा कृतघ्नाला डोक्यावर घेतले तरी तो प्रत्युपकार करीत नाही, ॥ २८१ ॥ त्याप्रमाणे जो पुरुष दात्याने दिलेल्या दानाची कोणत्याही अंगाने परतफेड करू शकणार नाही, अशा पुरुषाला दान दिल्यानंतर त्या दानाचे त्याच्याशी साम्य करावे–म्हणजे मी काही दान केले अशी जाणीव उरू न देता त्याचेच त्याला दिले, असा भाव धरावा. ॥ २८२ ॥ अशा सामग्रीने जे दान केले जाते, हे वीरामध्ये श्रेष्ठ असलेल्या अर्जुना ! ते सर्व दानांपेक्षा श्रेष्ठ असे सात्विक दान होय, असे जाण. ॥ २८३ ॥

यत्तु प्रत्युपकारार्थं फलमुद्दिश्य वा पुनः । दीयते च परिक्लिष्टं तद्दानं राजसं स्मृतम्॥ २१ ॥

अर्थ—जे दान आपल्यावर परत उपकार व्हावा, या इच्छेने अथवा फळाच्या इच्छेने व कष्टी अंत:करणाने दिले जाते ते राजस दान होय, असे सांगितले आहे. ॥ २१ ॥

आणि तोचि देश काळ। घडे तैसाचि पात्रमेळ। दानभागही निर्मळ। न्यायगत॥ २८४॥
परि मनीं धरूनि दुभतें। चारिजे जेविं गाईतें। कां पेंव करूनि आइतें। पेरूं जायिजे॥ २८५॥
ना ना दिठी घालूनि आहेरा। आवंतूं जाइजे सोयिरा। कां वाण धाडिजे घरा। वोवसीयाचे॥ २८६॥
पैं कळांतर गांठीं बांधिजे। मग पुढिलाचें काज कीजे। पूजा घेऊनि रस दीजे। पीडितांसी॥ २८७॥
तैसें जया जें दान देणें। तें तेणेंचि गा जीवनें। पुढती भजावा भावें येणें। दीजे जें कां॥ २८८॥
अथवा कोणी वाटे जातां। घेतलें उमचों न शकता। मिळे जैं पंडुसुता। द्विजोत्तम॥ २८९॥
तरी कवड्या एकासाठीं। अशेषां गोत्रांचींच किरीटी। सर्व प्रायश्चित्तें सुये मुठी। तयाचिये॥ २९०॥
तेवींचि पारलौकिकें। फळें वांच्छिजती अनेकें। आणि दीजे तरी भुके। येकाही नोहे॥ २९१॥
तेंही ब्राह्मण नेवों सरे। कीं हाणिचेनि शिणें झांसुरे। सर्वस्व जैसें चोरें। नागऊनि नेलें॥ २९२॥
काय बहु सांगों सुमती। जें दीजे या मनोवृत्ती। तें दान गा त्रिजगतीं। राजस पैं॥ २९३॥

अर्थ—आणि सात्विक दानाप्रमाणे, देश, काल, पात्र यांचा मेळ मिळून दानाचे द्रव्यही स्वधर्मानेच मिळविलेले शुद्ध असले॥ २८४ ॥ तरी ज्याप्रमाणे दुधाची आशा करून गायीला चारा घालावा किंवा पेवात धान्य साठविले गेले पाहिजे या इच्छेने पेव खोदून तयार करून मग शेतात धान्य पेरायला जावे॥ २८५ ॥ किंवा अहेराकडे दृष्टी ठेवून सोयऱ्यांना आमंत्रण द्यावे किंवा वायन परत यावे या इच्छेने व्रतस्थ असलेल्या स्त्रियेच्या घरीच वायन पाठवावे, ॥ २८६ ॥ आधी व्याज कनवटीस लावून, मग पैसा मागायला आलेल्या पुरुषाचे काम भागवावयाचे, दु:खी रोगी असला तरी आधी आपला सन्मान करून घेऊन–म्हणजे पैसे घेऊन मग त्याला औषधी द्यावयाची, ॥ २८७ ॥ त्याप्रमाणे ज्याला जे दान देणे ते त्याच्या जीवनाचे एक साधनच व्हावे. आपण दान दिल्यानंतर दान घेणाऱ्यांनी आपल्यावर पुन: उपकार केला पाहिजे, अशी इच्छा ठेवूनच जे दान दिले जाते, ॥ २८८ ॥ अथवा, अर्जुना ! जो घेतलेल्या दानाची परतफेड करण्यास असमर्थ आहे, असा ब्राह्मण वाटेने जाताना आढळल्यास॥ २८९ ॥ अर्जुना ! एक कवडी दान देऊन आपल्या व आपल्या संपूर्ण गोत्रजांच्या पापांच्या प्रायश्चित्ताचे पाणी त्याच्या हातावर सोडतो, ॥ २९० ॥ त्याप्रमाणेच जे थोडकेसे दान देतो, तेवढ्यानेच मेल्यानंतर अनेक प्रकारची फळे प्राप्त व्हावी, अशी आशा करतो आणि दिलेले दान, एकदा तरी भूक शमेल, इतक्यापुरतेही नसते, ॥ २९१ ॥ ते अल्पसे दान ब्राह्मण घेऊन जाऊ लागला असता जणू काय चोरांनी घर लुटून नागविले असा कष्टी होऊन तो झुरतो. ॥ २९२ ॥ हे शुद्धबुद्धी अर्जुना ! फार काय सांगू ! अशा मनोवृत्तीने जे दान दिले जाते, ते दान त्रैलोक्यात राजस म्हटले जाते. ॥ २९३ ॥

अदेशकाले यद्दानमपात्रेभ्यश्च दीयते । असत्कृतमवज्ञातं तत्तामसमुदाहृतम्॥ २२ ॥

अर्थ—अपवित्र देशकालाच्या ठिकाणी, अपवित्र पात्राला, काही पूजादी सत्कार न करता उलट त्याची अवहेलना करून जे दान दिले जाते, ते दान तामस म्हटले आहे. ॥ २२ ॥

मग म्लेच्छाचे वसौटे। दांगाणे हण कैकटे। कां शिबिरें चोहटे। नगरींचे ते॥ २९४॥
तेही तेही ठाईं मिळणी। समय सांजवेळ कां रजनी। तेव्हां उदार होणें धनीं। चोरियेच्या ते॥ २९५॥
पात्रें भाट नागारी। सामान्य स्त्रिया कां जुवारी। जियें मूर्तिमंतें भुररीं। भुले तयां॥ २९६॥
नृत्याची पुरवणी। ते पुढां डोळेभारणी। गीत भाटींव तो श्रवणीं। कर्णजप॥ २९७॥
तयाहीवरी अळुमाळ। जैं घे फुलागंधाचा गुगुळ। तंव भ्रमाचा तो वेताळ। अवतरे तैसा॥ २९८॥
तेथ विभांडूनियां जग। आणिले पदार्थ अनेग। तेणे घालूं लागे मातंग। गवादीसी॥ २९९॥
एवं ऐसेनि जें देणें। तें तामसदान मी म्हणें। आणि घडे दैवगुणें। आणिकही ऐक॥ ३००॥

अर्थ—मग अपवित्र अशा म्लेंछांनी वसविलेली स्थाने, अरण्ये, धर्मकृत्यास अयोग्य ठरलेले देश किंवा शहरातील छावण्या व चौरस्ते॥ २९४॥ अशा ठिकाणी, संध्यासमयी किंवा रात्री, चोरी अपकार इत्यादी द्वारा मिळविलेल्या धनाचे, भाट, गारुडी, वेश्या, जुगारी अशा भ्रमात पाडणाऱ्या मूर्तिमंत भुलीचे ठिकाणी भुलून जाऊन, दान देण्यास उदार होणे. त्यातही त्यांच्या रूपाची व नाचण्याची भर म्हणजे डोळ्याला पाडणारी भुरळ असून त्यांचे गायन व स्तुती हे तर कानात गुणगुणणारे जपच होत. ॥ २९५-२९७॥ त्यातही फूल, गंध, गुग्गुळाचा धूप यांचा संयोग झाला असता भ्रमाचा तो वेताळ जसा प्रगट होतो, ॥ २९८॥ मग जगाला नागवून आणलेले जे अनेक पदार्थ त्यांच्या योगाने माहार, मांग यांच्याकरिता अन्नछत्र घालतो. ॥ २९९॥ अशा रितीने द्रव्याचा विनियोग करणे, याला मी तामस दान म्हणतो. किंवा दैवयोगाने असेही घडून येते, ते सांगतो, ऐक. ॥ ३००॥

विपायें घुणाक्षर पडे। टाळिये काउळा सांपडे। तैसें तामसां पर्व जोडे। पुण्यदेशीं॥ ३०१॥
तेथ देखोनि तो आथिला। योग्य मागोंही आला। तोही दर्पा चढला। भांबावे जरी॥ ३०२॥
तरी श्रद्धा न धरी जीवीं। तया माथाही न खालवी। स्वयें न करी ना करवी। अर्घ्यादिक॥ ३०३॥
आलिया न घाली बैसों। तेथ गंधाक्षतांचा काय अतिसो। हा अप्रसंग कीर असो। तामसीं नरीं॥ ३०४॥
पैं बोळविजे रिणाइत। तैसा झकवी तयाचा हात। तूं करणें याचा बहुत। प्रयोग तेथ॥ ३०५॥
आणि जया जें दे किरीटी। तयातें उमाणी तयासाठीं। मग कुबोलें कां लोटी। अवज्ञेच्या॥ ३०६॥
हें बहु असो यापरी। मोल वेंचणें जें अवधारीं। तया नांव चराचरीं। तामस दान॥ ३०७॥

अर्थ—ज्याप्रमाणे किड्याचे लाकडात कोरणे अकस्मात अक्षरासारखे होते किंवा दोन हातांनी टाळी वाजविली असता अकस्मात त्यात कावळा सापडतो, त्याप्रमाणे तामस दान करणाऱ्यांना दानप्रसंगी अकस्मात पुण्यदेशकालाचाही सुयोग घडून येतो. ॥ ३०१॥ तेव्हा दानदाता संपन्न आहे, असे पाहून धर्माचरणसंपन्न व दानाची फेड करण्यास असमर्थ असा योग्य दानपात्र ब्राह्मण दान मागण्यास आला असता तो तामसदानकर्ता गर्वाने फुगून जाऊन जरी गडबडून जातो, ॥ ३०२॥ तरी अंत:करणात श्रद्धा धरीत नाही; त्याला नमस्कार करीत नाही व स्वत: किंवा दुसऱ्या कोणाकडून तरी अर्घ्यदानादिकांनी त्याची पूजा करीत नाही. ॥ ३०३॥ असा ब्राह्मण आलेला पाहून जेथे त्याला बसायला आसन घातले जात नाही, तेथे गंधाक्षतेचा विशेष सत्कार कोठून असणार? खरोखर तमोगुणी पुरुषाची अशी अयोग्य वागणूक असते. ॥ ३०४॥ ज्याप्रमाणे कर्जदार असलेला मनुष्य कर्ज मागायला आला असता जसे त्याला झिटकारावे, त्याप्रमाणे तमोगुणी पुरुषही दान घेणाऱ्याला झिटकारतो. त्याच्याशी बोलण्यात एकवचनी अपमानकारक 'तू' या शब्दाचा फार प्रयोग करतो॥ ३०५॥ आणि अर्जुना! तो ज्याला जे देतो तीच त्याची किंमत आहे असे म्हणतो व नंतर अपमानकारक असे वाईट शब्द बोलून त्याला घराबाहेर घालवितो. ॥ ३०६॥ हे पुष्कळ बोलणे आता असो. याप्रमाणे जे द्रव्य खर्च केले जाते, त्याला जगतात तामस दान म्हणतात, हे लक्षात ठेव. ॥ ३०७॥

ऐसें आपुलाल्या चिन्हीं। अळंकृतें तीन्ही। दानें दाविलीं अवधानीं। राजतनया॥ ३०८॥
तेथ मी जाणत असें। विपायें तूं गा ऐसें। कल्पिसील मानसें। विचक्षणा॥ ३०९॥
जे भवबंधमोचक। येकलें कर्म सात्विक। तरी कां वेखासीं सदोख। येर बोलावीं॥ ३१०॥
परि नोसंतितां विवसी। भेटी नाहीं निधीसी। कां धूं न साहतां जैसी। वाती न लगे॥ ३११॥

तैसें शुद्धसत्वाआड। आहे रजतमाचें कवाड। तें भेदणेयातें कीड। म्हणावें कां॥ ३१२॥
आम्हीं श्रद्धादि दानांत। जें समस्तही क्रियाजात। सांगीतलें कां व्याप्त। तिहीं गुणीं॥ ३१३॥
तेथ भरंवसेनि तीन्ही। न सांगोंचि ऐसें मानीं। परि सत्व दावावया दोन्ही। बोलिलों येरें॥ ३१४॥
जें दोहींमाजि तिजें असे। तें दोहीं सांडितांचि दिसे। अहोरात्रत्यागें जैसें। संध्यारूप॥ ३१५॥
तैसें रजतमविनाशें। तिजें जें उत्तम दिसे। तें सत्व हें आपैसें। फावासि ये॥ ३१६॥
एवं दावावया सत्व तुज। निरूपिलें तम रज। तें सांडूनि सत्वें काज। साधीं आपलें॥ ३१७॥

अर्थ—याप्रमाणे, हे राजपुत्रा अर्जुना! त्यांच्या त्यांच्या अलंकृत असलेल्या लक्षणांनी युक्त अशी तीन प्रकारची दाने त्यांच्या निरनिराळ्या नावांसह तुला सांगितली. ॥ ३०८ ॥ हे शहाण्या अर्जुना! येथे मी असे जाणतो की कदाचित तू आपल्या मनात अशी कल्पना करशील ॥ ३०९ ॥ की, जर एकटे सात्विक कर्म संसारबंधनाचा नाश करणारे आहे तर, मग त्याव्यतिरिक्त दोषयुक्त म्हणून वाईट अशी इतर कर्मे कां सांगितली जावी? ॥ ३१० ॥ ज्याप्रमाणे पुरून ठेवलेल्या द्रव्यावर बसविलेले पिशाच दूर केल्यावाचून त्या द्रव्याला हात लावता येत नाही. किंवा धूर सहन केल्यावाचून वात उजळली जाऊ शकत नाही, ॥ ३११ ॥ त्याप्रमाणे शुद्ध सत्वाच्या आड त्याला प्रतिबंधक होणारे जे रजोतमोगुणाचे कवाड आहे, त्याची मोडतोड करण्याला वाईट का म्हणावे? ॥ ३१२ ॥ आम्ही ज्या ज्या सत्व-रज-तम या गुणांनी व्यापून असलेल्या श्रद्धेपासून दानापर्यंतच्या सर्व क्रिया सांगितल्या. ॥ ३१३ ॥ त्या सर्व क्रिया, खरोखर करण्याकरिता म्हणून सांगितल्या नाहीत, हे पक्के समज. पण त्यात सात्विक क्रियांचे स्वरूप स्पष्ट करण्याकरिताच बाकीच्या दोन राजस, तामस क्रियाही सांगितल्या आहेत. ॥ ३१४ ॥ ज्याप्रमाणे दिवस व रात्र यांचा त्याग केला असता संध्याकाळ सापडते, त्याप्रमाणे रजोगुण-तमोगुण यांच्यामध्ये असलेला सत्वगुण, त्या दोघांचा त्याग केल्याबरोबर अनायासे स्पष्ट होतो. ॥ ३१५ ॥ तसेच रज-तमाचा नाश झाला असता उरलेला जो तिसरा गुण चांगला आहे, असे दिसते, तो सत्वगुण होय, हे स्पष्ट कळून येते. ॥ ३१६ ॥ याप्रमाणे सत्वगुण स्पष्ट करून दाखविण्याकरिताच रज-तमोगुणांचे निरूपण केले आहे; म्हणून, अर्जुना! रज-तमगुण नाहीसे करून सत्वगुणाच्या योगाने आपले मोक्षरूपी कार्य साधून घे. ॥ ३१७ ॥

सत्वेंचि येणें चोखाळें। करीं यज्ञादिकें सकळें। पावसी तैं करतळें। आपलें निज॥ ३१८॥
सूर्यें दाविलें सांतें। काय एक न दिसे तेथें। तेविं सत्वें केलें फळातें। काय नेदी॥ ३१९॥
हे कीर आवडतांविखीं। शक्ति सत्वीं आथि निकी। परि मोक्षेंसीं एकी। मिसळणें जें॥ ३२०॥
तें एक आनचि आहे। तयाचा सावावो जैं लाहे। तैं मोक्षाचाही होये। गांवीं सरतें॥ ३२१॥
पैं भांगार जन्हीं पंधरें। तन्ही राजावळीचीं अक्षरें। लाहे तैंचि सरे। जियापरी॥ ३२२॥
स्वच्छें शीतळें सुगंधें। जळें होतीं सुखप्रदें। परि पवित्रत्व संबंधें। तीर्थाचेनि॥ ३२३॥
नयी हो कां भलतैसी थोरी। परि गंगा जैं अंगिकारी। तैंचि तिये सागरीं। प्रवेश गा॥ ३२४॥

अर्थ—या शुद्धसत्वाच्या योगाने तू आपली संपूर्ण यज्ञादिक कर्मे कर, म्हणजे तुझे मुळचे स्वरूप तुझ्या तळहातावर प्राप्त होईल. ॥ ३१८ ॥ सूर्याने आपल्या प्रकाशाने दाखविले असता कोणती एक वस्तू दिसणार नाही? त्याप्रमाणे सत्वगुणयुक्त होऊन कर्म केले असता ते काय फळ देणार नाही? ॥ ३१९ ॥ इच्छित प्राप्त करून घेण्याकरिता सात्विक कर्माचे ठिकाणी निश्चित शक्ती आहे; पण ज्या एका मोक्षामध्ये परमात्म्याशी ऐक्य पावणे जे आहे, ॥ ३२० ॥ तो प्रकार एक निराळाच आहे. त्याचे जेव्हा साह्य मिळते, तेव्हा जीव मोक्षाच्या गावीही प्राप्त होतो. ॥ ३२१ ॥ ज्याप्रमाणे पंधरा रुपये किंमतीच्या सोन्याच्या ठिकाणी राजाच्या नावाचा शिक्का बसतो, तेव्हाच त्याला किंमत येते ॥ ३२२ ॥ किंवा स्वच्छ, शीतळ व सुगंध असे पाणी सुखप्रद होते, परंतु त्याच्या ठिकाणी पवित्रत्व मात्र तीर्थाचा संबंध आला असताच येत असते. ॥ ३२३ ॥ नदी कितीही मोठी असली तरी गंगेने तिचा अंगीकार केला असताच तिचा समुद्रात प्रवेश होईल. ॥ ३२४ ॥

गूढार्थदीपिका—माउलीच्या या म्हणण्याचे स्पष्टीकरण ज्ञानेश्वरी गूढार्थदीपिका अध्याय १३–ओवी ३७२ मध्ये केले आहे.

तैसें सात्विक कर्मा किरीटी। येतां मोक्षाचिये भेटी। न पडे आडकाठी। तें वेगळें आहे॥ ३२५॥
हा बोल आयकतखेवीं। अर्जुना आधि न माये जीवीं। म्हणे देवें कृपा करावी। सांगावें तें॥ ३२६॥
तेथ कृपाळुचक्रवर्ती। म्हणे आइक तयाची व्यक्ती। जेणें सात्विक तें मुक्ति–। रत्न देखे॥ ३२७॥

अर्थ—त्याप्रमाणे, अर्जुना! सात्विक कर्माच्या योगाने प्रतिबंध न होता मोक्षप्राप्ती होईल, तो प्रकार वेगळा आहे. ॥ ३२५ ॥ असे देवाचे बोलणे ऐकताच अर्जुनाच्या अंत:करणात आतुरता मावेनाशी झाली व देवाने कृपा करून मला तो प्रकार सांगावा, असे तो म्हणू लागला. ॥ ३२६ ॥ तेव्हा कृपाळू, सर्व ब्रह्मांडांचा राजा भगवान श्रीकृष्ण म्हणाले, अर्जुना! ज्याच्या योगाने सात्विक कर्म मुक्तिरूप रत्न पाहू शकेल, तो प्रकार सांगतो, ऐक. ॥ ३२७ ॥

ॐतत्सदिति निर्देशो ब्रह्मणस्त्रिविध: स्मृत: । ब्राह्मणास्तेन वेदाश्च यज्ञाश्च विहिता: पुरा॥ २३ ॥

अर्थ—परब्रह्माचा ॐ, तत्, सत् असा तीन प्रकारचा नामनिर्देश केला आहे. या त्रिविध नामनिर्देशद्वाराच ब्राह्मण, वेद व यज्ञ हे तिघे पूर्वी निर्माण केले गेले. ॥ २३ ॥

तरि अनादि परब्रह्म। जें जगदादिविश्रामधाम। तयाचें एक नाम। त्रिधा पैं असे॥ ३२८॥

अर्थ—जगताच्या उत्पत्तीचे व विश्रांतीचे स्थान असे जे अनादी परब्रह्म, त्याचे एकच नाव तीन प्रकारचे आहे. ॥ ३२८ ॥

गूढार्थदीपिका—'अनादी' या शब्दाने परब्रह्म उत्पत्तिरहित स्वत:सिद्ध आहे, हे दाखविले आहे.

जगदादिविश्रामधाम—सच्चिदानंद, निरवयव, अविकारी अशा परब्रह्माचा भिन्न वस्तुत्वाने व जड-विनाशी अशा भिन्न धर्माने भासणाऱ्या जगताशी जो कारणत्वाने वेदान्तात भ्रान्त संबंध मानला गेला आहे, तो अज्ञानी जीवाच्या भ्रमाला धरूनच मानला गेला आहे व त्याच दृष्टीने परब्रह्माला येथे "जगदादिविश्रामधाम" हे विशेषण लावले आहे. वस्तुत: परब्रह्मापासून त्याहून विरुद्ध धर्माचे कार्यच उत्पन्न होणे शक्य नाही.

तें कीर अनाम अजाती। परि अविद्यावर्गाचिये राती–। माजि वोळखावया श्रुती। खूण केली॥ ३२९॥

अर्थ—ते परब्रह्म खरोखरच शब्दाच्या पलीकडे असल्यामुळे नामावाचून व त्याच्यासारखी दुसरी वस्तू नसल्यामुळे जातीवाचून आहे. परंतु त्या परब्रह्माच्या आधाराने जीवाला भासत असलेल्या अविद्या, अस्मिता, राग, द्वेष, अभिनिवेश या ब्रह्मपदाचा विसर पाडणाऱ्या गाढ अंधकारात न दिसणारे परब्रह्म जीवाला ओळखता यावे, म्हणून श्रुतीने परब्रह्माच्या ठिकाणी ही खूण केली आहे. ॥ ३२९ ॥

गूढार्थदीपिका—वेदान्तात कोठेही कशाचाही प्रथम आरंभ मानला नाही. सर्वत्र पूर्व पूर्व संस्कारानुसार उत्तरोत्तर कार्याभिव्यक्ती मानली आहे. येथे नामरूपरहित परमेश्वराला प्रथम केव्हा तरी नाम ठेवले गेले असे समजायचे नसून परमेश्वराचा व नामरूपाचा संबंध अनादी आहे, असेच समजले पाहिजे. फरक एवढाच की अज्ञानी जीवाला जेवढे काही त्याच्या भ्रांतीमुळे नामरूपात्मक जगत दिसते ते सर्व अनादी, पण आत्मज्ञानाने नाश पावणारे आहे आणि ज्ञानी भक्तांच्या अनुभवास येणारा परमेश्वर, त्याचे नामरूप व त्याची प्रेमवर्धक लीला, यांचा संबंध अनादी व अविनाशी आहे.

उपजलिया बाळकासी। नांव नाहीं तयापासीं। ठेविलेनि नांवेंसीं। ओ देत उठी॥ ३३०॥
कष्टले संसारशिणें। जे देवों येती गाऱ्हाणें। तयां ओ दे नांवें जेणें। तो संकेत हा॥ ३३१॥
ब्रह्माचा अबोला फिटावा। अद्वैतत्वें तो भेटावा। ऐसा मंत्र देखिला कणवा। वेदें बापें॥ ३३२॥
मग दाविलेनि जेणें एकें। ब्रह्म आळविलें कवतिकें। मागां असत ठाके। पुढां उभें॥ ३३३॥
परि निगमाचळशिखरीं। उपनिषदार्थनगरीं। आहाति जे ब्रह्माच्या येकाहारीं। तयांसीच कळे॥ ३३४॥
हेंही असो प्रजापती। शक्ती जे सृष्टि करिती। ते जया एका आवृत्ती। नामाचिये॥ ३३५॥

पैं सृष्टीचिया उपक्रमा-। पूर्वीं गा वीरोत्तमा। वेडा ऐसा ब्रह्मा। एकला होता॥ ३३६॥
मज ईश्वरातें नोळखे। ना सृष्टीही करूं शके। तो थोर केला एकें। नामें जेणें॥ ३३७॥

अर्थ—जन्मास आलेल्या बालकास प्रथम नाम नसते, पण ते, ठेवलेल्या नामाने हाक मारली असता, हे आपले नाव आहे, असे समजून ते 'ओ' देत असते. ॥ ३३० ॥ संसारात अहोरात्र शीण करता करता श्रमलेले जीव जेव्हा आपल्या दु:खाचे निवारण करण्याकरिता परमेश्वराचा धावा करतात, तेव्हा ज्या नावाने मला हाक मारली असता मी धावून येतो, असे भगवंताने आपल्या वेदवाणीने ठरविले किंवा संकेत केला, ते संकेतरूप नाव हेच होय. ॥ ३३१ ॥ परब्रह्म अखंड, अफुट, अविकारी असे एकमेव सद्रूप आहे, त्यात यत्किंचितही बिघाड न होता, त्याची अबोल स्थिती बोलकी होईल व तेच परब्रह्म जीवाशी अद्वैत एकरूप राहून सद्रूपाने जीवाला गोचर होईल असा हा मंत्र कृपाळू बाप वेदाने शोधून काढला आहे. ॥ ३३२ ॥ मग वेदाने दाखविलेल्या ज्या एका नाममंत्राने परब्रह्माला आळविले असता दृष्टिआड असलेले परब्रह्मच दृष्टिगोचर होते, ॥ ३३३ ॥ परंतु निगमरूपी पर्वताच्या शिखरावरील उपनिषदार्थरूप नगरात राहणाऱ्या परब्रह्माच्या पंक्तीला जे बसले–म्हणजे परब्रह्मस्वरूप झाले, त्यांनाच ते कळून येते. ॥ ३३४ ॥ हे असो. प्रजापतीच्या ठिकाणी सृष्टी निर्माण करण्याची जी शक्ती आहे ती त्या एका नामाच्या आवर्तनामुळेच आली आहे. ॥ ३३५ ॥ हे वीरश्रेष्ठा अर्जुना! सृष्टिउत्पत्तीपूर्वी सृष्टिउत्पत्तीचे काही एक ज्ञान नसलेला असा ब्रह्मदेव एकटाच होता. ॥ ३३६ ॥ तो मज ईश्वराला जाणत नव्हता व सृष्टीही करू शकत नव्हता, पण या एका नामाने त्याला (मला जाणणारा व सृष्टी निर्माण करणारा असा) थोर केले. ॥ ३३७ ॥

गूढार्थदीपिका—सूक्ष्म समष्टी लिंगशरीराची अभिमानी देवता जो हिरण्यगर्भ तोच समष्टी स्थूल ब्रह्मांडाची अभिमानी देवता होऊन स्थूल ब्रह्मांड निर्माण करतो अशी पौराणिक सृष्टिउत्पत्तीची प्रक्रिया माउलीला मान्य आहे. प्रलय झाला असता प्रकृतीत लीन झालेल्या ह्या देवता आधिकारिक असल्यामुळे उत्तर सृष्टीत पुन: उत्पन्न होऊन परमेश्वरकृपेने त्यांना पूर्वीच्या कल्पातील सृष्टिसर्जनसामर्थ्य प्राप्त होते, असे आचार्यांनी ब्रह्मसूत्र १-३-३० वरील भाष्यात म्हटले आहे. त्याच सिद्धान्ताचा माउलीने येथे उल्लेख केला आहे.

जयाचा अर्थ जीवीं ध्यातां। जें वर्णत्रयचि जपतां। विश्वसृजनयोग्यता। आली तया॥ ३३८॥
तेधवां रचिले ब्रह्मजन। तयां वेद दिधलें शासन। यज्ञाऐसें वर्तन। जीविके केलें॥ ३३९॥
पाठीं नेणों किती येर। स्त्रजिले लोक अपार। जाले ब्रह्मदत्त अग्रहार। तिन्हीं भुवनें॥ ३४०॥

अर्थ—ॐ, तत्, सत् ज्या तीन वर्णांच्या जपाने व ज्याच्या अर्थरूप परब्रह्माच्या ध्यानाने त्याच्या अंगी सृष्टी उत्पन्न करण्याची योग्यता आली, ॥ ३३८ ॥ तेव्हा ब्राह्मणप्रजा निर्माण केली व त्यांना वेदात सांगितल्याप्रमाणे वागण्याकरिता वेद दिले आणि यज्ञासारखे कर्म त्यांच्या उपजीविकेचे साधन म्हणून नेमून दिले. ॥ ३३९ ॥ मागाहून किती लोक निर्माण झाले याची गणतीच नाही व तीन लोक ब्रह्मदेवाने त्यांना इनाम करून दिले. ॥ ३४० ॥

गूढार्थदीपिका—"**जाले ब्रह्मदत्त अग्रहार। तिन्हीं भुवनें**" तिन्ही भुवनात यज्ञयागादिद्वारा उपजीविका करण्याचा अधिकार दिला.

ऐसें नाममंत्रें जेणें। धातया अढळचि करणें। तयाचें स्वरूप आइक म्हणे। श्रीकांत तो॥ ३४१॥

अर्थ—ज्या या मंत्राच्या योगाने ब्रह्मदेवाचे स्थान सर्वांपेक्षा अढळ केले, त्या मंत्राचे स्वरूप सांगतो, ऐक, असे लक्ष्मीचा पती भगवान श्रीकृष्ण म्हणाला. ॥ ३४१ ॥

तरि सर्व मंत्रांचा राजा। तो प्रणव आदिवर्ण बुझा। आणि तत्कार दुजा। तिजा सत्कार ॥ ३४२॥
एवं ओंतत्सदाकार। ब्रह्मनाम हें त्रिप्रकार। हें फुल तुरंबी सुंदर। उपनिषद तें॥ ३४३॥

अर्थ—सर्व मंत्रांत श्रेष्ठ असा जो प्रणव तो त्या मंत्राचा प्रथम वर्ण असून तत्कार हा दुसरा वर्ण आहे आणि तिसरा वर्ण सत्कार आहे, असे जाण. ॥ ३४२ ॥ अर्जुना! याप्रमाणे ॐ, तत्, सत् असे परब्रह्माचे तीन प्रकारचे नाम आहे. या उपनिषदरूप सुंदर फुलाचा तू वास घे. ॥ ३४३ ॥

गूढार्थदीपिका—उपनिषद तें– उपनिषदांत ब्रह्मप्राप्ती करून देणारी ब्रह्मविद्या सांगितली आहे. या ब्रह्मनामानेही ब्रह्मप्राप्तीच होत असल्यामुळे या ब्रह्मनामाला माउलीने येथे 'उपनिषद' म्हटले आहे.

येणेंसीं गा होऊनि एक। जैं कर्म चाले सात्विक। तें कैवल्यातें पाइक। घरींचें करी॥ ३४४॥

अर्थ—या तीन वर्णात्मक मंत्राशी एकरूप होऊन सात्विक कर्म होऊ लागले असता ते मोक्षाला घरचा चाकर करते–म्हणजे मोक्ष चाकराप्रमाणे घरी राबतो. ॥ ३४४ ॥

परि कापुराचें थळींव। आणुनि देईल दैव। लेवों जाणणेंचि अडव। तेथ असे बापा॥ ३४५॥
तैसें आदरिजेल सत्कर्म। उच्चरिजेल ब्रह्मनाम। परि नेणिजेल जरी वर्म। विनियोगाचें॥ ३४६॥
तरि महंतांचिया कोडी। घरा आलीयाही वोढी। मानूं नेणतां परवडी। मुदल तुटे॥ ३४७॥
कां ल्यावया चोखट। टीक भांगार एकवट। घालूनि बांधिली मोट। गळां जेवीं॥ ३४८॥
तैसें तोंडीं ब्रह्मनाम। हातीं तें सात्विक कर्म। विनियोगेंवीण काम। विफळ होय॥ ३४९॥
अगा अन्न आणि भूक। पासीं असे परी देख। जेऊं नेणतां बाळक। लंघनचि कीं॥ ३५०॥
कां स्नेह सूत्र वैश्वानरा। जालियाही संसारा। हातवटी नेणतां वीरा। प्रकाश नोहे॥ ३५१॥
तैसें वेळे कृत्य पावे। तेथिंचा मंत्रही आठवे। परि व्यर्थ तें आघवें। विनियोगेंवीण॥ ३५२॥
म्हणौनि वर्णत्रयात्मक। जें हें परब्रह्मनाम एक। विनियोग तूं आइक। याचा आतां॥ ३५३॥

अर्थ—ज्याप्रमाणे दैव, कापराचे अलंकार प्राप्त करून देईल, पण, बा अर्जुना! ते कसे घालावे, हे ठाऊक असण्याचीच तेथे अडचण असते. ॥ ३४५ ॥ त्याप्रमाणे सात्विक कर्माचे आचरण होईल व या ब्रह्मनामाचाही उच्चार होईल, पण विनियोगाचे वर्म जर माहीत नसेल, ॥ ३४६ ॥ तर ज्याप्रमाणे साधुसंतांच्या पंक्ती (समुदाय) आपला लळा वागवून घरी आल्या असता त्यांचा सत्कार करण्याची रीत माहीत नसली तर आपल्या साठविलेल्या पुण्याचा क्षय होतो ॥ ३४७ ॥ किंवा कोणता अलंकार कोठे घालावा हे माहीत नसताना अंगावर संपूर्ण अलंकार चांगले घालावे म्हणून जडावाचे व सोन्याचे अलंकार गाठोडीत एकत्र करून ती गाठोडी गळ्यात बांधली, ॥ ३४८ ॥ त्याप्रमाणे तोंडामध्ये परब्रह्माचे नाम आहे आणि हाताने सात्विक कर्म करीत आहे, पण त्या मंत्राचा विनियोग कसा करायचा, हे माहीत नसेल तर ते सर्व निष्फळ होते. ॥ ३४९ ॥ अर्जुना! पोटात भूक लागली आहे व अन्नही जवळच आहे, पण मुलाला कसे जेवावे हे माहीत नसेल तर ते उपाशीच राहील ना!॥ ३५० ॥ किंवा तेल, वात व अग्नी या तिहींचा एकत्र मेळ झाला तरी दिवा उजाळण्याची युक्ती माहीत नसली तर, अर्जुना! प्रकाश मिळत नाही. ॥ ३५१ ॥ त्याप्रमाणे योग्य वेळी कर्म घडत आहे व त्याचा मंत्रही आठवत आहे, पण ते विनियोगावाचून केले गेले तर सर्व व्यर्थ होते. ॥ ३५२ ॥ म्हणून ॐ, तत्, सत् हे जे तीन वर्णात्मक परब्रह्माचे नाम आहे त्याचा, आता विनियोग ऐक. ॥ ३५३ ॥

तस्मादोमित्युदाहृत्य यज्ञदानतपःक्रियाः । प्रवर्तन्ते विधानोक्ताः सततं ब्रह्मवादिनाम्॥ २४॥

अर्थ—म्हणून वेदवादी ब्राह्मणांच्या यज्ञ, दान, तप इत्यादी शास्त्रात सांगितलेल्या सर्व क्रिया प्रथम ॐकाराचा उच्चार करून नेहमी होत असतात. ॥ २४ ॥

तरि या नामींचीं अक्षरें तिन्ही। कर्मा आदि मध्य निदानीं। प्रयोजावीं पैं स्थानीं। इंहीं तिहीं॥ ३५४॥

अर्थ—तरी परब्रह्माच्या ॐ, तत्, सत् या मंत्राच्या तीन अक्षरांची अनुक्रमे कर्माच्या प्रारंभी, मध्ये व शेवटी अशा तीन स्थानी निश्चित योजना करावी. ॥ ३५४ ॥

गूढार्थदीपिका—विनियोग म्हणजे कर्म करताना त्या कर्मात मंत्राचा उपयोग करणे.

हेचि एकी हातवटी। घेऊनि हन किरीटी। आले ब्रह्मविद भेटी। ब्रह्माचिये॥ ३५५॥
ब्रह्मेंसीं होआवया एकी। ते न वंचती यज्ञादिकीं। जे चावळले वोळखीं। शास्त्रांचिया॥ ३५६॥
तो आदि तंव ओंकार। ध्यानें करिती गोचर। पाठीं आणिती उच्चार। वाचेही तो॥ ३५७॥

तेणें ध्यानें प्रकटें। प्रणवोच्चारें स्पष्टें। लागती मग वाटे। क्रियांचिये॥ ३५८॥
आंधारीं अभंग दिवा। आडवीं समर्थ बोळावा। तैसा प्रणव जाणावा। कर्मारंभीं॥ ३५९॥
उचितदेवोद्देशें। द्रव्यें धर्म्यें आणि बहुवसें। द्विजद्वारा हन हुताशें। यजिती पैं ते॥ ३६०॥
आहवनीयादि वह्नीं। निक्षेपरूपी हवनीं। यजिती पैं विधानीं। फुडे होउनी॥ ३६१॥
किंबहुना नाना याग-। निष्पत्तीचें घेऊनि अंग। करिती नावडतेया त्याग। उपाधीचा॥ ३६२॥

अर्थ—हीच विनियोगाची रीती जाणून घेऊन, अर्जुना! वेदवेत्ते ऋषी कर्मे करीतच परब्रह्माच्या भेटीस आले. ॥ ३५५ ॥ ज्यांनी निरनिराळ्या शास्त्रांच्या सिद्धांतांची ओळख करून घेतली, ते परब्रह्माशी ऐक्य होण्यापासून यज्ञादिक कर्मांनी आचवले जात नाहीत. ॥ ३५६ ॥ प्रथम ध्यानाने ॐकार या अक्षराला प्रत्यक्ष पाहतात व मागाहून वाणीनेही त्याचा उच्चार करतात. ॥ ३५७ ॥ याप्रमाणे ॐकाराचे ध्यान व त्याचा वाणीने स्पष्ट उच्चार झाल्यावर मग क्रिया करायला सांगतात. ॥ ३५८ ॥ ज्याप्रमाणे अंधारामध्ये केव्हाही न विझणारा दिवा असावा किंवा आडमार्गाने जाताना जाणता सोबती असावा, त्याप्रमाणे कर्माच्या प्रारंभी प्रणव आहे, असे समजावे. ॥ ३५९ ॥ धर्मानुसार मिळविलेल्या पुष्कळशा द्रव्यांनी, यजनाला योग्य अशा परमात्म्याचे, ब्राह्मण व अग्नी यांच्याद्वारा ते यजन करतात. ॥ ३६० ॥ शास्त्रीय विधानात निष्णात होऊन आहवनीयादी अग्नीत टाकल्या जाणाऱ्या आहुतीच्या योगाने ते यजन करतात. ॥ ३६१ ॥ फार काय सांगावे! नाना प्रकारचे यज्ञ निष्पन्न करून आत्मप्राप्तीला प्रतिबंधक म्हणून न आवडणाऱ्या उपाधीचा ते त्याग करतात. ॥ ३६२ ॥

कां न्यायें जोडला पवित्रीं। भूम्यादिकीं स्वतंत्रीं। देशकाळशुद्धपात्रीं। देती दानें॥ ३६३॥
अथवा एकांतरा कृच्छ्रीं। चांद्रायणें मासोपवासीं। शोधोनि गा धातुराशी। करिती तपें॥ ३६४॥

अर्थ—किंवा धर्मानुसार मिळविलेल्या पवित्र अशा स्वतंत्र भूम्यादिकांचे पवित्र अशा काशी इत्यादी क्षेत्रांत, संक्रांती इत्यादी पवित्र काली व वेदमूर्ती अशा पवित्र ब्राह्मणाला दान देतात ॥ ३६३ ॥ अथवा एकांतर, कृच्छ्र, चांद्रायण, एक महिना उपवास अशी व्रतरूप तपे करतात व शरीरातील धातूचे शोषण करतात. ॥ ३६४ ॥

गूढार्थदीपिका—एकान्तर-म्हणजे एकदिवसाआड भोजन करणे.

कृच्छ्र—पहिले दिवशी दूध, दुसरे दिवशी तूप, तिसरे दिवशी तापलेले पाणी व चौथे दिवशी उपवास करणे याला कृच्छ्र म्हणतात.

चांद्रायण—जसजशी तिथी वाढत जाईल, तसतसे मोराच्या अंड्याएवढा ग्रास वाढवीत खाणे, असे प्रतिपदेपासून पौर्णिमेपर्यंत करावयाचे व पुनः अमावस्येपर्यंत एक एक ग्रास कमी कमी करीत खाणे, याला चांद्रायण व्रत म्हणतात.

एवं यज्ञदानतपें। जियें गाजती बंधरूपें। तिहींच होय सोपें। मोक्षाचें तयां॥ ३६५॥
स्थळीं नावा जिया दाटिजे। जळीं तियाचि जेवीं तरिजे। तेविं बंधकीं कर्मीं सुटिजे। नामें येणें॥ ३६६॥
परि हें असो ऐसिया। या यज्ञदानादि क्रिया। ॐकारें सावायिलिया। प्रवर्तती॥ ३६७॥

अर्थ—याप्रमाणे जी यज्ञ, दान, तपे बंधनकारक म्हणून प्रसिद्ध झाली आहेत, त्यांच्याच योगाने मोक्षप्राप्ती सोपी होते. ॥ ३६५ ॥ ज्याप्रमाणे जमिनीवर ज्या नावा अडखळतात, त्यांच्याच योगाने जलाशय तरून जाता येतो, त्याप्रमाणे कर्मे बंधनकारक असली तरी या नामाच्या योगाने ती बंधनापासून सुटका करणारी होतात. ॥ ३६६ ॥ पण हे असो. अशा या यज्ञदानादी क्रिया ॐकाराचे साह्य घेऊन केल्या जातात. ॥ ३६७ ॥

गूढार्थदीपिका—प्रथम ॐकारापासूनच उत्पन्न झालेल्या वैदिक क्रिया ॐकाराच्या ध्यानपूर्वक उच्चाराने केल्या असता त्या ॐकारमय होऊन जातात.

तिया मोटकिया जेथ फळीं। रिगों पाहाती निहाळीं। प्रयोजिती तिये काळीं। तच्छब्द तो॥ ३६८॥

अर्थ—त्या अल्प अशा यज्ञ-दान-तपादी क्रिया ज्या फळाच्या रूपाने फलद्रूप व्हावयाच्या त्या ठिकाणी वेदवेत्ते ब्राह्मण त्या 'तत्' शब्दाचा विनियोग करतात किंवा 'तत्' शब्द लावतात, पाहा! ॥ ३६८ ॥

तदित्यनभिसन्धाय फलं यज्ञतपःक्रियाः । दानक्रियाश्च विविधाः क्रियन्ते मोक्षकांक्षिभिः॥ २५॥

अर्थ—परमेश्वरप्राप्तिरूप मोक्षाची इच्छा करणारे त्या कर्माने प्राप्त होणाऱ्या स्वर्गसुखादी कर्मफळाची इच्छा न करता 'तत्' या ब्रह्मवाचक पदाकडे-ईश्वराकडे- लक्ष देऊन नाना प्रकारच्या यज्ञतपदानादी क्रिया करतात. ॥ २५ ॥

जें सर्वाही जगापरौतें। जें एक सर्वही देखतें। जें तच्छब्दें बोलिजे तें। पैल वस्तु॥ ३६९॥
तें सर्वादिकत्वें चित्तीं। तद्रूप ध्याउनियां सुमती। उच्चारेंही व्यक्ती। आणिती पुढती॥ ३७०॥
म्हणती तद्रूपा ब्रह्म तया। फळेंसीं क्रिया इया। तेचि होतु आम्हां भोगावया। कांहींचि नुरो॥ ३७१॥
ऐसेनि तदात्मकें ब्रह्मीं। तेथ उगाणूनि कर्में। आंग झाडिती न ममें। येणें बोलें॥ ३७२॥
आतां ओंकारें आदरिलें। तत्कारें समर्पिलें। इया रीती जया आलें। ब्रह्मत्व कर्मा॥ ३७३॥
तें कर्म कीर ब्रह्माकारें। जालें तेणेंही न सरे। जें करी तेणेंसीं दुसरें। आहे म्हणौनि॥ ३७४॥
मीठ आंगें जळीं विरे। परि क्षारता वेगळी उरे। तैसें कर्म ब्रह्माकारें। गमे तें द्वैत॥ ३७५॥
आणि दुजें जंव जंव घडे। तंव तंव संसारभय जोडे। हें देवो आपलेनि तोंडें। बोलती वेदें॥ ३७६॥
म्हणौनि परत्वें ब्रह्म असे। तें आत्मत्वें परियवसे। सच्छब्द या रिणादोषें। ठेविला देवें॥ ३७७॥

अर्थ—जी संपूर्ण कार्यकारणरूप जगाच्या पलीकडे आहे, जी सर्वांना जाणते, जी एक अद्वैतस्वरूप असून 'तत्' शब्दाने बोलली जाते, जिला सर्वांच्या पलीकडील वस्तू म्हणतात—म्हणजे जिच्या पलीकडे काही नाही, ॥ ३६९ ॥ हे शुद्धबुद्धी अर्जुना! जी सर्वांचे मूळ कारण असल्यामुळे चित्तात 'तत्' रूपाचे ध्यान करून तोंडानेही त्याचा व्यक्त उच्चार करतात ॥ ३७० ॥ आणि म्हणतात की फळासह त्या संपूर्ण क्रिया तद्रूप ब्रह्मासच प्राप्त होवोत! आम्हांला भोग भोगण्याकरिता काहीच शिल्लक न राहो!॥ ३७१ ॥ अशा प्रकारे 'तत्' स्वरूप परब्रह्माच्या ठिकाणी सर्व कर्मे समर्पण करून आपण "न मम" असे म्हणून आपले अंग झाडून टाकतात-म्हणजे कर्मावेगळे होतात. ॥ ३७२ ॥ ॐकाराने कर्माचा आरंभ करून ते 'तत्' पदाच्या उच्चाराने परब्रह्माच्या ठिकाणी समर्पण केले व अशा रितीने ज्या कर्माला परब्रह्मस्वरूप प्राप्त झाले, ॥ ३७३ ॥ ते कर्म निश्चित ब्रह्माकार झाले खरे! पण एवढ्यानेच होत नाही. कारण (कर्म ब्रह्माकार झाले असे म्हणण्याचा, कर्म असून ते ब्रह्माकार झाले, असा अर्थ होत असल्यामुळे) ते कर्म ब्रह्माहून भिन्न राहून द्वैत कायम राहते. ॥ ३७४ ॥ मिठाचा खडा अंगाने पाण्यात विरला तरी ज्याप्रमाणे त्याचा खारटपणा निराळा भासतो, त्याप्रमाणे कर्माचे ब्रह्माकार भासणे, हे द्वैतच होय. ॥ ३७५ ॥ आणि जोपर्यंत द्वैत भासते, तोपर्यंत संसाराचे भय आहे, हे भगवंतांनीच आपल्या वेदरूपीमुखाने सांगून ठेवले आहे. ॥ ३७६ ॥ सर्वांच्या पलीकडे जे ब्रह्म आहे, ते आत्मस्वरूपातच पर्यवसान पावते-म्हणजे आत्मस्वरूपाने अनुभवाला येते; म्हणून निराळेपणाची किंवा द्वैतरूपाची उणीव नाहीशी करण्याच्या उद्देशाने भगवंताने 'सत्' शब्द ठेवला आहे. ॥ ३७७ ॥

गूढार्थदीपिका—परब्रह्म सच्चिदानंदस्वरूप आहे, असे सांगितले असले तरी परब्रह्माच्या सत्, चित्, आनंद या तिन्ही धर्मांचा आपल्या आत्मस्वरूपाच्या ठिकाणीच अनुभव घ्यावा लागतो व म्हणूनच परब्रह्माचे व आत्मस्वरूपाचे ऐक्य किंवा आत्मा परब्रह्मस्वरूप आहे, असे श्रुतीत सांगितले आहे. आपल्या सदात्मस्वरूपाशी ऐक्य झाले असताच द्वैत नाहीसे होते; म्हणूनच येथे ब्रह्माकार झालेल्या कर्मामुळे भासणारे द्वैत नाहीसे करण्याकरिता त्याचे आत्मस्वरूपाशी 'सत्' शब्दाने ऐक्य सांगितले आहे.

नाम-रूप-कर्मे ही आत्मस्वरूपाहून भिन्न मानली असता मिथ्या ठरतात व त्यांचे सदात्मस्वरूपाशी ऐक्य केले तर ती सर्व सत्य होतात, असे आचार्यांनीही छांदोग्योपनिषदात म्हटले आहे (छां. उ. भा. ६-३-२).

सारांश, या 'सत्' शब्दाच्या विनियोगाने कर्म पूर्ण ब्रह्मस्वरूपच होऊन जाते, असा अर्थ.

तरि ॐकार तत् कारीं। कर्म केलें जें ब्रह्मशरीरीं। जें प्रशस्तादि बोलवरी। वाखाणिलें॥ ३७८॥
प्रशस्तकर्मीं तिये। सच्छब्दा विनियोग आहे। तोचि आइका होये। तैसा सांगों॥ ३७९॥

अर्थ—ब्राह्मणशरीराच्या ठिकाणी ओंकारतत्कारपूर्वक जे कर्म ब्रह्मरूप केले गेले, ते 'प्रशस्त' या शब्दाने वाखाणले जाते. ॥ ३७८ ॥ त्या प्रशस्त कर्माच्या ठिकाणी 'सत्' शब्द जो लावला जातो, तोच कसा लावला जातो, हे सांगतो, ऐका. ॥ ३७९ ॥

सद्भावे साधुभावे च सदित्येतत्प्रयुज्यते । प्रशस्ते कर्मणि तथा सच्छब्दः पार्थ युज्यते॥ २६॥

अर्थ—अर्जुना! अविनाशी भावाच्या ठिकाणी, सद्वर्तनाच्या ठिकाणी व तसेच चांगल्या मंगल कार्याच्या ठिकाणी हा 'सत्' शब्द लावला जातो. ॥ २६ ॥

तरि सच्छब्दें येणें। आटूनि असताचें नाणें। दाविजे अव्यंगवाणें। सत्तेचें रूप॥ ३८०॥
जें सतचि काळें देशें। होऊं नेणेचि अनारिसें। आपणपां आपण असे। अखंडित॥ ३८१॥

अर्थ—या 'सत्' शब्दाच्या योगाने विनाशीपणाचे नाणे आटले जाऊन (नाहीसे होऊन) अविनाशी भावरूप सत्तेचे निर्दोषस्वरूप दाखविले जाते. ॥ ३८० ॥ ते 'सत्' स्वरूप कोणत्याही काळात व कोणत्याही देशात 'असत्' होऊ शकत नाही. ते आपण आपल्या ठिकाणी अखंड, अविनाशी, अविकारी आहे. ॥ ३८१ ॥

गूढार्थदीपिका—माउलीने या ओवीत सत्स्वरूपाची व्याख्याच दिली आहे.

हें दिसतें जेतुलें आहे। तें असतपणें जें नोहे। देखतां रूपीं सोये। लाभे जयाची॥ ३८२॥

अर्थ—असतपणाने जेवढे काही दिसते तेवढे ते नव्हे, असा विचार करून पाहिले असता ज्याचा आश्रय रूपाच्या ठिकाणीही लाभलेला दिसतो. ॥ ३८२ ॥

गूढार्थदीपिका—याचा अर्थ असा की रूपालाही सत्स्वरूपाचाच आधार आहे. सत्स्वरूपाला सोडून रूपाला स्वतंत्र अस्तित्व नाही, म्हणून ते 'असत' नाही.

''दृश्य कीर दृष्टि असे। परि साच की द्रष्टा असे'' (अमृ. प्र. ७-२०४) दृश्य, जड, असत, जगद्रूप नसून तेही अविनाशी सद्रूप ब्रह्मच आहे, असे माउलींनी अमृतानुभवातही सांगितले आहे. अर्थात सत्स्वरूपाचा विचार केला असता रूपही सत्स्वरूपच ठरते.

तेणेंसीं प्रशस्त तें कर्म। जें जालें सर्वात्मक ब्रह्म। देखिजे करूनि सम। ऐक्यबोधें॥ ३८३॥
तरी ॐकार तत्कारें। जें कर्म दाविलें ब्रह्माकारें। तें गाळूनि होइजे एकसरें। सन्मात्रचि॥ ३८४॥
ऐसा हा अंतरंग। सच्छब्दाचा विनियोग। जाणा म्हणे श्रीरंग। मी न म्हणें हो॥ ३८५॥
ना मीचि जरि हो म्हणें। तरि श्रीरंगीं दुजें हेंचि उणें। म्हणौनि हें बोलणें। देवाचेंचि॥ ३८६॥

अर्थ—जे प्रशस्त कर्म सत्स्वरूपासह सर्वात्मक ब्रह्मस्वरूप झाले, त्याचे आपल्याशी ऐक्य आहे या ज्ञानबोधाने ते समस्वरूप पाहावे. ॥ ३८३ ॥ जे ओंकार-तत्कारपूर्वक केलेले कर्म ब्रह्माकार होते, असे जे मागे सांगितले, ते सर्व द्वैत मनातून काढून टाकून केवळ सन्मात्रस्वरूप होऊन राहावे. ॥ ३८४ ॥ असा हा 'सत्' शब्दाचा अंतरंगविनियोग आहे, असे जाण, असे भगवान श्रीकृष्ण म्हणतात; मी म्हणत नाही, हो! ॥ ३८५ ॥ आणि, मी म्हणतो, असे जरी म्हटले तरी भगवंताहून मी अलग राहणे हे सर्वव्यापक भगवंताच्या ठिकाणी उणेपण आहे. याही दृष्टीने पाहता, हे म्हणणे भगवंताचेच आहे. ॥ ३८६ ॥

आतां आणिकीही परी। सच्छब्द हा अवधारीं। सात्विककर्मा करी। उपकार जो॥ ३८७॥
तरी सत्कर्में चांगें। चालिलीं अधिकारबगें। परि एकाधें कां आंगें। हिणावती जैं॥ ३८८॥
तैं उणें एकें अवयवें। शरीर ठाके आघवें। कां अंगहीना भांडावे। रथाची गती॥ ३८९॥
तैसें एकेचि गुणेंवीण। सतचि परी असतपण। कर्म धरी गा जाण। जियें वेळें॥ ३९०॥
तेव्हां ओंकार तत्कारीं। सावायिला हा चांगी परी। सच्छब्द कर्मा करी। जीर्णोद्धार॥ ३९१॥

तें असतपण फेडी। आणी सद्भावाचिये रूढी। निजसत्वाचिये प्रौढी। सच्छब्द हा॥ ३९२॥

अर्थ—आणखी दुसरे असे की या 'सत्' शब्दाने सात्विक कर्मावर जो उपकार केला जातो, तो सांगतो, ऐक. ॥ ३८७ ॥ सात्विक कर्म अधिकारानुसार चांगले अनुष्ठिले जात असताना जर त्यात एखाद्या अंगाने वैगुण्य प्राप्त झाले तर॥ ३८८ ॥ ज्याप्रमाणे एखादे अंग किंवा अवयव नसले म्हणजे संपूर्ण शरीर त्या अवयवावाचून राहते किंवा चाक वगैरे एखाद्या अंगाने हीन असलेल्या रथाची गती बंद पडते, ॥ ३८९ ॥ त्याप्रमाणे जेव्हा एका गुणाच्या उणेपणामुळे सत्कर्माला 'असत्' पण येते, ॥ ३९० ॥ तेव्हा ओंकार-तत्कार यांचे साह्य असलेला हा 'सत्' शब्द त्या कर्माचा चांगला जीर्णोद्धार करतो-म्हणजे उणीव भरून काढतो व कर्म पूर्ण करतो. ॥ ३९१ ॥ हा 'सत्' शब्द आपल्या सद्भावाच्या भारदस्तपणामुळे कर्माचे 'असत्' पण नाहीसे करून त्याचे ठिकाणी 'सत्' पणा रूढ करतो. ॥ ३९२ ॥

दिव्यौषध जैसें रोगिया। कां सावावो ये भंगलिया। सच्छब्द कर्मा व्यंगलिया। तैसा जाण॥ ३९३॥
अथवा कांहीं प्रमादें। कर्म आपुलिये मर्यादे। चुकोनि पडे निषिद्धे। वाटे हन॥ ३९४॥
चालतयाचि मार्ग सांडे। पारखियाचि अखरें पडे। राहाटीमाजि न घडे। काइ काइ॥ ३९५॥
म्हणौनि तैसी कर्मा। राभस्यें सांडे सीमा। असाधुत्वाचिया दुर्नामा। येवों पाहे जें॥ ३९६॥
तेथ गा हा सच्छब्दु। येरां दोहींपरीस प्रबुद्धु। प्रयोजिला करी साधु। कर्मातें यया॥ ३९७॥
लोहा परिसाची घृष्टी। वोहळा गंगेची भेटी। कां मृता जैसी वृष्टी। पीयूषाची॥ ३९८॥
पैं असाधुकर्मा तैसा। सच्छब्दप्रयोग वीरेशा। हें असो गौरवचि ऐसा। नामाचा यया॥ ३९९॥

अर्थ—जसे दिव्य औषध रोग्याला किंवा साहाय्य मिळणे आशाभंग झालेल्यास, उत्साहजनक होते, त्याप्रमाणे कोण्याही रीतीने व्यंग झालेल्या कर्माला 'सत्' शब्द हा पूर्ण करतो, असे जाण. ॥ ३९३ ॥ अथवा कोणत्या एखाद्या चुकीमुळे कर्म आपली विहित मर्यादा सोडून निषिद्ध कोटीत गेले तर॥ ३९४ ॥ चालणाऱ्याचीच वाट चुकते, परीक्षकच एखादे वेळी फसतो, व्यवहारामध्ये काय काय घडत नाही ?॥ ३९५ ॥ त्याप्रमाणे अविवेकाने एखादे वेळी कर्माची विहित मर्यादा ओलांडली जाऊन त्या कर्माला असाधू असे जे वाईट नाव प्राप्त होते, ॥ ३९६ ॥ असे झाले असता 'सत्' शब्द हा ॐकार व तत्कार या दोघांपेक्षा इतक्या पूर्ण अवस्थेला पोहोचला आहे की तो लावला असता कर्माला आपल्यासारखेच चांगले व पूर्ण करतो. ॥ ३९७ ॥ ज्याप्रमाणे लोखंडाला परिसाचा संसर्ग व्हावा, गंगेला ओढा मिळावा किंवा मेलेल्या माणसावर अमृताची वृष्टी व्हावी, ॥ ३९८ ॥ त्याप्रमाणेच, वीरश्रेष्ठा अर्जुना! अपूर्ण व निषिद्ध अशा कर्माला 'सत्' शब्द लावण्याचा उपयोग आहे. हे असो. 'सत्' या नामाची अशी महतीच आहे. ॥ ३९९ ॥

घेऊनि येथिंचे वर्म। जैं विचारिसी हें नाम। तैं केवळ हेंचि ब्रह्म। जाणसी तूं॥ ४००॥
पाहें पां ॐ तत् सत् ऐसें। हें बोलणें तेथ नेतसे। जेथूनि कां हें प्रकाशे। दृश्यजात॥ ४०१॥
तें तंव निर्विशिष्ट। परब्रह्म चोखट। तयाचें हें आंतुवट। व्यंजक नाम॥ ४०२॥
परि आश्रय आकाशा। आकाशचि कां जैसा। या नामा अनामिया आश्रय तैसा। अभेद असे॥ ४०३॥

अर्थ—या नामाचे हे रहस्य जाणून तू नामाचा विचार करशील, तेव्हा तुला असे दिसून येईल की, ॐतत्-सत् हेच ब्रह्म आहे. ॥ ४०० ॥ हे पाहा अर्जुना! जेथून हे दृश्य जगत् प्रगट होते, तेथेच ॐ-तत्-सत् हे नाम जिवाला पोहोचविते. ॥ ४०१ ॥ ती वस्तू म्हणजे सर्व विशेषरहित असे शुद्ध परब्रह्म होय. त्याचा प्रत्यय आणून देणारे असे हे नाम अंतरंगभूत साधन आहे. ॥ ४०२ ॥ ज्याप्रमाणे आकाशाला आकाशच आश्रय आहे, त्याप्रमाणे भगवंताच्या नामाला भगवंताचाच आश्रय असल्यामुळे भगवान व भगवंताचे नाव यांचा अभेदच आहे. ॥ ४०३ ॥

गूढार्थदीपिका—म्हणूनच भगवान जसा अनध्यस्तविवर्तरूप आहे, तसे त्याचे नावही अनध्यस्तविवर्तरूप आहे, असेच सर्व संत मानतात.

उदयिला आकाशीं। रवीचि रवीतें प्रकाशी। हे नामव्यक्ती तैसी। ब्रह्मचि करी॥ ४०४॥

अर्थ—आकाशात सूर्य उगवला असता तो आपल्यालाच प्रकाशरूप करतो, त्याप्रमाणे ॐ-तत्-सत् हे व्यक्तनाम ब्रह्माला प्रकाशित करते. ॥ ४०४ ॥

यज्ञे तपसि दाने च स्थितिः सदिति चोच्यते । कर्म चैव तदर्थीयं सदित्येवाभिधीयते॥ २७॥

अर्थ—यज्ञ, दान व तप यांच्या अनुष्ठानात राहण्याच्या स्थितीला 'सत्' असे म्हणतात व त्यांच्याकरता होणाऱ्या कर्मालाही 'सत्' असे म्हणतात. ॥ २७ ॥

म्हणौनि त्र्यक्षर हें नाम। नव्हे जाण केवळ ब्रह्म। याहीलागीं कर्म। जें जें कीजे॥ ४०५॥
ते याग अथवा दानें। तपादिकेंही गहनें। तियें निफजतु कां न्यूनें। होऊनि ठातु॥ ४०६॥
परि परिसाचा वरकलीं। नाहीं चोखाकिडाची बोली। तैसीं ब्रह्मीं अर्पितां केलीं। ब्रह्मचि होती॥ ४०७॥
उणिया पुरयाची परी। नुरेचि तेथ अवधारीं। निवडूं न येती सागरीं। जैसिया नदी॥ ४०८॥
एवं पार्था तुजप्रती। ब्रह्मनामाची हे शक्ती। सांगीतली उपपत्ती। डोळसा गा॥ ४०९॥
आणि येकेकाही अक्षरा। वेगळवेगळा वीरा। विनियोग नागरा। बोलिलों रीति॥ ४१०॥
एवं ऐसें सुमहिम। म्हणौनि हें ब्रह्मनाम। आतां जाणीतलें कीं सुवर्म। राया तुवां॥ ४११॥
तरि येथूनि याचि श्रद्धा। उपलविली हो सर्वदा। जयाचें जालें बंधा। उरों नेदी॥ ४१२॥
जिये कर्मीं हा प्रयोग। अनुष्ठिजे सद्विनियोग। तेथ अनुष्ठिला सांग। वेदचि तो॥ ४१३॥

अर्थ—म्हणून ॐ-तत्-सत् हे नुसते तीन अक्षरी नाम नसून ते केवळ परब्रह्मच होय, असे समज. याच्या निष्पत्तीकरिता जी जी थोर यज्ञ-याग, तप, दाने इत्यादी कर्मे केली जातात ती सांग होवोत किंवा व्यंग होवोत. ॥ ४०५-४०६ ॥ तरी ज्याप्रमाणे परिसाच्या कसोटीच्या स्पर्शाने झालेल्या सोन्यात, हे हीणकट आहे, हे चांगले आहे, अशी भाषा राहात नाही, त्याप्रमाणे परब्रह्माच्या ठिकाणी अर्पण केलेली कर्मे सच्चिदानंद ब्रह्मस्वरूपच होतात. ॥ ४०७ ॥ ज्याप्रमाणे समुद्रास मिळालेल्या नद्या पुनः ओळखता येत नाहीत, त्याप्रमाणे परब्रह्माला कर्मे अर्पण केली असता ती उणीपुरी राहात नाहीत, हे पक्के समज. ॥ ४०८ ॥ याप्रमाणे, ज्ञानवान अर्जुना! तुला या ब्रह्मनामाच्या शक्तीची ही उपपत्ती सांगितली. ॥ ४०९ ॥ आणि, हे वीरा अर्जुना! या ब्रह्मनामातील एक एक अक्षराचा वेगवेगळा विनियोगही सुंदर रीतीने सांगितला. ॥ ४१० ॥ अशा प्रकारे, वर सांगितल्याप्रमाणे त्याची उत्तम कीर्ती आहे, म्हणून ते परब्रह्माचे नाम झाले आहे, त्याचे हे नीट वर्म, हे राजा, जाणलेस ना! ॥ ४११ ॥ आजपासून ही नामाची श्रद्धा सदासर्वदा अशीच वाढलेली राहिली तर ती प्राप्त झालेल्या कर्मबंधनाला उरू देणार नाही. ॥ ४१२ ॥ ज्या कर्मामध्ये 'ॐ-तत्-सत्' या ब्रह्मनामाचा उच्चार होऊन त्याचा योग्य विनियोग केला जाईल, तेथे संपूर्ण वेदाचेच अनुष्ठान झाले. ॥ ४१३ ॥

अश्रद्धया हुतं दत्तं तपस्तप्तं कृतं च यत् । असदित्युच्यते पार्थ न च तत्प्रेत्य नो इह॥ २८॥

ॐतत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे
श्रद्धात्रयविभागयोगो नाम सप्तदशोऽध्यायः॥ १७॥

अर्थ—हे अर्जुना! अश्रद्धेने केलेल्या हवनाला, दिलेल्या दानाला, केलेल्या तपाला व केलेल्या स्तुती-नमस्कारादी कर्माला असत् म्हणतात. (हे सर्व करण्यात अत्यंत कष्ट होत असले) तरी त्याचे इहलोकी किंवा परलोकीही फळ मिळत नाही. ॥ २८ ॥

ना सांडूनि हे सोये। मोडूनि श्रद्धेची बाहे। दुराग्रहाची त्राये। वाढऊनियां॥ ४१४॥

मग अश्वमेध कोडी कीजे। रत्नें भरोनि पृथ्वी दीजे। एकांगुष्ठींही तपिजे। तपसाहस्त्रीं॥ ४१५॥
जळाशयाचेनि नांवें। समुद्रही कीजती नवे। परि किंबहुना आघवें। वृथाचि तें॥ ४१६॥
पाषाणावरी वर्षलें। जैसें भस्मीं हवन केलें। कां खेंव दीधलें। साउलिये॥ ४१७॥
ना तरि जैसें चडकणां। गगन हाणीतलें अर्जुना। तैसा समारंभ सुणा। गेलाचि तो॥ ४१८॥
घाणां गाळिले गुंडे। तेल ना पेंडी जोडे। तैसें दरिद्र तेवढें। ठेलेंचि आंगीं॥ ४१९॥
गांठीं बांधली खापरी। येथ अथवा पैलतीरीं। न सरोनि जैसी मारी। उपवासीं गा॥ ४२०॥

अर्थ—कर्म करण्याची ही हातोटी सोडून देऊन व कर्माला लागणारा श्रद्धेचा हात मोडून टाकून अश्रद्धेने नुसत्या दुराग्रहाच्या बळावर कोट्यवधी अश्वमेध यज्ञ केले, रत्नांनी भरलेल्या पृथ्वीचे दान केले किंवा एका अंगुष्ठावर उभे राहण्यासारखी हजारो तपे केली अथवा फार काय सांगायचे! जलाशय निर्माण करण्याच्या नावाखाली समुद्रासारखे नवे समुद्र निर्माण केले तरी ते सर्व व्यर्थच होय. ॥ ४१४-४१६ ॥ ज्याप्रमाणे पाषाणावर झालेला पाण्याचा वर्षाव किंवा राखेत केलेले हवन, अथवा सावलीला दिलेले आलिंगन किंवा अर्जुना! आकाशाला मारलेली थापड व्यर्थ होय, त्याप्रमाणे अश्रद्धेने केलेले सर्व कार्यारंभ व्यर्थ होत. ॥ ४१७-४१८ ॥ ज्याप्रमाणे घाण्यात घालण्याकरिता टाकलेल्या दगडापासून तेल किंवा पेंड काहीच प्राप्त होत नाही, परंतु स्वत:चे दारिद्र्य तेवढे कायमच राहते. ॥ ४१९ ॥ कनवटीस खोचलेली खापरखुंटी अलीकडील किंवा पलीकडील तीरावरील गावात कोठेही चालत नसल्यामुळे जशी उपाशी मारते, ॥ ४२० ॥

तैसें कर्मजातें तेणें। नाहीं ऐहिकींचें भोगणें। तेथ परत्र तें कवणें। अपेक्षावें॥ ४२१॥
म्हणौनि ब्रह्मनामश्रद्धा। सांडूनि कीजे जो धांदा। हें असो सिणू नुसधा। दृष्टादृष्टीं तो॥ ४२२॥
ऐसें कलुषकरिकेसरी। त्रितापतिमिरतमारी। श्रीवर वीर नरहरी। बोलिलें तेणें॥ ४२३॥

अर्थ—त्याप्रमाणे अश्रद्धेने केलेल्या कर्मजाताने जेथे ऐहिक भोगच मिळत नाही, तेथे त्यांच्या योगाने परलोकातील भोग मिळतील, अशी आशा कशी करावी? ॥ ४२१ ॥ म्हणून ॐ-तत्-सत् या ब्रह्मनामाचा प्रयोग व श्रद्धा यांना सोडून केलेले कोणतेही कर्म, इहपरलोकी नुसता शीणच होय. ॥ ४२२ ॥ पापरूपी हत्तीला मारणारा सिंह, त्रिविध दु:खरूप अंधाराचा नाश करणारा सूर्य, लक्ष्मीचा पती, पराक्रमी, नरहरी असा हा भगवान श्रीहरी असे बोलता झाला. ॥ ४२३ ॥

तेथ निजानंदा बहुवसा-। माजि अर्जुन तो सहसा। हरपला चंद्र जैसा। चांदिणेनी॥ ४२४॥
अहो संग्राम हा वाणिया। मापें नाराचांचिया आणिया। सूनि मांस घे मवणिया। जीवितेंसीं॥ ४२५॥
ऐसिया समयीं कर्कशें। भोगीजत स्वानंदराज्य कैसें। आजि भाग्योदय हा नसे। आणिके ठाईं॥ ४२६॥
संजय म्हणे कौरवराया। गुणा रिझों ये रिपूचिया। आणि गुरुही हा आमुचिया। सुखाचा येथ॥ ४२७॥
हा न पुसता हे गोठी। तरि देव कां सोडिते गांठी। तरि कैसेनि आम्हां भेटी। परमार्थेंसीं॥ ४२८॥
होतें अज्ञानाच्या आंधारां। वोसंतीत जन्मवाहरा। तों आत्मप्रकाशमंदिरा-। आंत आणिलें॥ ४२९॥
येवढा आम्हां तुम्हां थोर। केला येणें उपकार। म्हणौनि हा व्याससहोदर। गुरुत्वें होय॥ ४३०॥
तेवींचि संजयो म्हणे चित्तीं। हा अतिशय या नृपती। खुपेल म्हणौनि किती। बोलत असों॥ ४३१॥
ऐसी हे बोली सांडिली। मग येरीचि गोठी आदरिली। जे पार्थें कां पुसिली। श्रीकृष्णातें॥ ४३२॥
याचें जैसें कां करणें। तैसें मीही करीन बोलणें। ऐकिजो ज्ञानदेव म्हणे। निवृत्तीचा॥ ४३३॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां सप्तदशोऽध्याय:॥ १७॥

अर्थ—ज्याप्रमाणे चंद्रापेक्षा पुष्कळपटीने असलेल्या चांदण्यात चंद्र हरपला जातो, त्याप्रमाणे अपार अशा आत्मानंदात अर्जुन तत्काळ निमग्न झाला. ॥ ४२४ ॥ अहो! कौरवपांडवांचा युद्धप्रसंग म्हणजे एक वाणीच होय. बाणांची अग्ररूपे मागे घालून तो प्राणांसह मांसाचे माप घेत आहे. ॥ ४२५ ॥ अशा कठोर प्रसंगी तो अर्जुन स्वानंदाचे साम्राज्य कसे भोगीत आहे, पाहा! अर्जुनावाचून दुसऱ्याच्या ठिकाणी असा भाग्योदय झालेला दिसणार नाही. ॥ ४२६ ॥ संजय म्हणतो, हे कौरवांच्या राजा धृतराष्ट्र! शत्रूच्या गुणाने आनंद होतो व तो आमच्या सुखप्राप्तीला कारण असल्यामुळे गुरुस्थानीही आहे. ॥ ४२७ ॥ अर्जुनाने ही गोष्ट विचारलीच नसती तर देवांनी तरी प्रक्रियारूप गाठोडीची गाठ कशाला सोडली असती व मग आमच्यासारख्याला परमार्थाचा लाभ कसा झाला असता? ॥ ४२८ ॥ जो मी आता विस्मृतिरूप अंधारात जन्मदुःख भोगीत होतो, त्या मला आत्मस्मृती करून देऊन आत्मप्रकाशरूप मंदिरात आणले. ॥ ४२९ ॥ एवढा मोठा उपकार या अर्जुनाने आपल्यावर केला असल्यामुळे तो भगवान व्यासांचा बंधू व आपला गुरू झाला आहे. ॥ ४३० ॥ तसेच संजय आपल्या चित्तात म्हणतो, अर्जुनाची केलेली स्तुती राजाच्या मनाला झोंबेल, म्हणून आता किती बोलायचे! ॥ ४३१ ॥ असा विचार करून त्याने बोलणे आटोपते घेतले व मग अर्जुनाने भगवान श्रीकृष्णाला जी गोष्ट विचारली होती, त्या दुसऱ्याच गोष्टीविषयी बोलणे सुरू केले. ॥ ४३२ ॥ श्रीनिवृत्तिनाथ महाराजांचे श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात, ऐका! त्यांचे जसे करणे झाले आहे, तदनुरूपच मीही निरूपणाचे बोलणे करीन. ॥ ४३३ ॥

श्रीसद्गुरुमाउलीच्या कृपाप्रसादाने श्रीज्ञानेश्वरीच्या सतराव्या अध्यायाचा अनुवाद गूढार्थदीपिकेसह समाप्त झाला, तो श्रीगुरुमाउलीच्या चरणी समर्पण असो.

समारोप

मागे सोळाव्या अध्यायाच्या शेवटी भगवंतांनी असा निर्णय केला की कर्तव्याकर्तव्याच्या निश्चितीकरिता एक शास्त्रच प्रमाण मानले पाहिजे. तेव्हां अर्जुनाला अशी शंका आली की, हे कर्म कर्तव्य होय किंवा कर्तव्य नव्हे, असे नुसत्या श्रद्धेने ठरविता येणार नाही काय? म्हणून अर्जुनाने प्रश्न केला की, हे भगवंता! शास्त्र न पाहता जे केवळ श्रद्धेने यजन करतात त्यांची ती निष्ठा सात्विक, राजस की तामस?

भगवान म्हणतात, अर्जुना! शास्त्राभ्यास किंवा शास्त्रावलोकन न करणाऱ्या लोकांची पूर्वकर्मानुसार प्राप्त होणारी स्वाभाविक श्रद्धा ही सात्विक, राजस, तामस अशी तीन प्रकारची असते. हा पुरुष श्रद्धामयच आहे. सात्विक पुरुषाची श्रुतिस्मृतिपुराणात सांगितलेल्या शिव व विष्णू यांच्या पूजनाच्या ठिकाणी श्रद्धा असते. राजस श्रद्धेचे पुरुष यक्ष व राक्षस यांचे पूजन करतात व तामस श्रद्धेचे पुरुष भूतप्रेतादिकांचे पूजन करतात.

या तीन श्रद्धांपैकी रजोगुणी, तमोगुणी या दोन श्रद्धा अध:पतनाला कारणीभूत असल्यामुळे नि:शेष टाकून देऊन सात्विक श्रद्धाच जतन करावी. तसेच, ज्यायोगे चित्तात सत्वगुण दृढ ठसेल, अशी संगती धरावी व सत्वगुण ज्यात अधिक आहे, असा आहार घ्यावा. खाल्लेल्या अन्नाप्रमाणेच मनुष्याचे मन बनते. सर्व मनुष्यांना प्रिय असलेला आहार सात्विक, राजस, तामस असा तीन प्रकारचा आहे. त्याचप्रमाणे यज्ञ, तप व दान हेही तीन प्रकारचे आहेत.

भगवान म्हणतात, अर्जुना! प्रथम आहाराचे भेद सांगतो, ऐक.

आहार—सात्विक पुरुषाला प्रिय असलेला आहार, आयुष्य, चित्तातील स्थैर्य, शक्ती, आरोग्य, सुख व अभिरुची इत्यादी सात्विक गुण वाढविणारा, स्वभावत:च रसभरित, अंगचाच स्निग्ध, शरीरात बराच वेळ टिकणारा व इंद्रियांना समाधान देणारा, असा असतो. राजस पुरुषाला प्रिय असलेला आहार, अती कडू, अती आंबट, अती तिखट, अती खारट, अती उष्ण, अती रूक्ष व शरीराचा दाह करणारा म्हणून दु:ख, शोक व रोग यांना उत्पन्न करणारा असतो. तामस पुरुषाला प्रिय असलेला आहार, निरस, दुर्गंधियुक्त, शिळा, उष्ट व अपवित्र असा असतो.

यज्ञ—फळाची यत्किंचितही इच्छा न करता शास्त्रविधीला धरून केला जाणारा सात्विक यज्ञ होय. फळाची इच्छा धरून लोकात प्रतिष्ठा मिरविण्याकरिता केला जाणारा यज्ञ राजस यज्ञ होय. शास्त्रविधी, यथोक्त अन्नदान, वैदिक मंत्र, शास्त्रोक्त दक्षिणा व श्रद्धा याविरहित केल्या जाणाऱ्या यज्ञाला तामस यज्ञ म्हणतात.

तप—अर्जुना! आता तपाचे स्वरूप ऐक.

तप हे शारीरिक, वाचिक व मानसिक असे तीन प्रकारचे आहे. देव, ब्राह्मण, गुरू व ज्ञानी यांचे पूजन करणे, शरीरशुद्धी, सरळपणाने वागणे, ब्रह्मचर्य व कोण्याही प्राण्याची हिंसा न करणे ही कर्मे शरीराने होत असल्यामुळे याला शारीरिक तप म्हणतात.

खिन्नता उत्पन्न न करणारे, सत्य, प्रिय व हितकारक असे बोलणे व आपल्याला पठण करण्यास योग्य म्हणून स्वीकारलेली स्तोत्रे व ग्रंथ यांचा अभ्यास करणे, याला वाचिक तप म्हणतात.

रागद्वेषरहित मन होणे, मनात सर्व लोकांच्या हिताची इच्छा व निष्कपट बुद्धी असणे याला मानसिक तप म्हणतात. हेच तप अत्यंत श्रद्धेने व फळाची इच्छा न धरता केले असता, ते सात्विक तप होते व फळाची इच्छा धरून प्रतिष्ठा मिरविण्याकरिता केले असता राजस तप होते; तसेच विकारी अंत:करणाने आपल्या देहाला अत्यंत पीडा देऊन दुसऱ्याचा नाश करण्याकरिता केलेले तप तामस म्हटले जाते.

दान—पुण्यक्षेत्रात, पुण्यकाली, उपकार फेडण्यास असमर्थ व वेदपारंगत अशा ब्राह्मणाला दिले जाणारे दान सात्विक दान होय.

प्रत्युपकाराच्या आणि फळ मिळण्याच्या बुद्धीने व कष्टी अंत:करणाने केलेले दान राजस दान होय. संध्यासमयी किंवा रात्री, अधर्माने मिळविलेल्या धनाचे, पापी लोकांना दान करणे याला तामस दान म्हणतात.

भगवान म्हणतात, अर्जुना! आम्ही श्रद्धेपासून दानापर्यंत सत्व, रज, तम या तीन गुणांनी व्याप्त ह्या ज्या क्रिया सांगितल्या त्या, सात्विक कर्माचे स्वरूप स्पष्ट करण्याकरिता सांगितल्या. तू सत्वगुणाचा आश्रय करून सात्विक कर्मेच कर व राजस-तामस कर्मांचा त्याग कर.

केलेल्या सात्विक कर्माने मोक्षसिद्धी कशी होते याचे वर्म मी तुला आता सांगतो, ऐक.

परब्रह्माचा ॐ, तत्, सत् असा तीन प्रकाराने नामनिर्देश केला आहे. या त्रिविध नामनिर्देशद्वाराच ब्राह्मण, वेद व यज्ञ निर्माण केले गेले, म्हणून मोक्षाची इच्छा करणाऱ्या वेदवादी ब्राह्मणांच्या यज्ञ, दान, तप इत्यादी सर्व क्रिया प्रथम ॐकाराचा उच्चार करून नेहमी होत असतात. केवळ तत्वाच्य ब्रह्माकडे लक्ष देऊन ते नाना प्रकारचे यज्ञ-दान-तपादी कर्मे करतात व तसेच अस्तित्व, सद्वृत्तत्व या अर्थी प्रशस्त कर्मांचे ठिकाणी सत् शब्द लावला जातो. अशा प्रकारे ॐ, तत्, सत् या तीन नामांचा विनियोग करून यज्ञ, दान, तप यांच्या अनुष्ठानात राहणाऱ्या स्थितीला सत् असे म्हणतात. जे अश्रद्धेने हवन केले जाते, दान दिले जाते, ते असत् कर्म होय. इहलोकी किंवा मरणानंतर त्याचे काही फळ होत नाही.

॥ श्रीमत्सद्गुरू श्रीज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥